मंगळवार, ३० एप्रिल २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २४३
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 30 APRIL 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-243 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-14 ●PRICE-05



## शेतात उतरले हेलिकॉप्टर

### बिघाड झाल्याने इमर्जन्सी लँडिंग

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. बाळासाहेब बोराडे**

**श्रीक्षेत्र राजूर: राजूरपासून जवळ असलेल्या तपोवन शिवारातील शेतात अचानक हेलिकॉप्टर उतरल्याने एकच खळबळ उडाली होती.तांत्रिक बिघाड झाल्याने हेलिकॉप्टर इमर्जन्सी लँड करावे लागल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.हेलिकॉप्टर पहाण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.या घटनेबद्दल अनेक तर्कवितर्क लावले जात होते.घटनेची माहिती मिळताच हसनाबाद पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. चौकशी अंती तांत्रिक बिघाड झाल्याने इमर्जन्सी लँडिंग केल्याचे दिसून आले.हेलिकॉप्टरमधून पायलटसह तिघेजण प्रवास करत होते.सुदैवानं या घटनेत कुठलीही जीवितहानी झाली नाही. काही वेळाने हेलिकॉप्टरने पुन्हा यशस्वी उड्डाण केले.**

सविस्तर माहिती अशी की सोमवारी सकाळी अकराच्या सुमारास भोकरदन तालुक्यातील व राजूरपासून जवळ असलेल्या तपोवन तांडा शिवारात अचानकपणे हेलिकॉप्टर घिरट्या घालत असल्याचे दिसून आले.परंतु ते थोड्याच वेळात शेतात उतरल्याने एकच खळबळ उडाली.शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांनी व परिसरातील नागरिकांनी तात्काळ ही माहिती पोलिसांना दिली.पोलिसही तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. यावेळी हेलिकॉप्टर पहाण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. या घटनेबद्दल नागरिकांमध्ये अनेक तर्कवितर्क लावले जात होते. काहीकाळ आफवांचे पेव फुटले होते.सुरवातीला हे हेलिकॉप्टर प्रचार सभेचे असेल असा अंदाज लावला जात होता. काहींच्या मते हेलिकॉप्टरद्वारे रेल्वे लाईनच्या सर्वेक्षण चालू असतांना ते कोसळले तर काहींच्या मते यांमधून व्यापारी प्रवास करत होते.परंतु आमच्या प्रतिनिधींनी हसनाबाद पोलिसांशी संपर्क साधला असता हे हेलिकॉप्टर एका खाजगी कंपनीचे असल्याचे निदर्शनास आले. ते छत्रपती संभाजीगरहून नागपुला जाणार होते. परंतु मध्येच तांत्रिक बिघाड झाल्याने इमर्जन्सी लँडिंग करावे लागले.

शेतात हेलिकॉप्टर उतरल्याचे कळताच सहकाऱ्यांसह तात्काळ घटनास्थळी धाव घेतली .प्राथमिक माहितीनुसार अग्निहोत्री प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे हेलिकॉप्टरअसल्याचे दिसून आले . छत्रपती संभाजीनगरहुन नागपूरला व तेथून लुधियानाकडे रवाना होणार होते .बिघाड झाल्याने तात्काळ जमिनीवर उतरावे लागले .दुरुस्ती झाल्यानंतर पुन्हा ते नागपूरकडे रवाना झाले .प्राथमिक माहिती नुसार हा कुठलाही घातपात नसल्याचे समजते .या घटनेत कुठलीही जीवितहानी झाली नाही . **संजय अहिरे, सहायक पोलीस निरीक्षक, हसनाबाद**

## सौ. करिष्मा अतुल जैस्वाल यांना दै. आधुनिक केसरीचा समाज सेवेतील 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** कवयित्री, लेखिका, शिक्षिका अशा विविधांगी भूमिकेतून छत्रपती संभाजीनगर येथील सौ. करिष्मा अतुल जैस्वाल या समाजसेवेचे कार्य




करत आहेत. कोरोना महामारीत नागपूर येथील माँ फाऊंडेशनच्या माध्यमातून गरजवंतांना सौ. करिष्मा अतुल जैस्वाल यांनी भरीव मदत केली. तसेच माँ फाऊंडेशनच्या माध्यमातून बालकाश्रम, वृद्धाश्रम व अपंग व्यक्तींना मदत मिळवून देण्यासाठी सौ. करिष्मा अतुल जैस्वाल या नेहमी तत्पर असतात.

समाज सेवेतील सौ. करिष्मा अतुल जैस्वाल यांचे कार्य निश्चितच कौतुकास्पद आणि गौरवास्पद आहे. या कार्याची दखल घेऊन दैनिक आधुनिक केसरीने सौ. करिष्मा अतुल जैस्वाल यांना 'आयडॉल महाराष्ट्र' हा पुरस्कार जाहीर केला आहे.

महाविद्यालयीन जीवनापासून कविता, लेखन, समाजसेवेची आवड असलेल्या सौ. करिष्मा जैस्वाल यांची बीएची शिक्षण घेत असताना एनसएसच्या अध्यक्षपदी निवड झाली होती. संत तुकडोजी महाराज ग्रामगाव मोझरी येथे पाच दिवसीय शिबिरात कुशल कार्यकर्ता म्हणून सहभाग, संत गाडगे महाराजांचे गाव शेणगाव येथे सात दिवसीय शिबिरात हजारोंच्या संख्येत विद्यार्थी उपस्थित होते. त्यात काही लोकांची नेमणूक करण्यात आली, त्यामध्ये टीम लिडर म्हणून 50 विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आणि 7 दिवस उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल टीम लिडर म्हणून सौ. करिष्मा जैस्वाल यांची निवड करण्यात आली. पुणे येथे रामकृष्ण परमहंस मठामध्ये झालेल्या दोन दिवसीय नॅशनल युथ पार्लमेंटमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता.

निबंध लिहिण्याची आवड असल्यामुळे यवतमाळ जिल्ह्यात निबंध स्पर्धेत स्त्री-सक्षमीकरण या विषयावर 5 हजार शब्दांचा निबंध लिहून सहभाग घेतला आणि स्पर्धा जिंकून संपूर्ण जिल्ह्यातून सौ. करिष्मा जैस्वाल यांनी प्रथम क्रमांक पटकावला. त्याचबरोबर महाविद्यालयीन कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेऊन सर्व कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडले. नृत्य, निवेदन, वक्तृत्व, इंग्लिश नाटकामध्ये प्रथम क्रमांक पटकावला. तसेच महाविद्यालयाच्या 'वात्सल्य' या विशेषांकात सौ. करिष्मा जैस्वाल यांचे लेख, कविता व निबंध प्रकाशित करण्यात आले. अमरावती येथे महाविद्यालयातून




स्नेहसंमेलनामध्ये ग्रुप डान्समध्ये द्वितीय क्रमांक पटकावला. अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरूंनी आयोजित केलेल्या एज्युकेशन व्हॅल्यू वर्कशॉपमध्ये महाविद्यालयीन प्रतिनिधी म्हणून प्रतिनिधित्व केले. पुढे नागपूर येथे एमबीए ही पदवी संपादन केली. एमबीए करत असतानाही समाजकार्य सुरूच ठेवले. नागपूर नोटरी क्लब जॉईन करून बालकाश्रमात शिबिरे घेत व अन्नदान करत गावकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतला. गणेश विसर्जनाच्या वेळी निर्माल्य गोळा करणे, स्वच्छता अभियान राबविणे असे विविध उपक्रम सौ. करिष्मा जैस्वाल यांनी राबविले आहेत. काही दिवस त्यांनी कॉर्पोरेट कंपन्यांमध्ये तसेच मेडिकलशी संबंधित प्रकल्पावरही कार्य केले. आयसीआयसीआय बँक असेल किंवा इतर कंपन्यांसोबत वेगवेगळ्या उपक्रमात घेतलेल्या सहभागाची दखल विविध वर्तमान पत्रात घेण्यात मीस फेरेवल म्हणून सौ. करिष्मा जैस्वाल यांची निवड करण्यात आली होती.

शिक्षणाची आवड असल्यामुळे गरजू मुलांची शिकवणी घेत आहेत. लग्नानंतरसुद्धा सौ. करिष्मा जैस्वाल यांचे समाज कार्य सुरूच असून त्यांच्या या कार्यात पतीसह कुटुंबातील सर्व सदस्यांचा सक्रिय सहभाग असतो. त्यांच्या प्रत्येक समाजोपयोगी कार्याला कुटुंबातील सदस्य कायम तत्पर असतात. कुटुंबियांच्या मदतीने वृंदावन येथे आश्रमासाठी व गोसेवेसाठी भरीव दान करण्यात आले आहे. अंगणवाडी सेविकेच्या कोर्समध्ये सौ. करिष्मा जैस्वाल या जिल्ह्यातून सर्वप्रथम आल्या आहेत. ज्यांना नृत्याची आवड आहे त्यांच्यासाठी डान्स क्लास व आरोग्याकडे लक्ष्य देण्यासाठी सौ. करिष्मा जैस्वाल या खास महिलांसाठी फिटनेस क्लाससुद्धा घेत आहेत. माँ फाउंडेशनसह विविध सेवाभावी संस्थेसोबत त्यांचे समाजसेवेचे कार्य अविरत सुरू आहे.

तळागाळातील विद्यार्थ्यांसाठी कार्य करण्याची तळमळ, सामाजिक बांधिलकी जपत समाजासाठी केलेले कार्य याची दखल घेऊनच सौ. करिष्मा जैस्वाल यांना 'आयडॉल महाराष्ट्र' हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. लवकरच छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित कार्यक्रमात या पुरस्कार सोहळ्याचे वितरण करण्यात येणार आहे. या पुरस्काराची निवड झाल्याने सर्वच स्तरांतून सौ. करिष्मा जैस्वाल यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## लोहा शहरातील मुख्य रस्त्यालगत पाच दुकानास आग; लाखोंचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शहरातील स्मशानभूमी समोरील मुख्य रस्त्यालगत पाच दुकानांना आग लागुन दुकानातील लाखों रुपयांच्या साहित्याचे नुकसान झाले. अग्निशमन बंब आणि इतर खाजगी टँकरच्या माध्यमातून एक ते दीड तासानंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले.

लोहा शहरातील बाजारपेठ रविवारी बंद असते. त्यामुळे रविवारी दुकानांत कुणीही नव्हते. सध्या उन्हाची तीव्रता प्रचंड असून तापमान चाळीसच्या जवळ पोहचले आहे. त्यातच आगीच्या घटनेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. शहरातील स्मशानभूमी समोर पत्र्याचे व्यापारी गाळे असून त्यामागे मंगल कार्यालय आहे. दि. २८ रोजी रविवारी दुपारी लग्न समारंभ पार पडल्यानंतर फटाक्यांची अतिष बाजी झाली त्यानंतर कांहीं वेळाने सदरील व्यापारी गळ्यातील दुकनातून प्रारंभी धूर आणि त्यानंतर मोठी आग लागली. सदर पत्र्याच्या व्यापारी गाळ्यापैकी एका दुकानात कापूस साठवला असल्याचे समजते तर दुसरे कुशन वर्क्स, मोटारसायकल रिपेअर दुकान, हार्डवेअर, पाईप, टाकी, फरशी आदींचे दुकान होते. दुपारी एक वाजताच्या दरम्यान अचानक दुकानांना आग लागली. आगीमध्ये जवळपास पाच ते सहा दुकानातील साहित्य आगीच्या भक्ष्यस्थानी पडले.

व्यापाऱ्यांचे जवळपास पन्नास लाखांहून अधिक रुपयांचे नुकसान झाल्याचे व्यापाऱ्यांतून सांगण्यात आले. आग लागल्यानंतर जवळपास दीड तासानंतर अग्निशमन वाहिका, खाजगी पाणी पुरवठा करणारे टँकर आदींच्या मदतीने आग आटोक्यात आली. यासाठी नगरपरिषद अग्निशमन विभागाचे कर्मचारी, पोलिस कर्मचारी, परिसरातील नागरिक यांनी आग आटोक्यात आणण्यासाठी अथक परिश्रम घेतले. उपस्थितांपैकी कांहीं जण शॉर्ट सर्किट मुळे तर कांहीं जण लग्न समारंभातील फटाक्यांमुळे आग लागल्याचे बोलत होते. मात्र नेमकी आग कशामुळे लागली हे समजू शकले नाही.

DONATE

आधुनिक केसरी


आमच्या सुजाण वाचकांना विनम्र आवाहन


वृत्तपत्रांच्या जगात दैनिक आधुनिक केसरी ने वेगळेपण जपत वाचकांच्या मनात अढळ स्थान मिळवले आहे. हे स्थान टिकवून ठेवताना व्यवहारी जगात पैशांचे सोंग आणणे मात्र अवघड आहे. त्यामुळे आमच्या लाखो सहृदय वाचकांना आम्ही विनम्र आवाहन करत आहोत की, दैनिक आधुनिक केसरी जर आपल्याला आवडत असेल तर ते सुरू ठेवण्यासाठी आपण दररोज अगदी 1 रुपयापासून पुढे कितीही रुपयांची मदत आम्हाला करू शकता.

आपले आर्थिक योगदान फोन पे नंबरवर किंवा क्यूआर कोडवर किंवा खाते क्रमांकावर देऊ शकता.

State Bank of India, A/c No. 40533797942, IFS code : SBIN0050896

## उगवतीचे रंग






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

मानव जोपर्यंत प्राथमिक अवस्थेत होता, तोपर्यंत तो निसर्गाच्या जवळ होता. त्याच्यासाठी हे विश्व अफाट, अनादी आणि अनंत होते. पण तो जसजसा प्रगत होऊ लागला, तसतसा निसर्गापासून दूर जाऊ लागला. त्याच्यासाठी मग हे विश्व अनादी आणि अनंत राहिले नाही. ते मर्यादित झाले. किती विरोधाभास आहे बघा ! जेव्हा प्रगती नव्हती, मानव प्राथमिक अवस्थेत होता, तेव्हा हे विश्व विराट होते. पण जसजशी प्रगती होत गेली, निरनिराळे शोध लागत गेले, तसतसे हे विश्व जवळ आले, मर्यादित झाले. मानवाच्या प्रगतीला आकाश खुले झाले. दाहीदिशा मोकळ्या झाल्या. विश्वाला प्रदक्षिणा करायची तर वेळ लागणार. पण आईवडिलांनाच प्रदक्षिणा घातली तर विश्वप्रदक्षिणेचे पुण्य लाभेल. आईवडील म्हणजे विश्वच ! म्हणून गणपतीने विश्वाऐवजी आईवडिलांना प्रदक्षिणा घालून आपल्या बुद्धिमत्तेचा आणि मातापित्यांवरील आपल्या श्रद्धेचा प्रत्यय आणून दिला. मानवाने मात्र आपल्या बुद्धिचातुर्याने आणि वैज्ञानिक प्रगतीच्या जोरावर जणू या विश्वालाही प्रदक्षिणा घातली. पण या गोष्टीला खरोखरंच प्रगती म्हणावं तर अनेक गोष्टींचा संकोच झालेला दिसतो. वैज्ञानिक प्रगतीच्या जोरावर जग कवेत घेणारा माणूस निसर्गापासून मात्र दूर जाताना दिसतो आहे. खरं तर वनस्पती आणि इतर प्राणी यांच्याप्रमाणेच माणूस सुद्धा निसर्गाचाच एक भाग ! पण तो आपली मूळ ओळखच जणू हरवून चालला आहे. त्याची ही प्रगती त्याला खरोखरीच पुढे नेणार की दिवसेंदिवस **क्रमशः**


## बंदिस्त



## हितगुज



पुष्प ५२वे



गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)

### सुजाण पालकत्व

मानवास परमेश्वराने नवनिमिर्तीची विलक्षण उन्मेषशालिनी प्रतिभा दिली आहे. मनुष्य शेकडो वर्षांच्या पलीकडचे खरे अंदाज सहजपणे सांगू शकतो. अप्रतिम चिरंतन कलांची निर्मिती तो सहज लीलया करतो. जे-जे काही अदृश्य व अमूर्त आहे, त्याला साकार रूप व सखोल अर्थ मनुष्याने दिला आहे. बिंदुमात्र अशा छोट्याशा मानवाने सृष्टीची अगणित रहस्ये आजवर उलगडली आहेत. तात्पर्य, अशा अफाट क्षमतेचा हा मानव मुळातच ईश्वराच्या उत्तम आविष्काराचे सजीव उदाहरण आहे. अशा माणसाचा जन्म होणे ही साधीसुधी घडणारी जैविक प्रक्रिया मात्र नाही. ते ईश्वराचे मोठे नियोजन आहे. या नियोजनामुळेच आजवर अनेक चिरंतन कीर्तीच्या महान व्यक्ती होऊन गेल्या. त्यांनी केलेला त्याग, तप, संशोधन, ग्रंथनिर्मिती, अपार सहनशीलता, संस्कृती निर्माण करण्याचे कार्य, मानवकल्याणाचे कार्य हे त्या थोर विभूती असल्याचे चिरंतन दाखले आहेत. अशा देवतुल्य व्यक्ती साधारण माणूस म्हणूनच जन्माला आलेल्या असतात. परंतु त्यांची जडणघडण दूरदर्शी सुजाण पालकांकडून, त्या काळच्या समाजाकडून, ज्ञानाच्या प्रदीर्घ अध्ययनातून, सभोवतालच्या जाणिवेतून, संस्कृतीच्या संस्कारांतून होत असते. म्हणून प्रत्येक बालकाला असे पर्यावरण, परिस्थिती व पालकत्व मिळाले तर त्याच्या जाणिवेच्या, कर्तव्याच्या, कल्पनेच्या कक्षा रुंदावतील व महानतेच्या पंथाचा तोही एक वाटसरू बनेल, यात शंका नाही.

कारण प्रत्येक अस्तित्वाच्या गाभ्यात महानता व हीनतेची बीजे दडलेली आहेत. ज्या प्रकारच्या सामाजिकतेचे, काळाचे, संस्कारांचे माध्यम असेल त्याप्रमाणे ते अस्तित्व आकार व व्यक्तितत्त्व धारण करते.

संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४


## आनंदी पहाट



### समजूतदारपणा व दयाळूपणा बोलण्यातून दिसतो

आधुनिक केसरी

नकारात्मक विचार आपले वजन कमी करतात आणि आपल्या व्यावसायिक तसेच वैयक्तिक जीवनावर परिणाम करू शकतात. नकारात्मक मानसिकता सकारात्मक दृष्टिकोनाकडे वळवण्यासाठी सराव करत राहणे आवश्यक असते. अपयशी होण्याचा एकमेव मार्ग म्हणजे अनुभवातून काहीही शिकणे होय. अपयशांना शिकण्याच्या अनुभवांमध्ये बदलण्यावर आपली उर्जा केंद्रित करावी. जेव्हा आपण आव्हानात्मक परिस्थितीचा सामना करतो तेव्हा अनुभवातून शिकलेल्या, घेतलेल्या धड्याचा आपल्याला उपयोग होतो. स्वतःबद्दल खूप कठोर असणे खरोखर आपल्या कार्यक्षमतेत अडथळा आणू शकते. स्वतःशी अधिक दयाळूपणे वागणे हा तुमच्या मनाला यश मिळवून देण्याचा सर्वोत्तम मार्ग असू शकतो. सुधारित मनोवैज्ञानिक कल्याण आणि शरीराच्या चांगल्या प्रतिमेपासून वाढीव आत्म-मूल्य तसेच वाढीव प्रेरणा या सर्व गोष्टींशी आत्म-करुणा जोडलेली असते. म्हणून, स्वतःशी समजूतदार आणि दयाळूपणे बोलण्याची सवय लावावी. आमचा अंतर्गत संवाद अनेकदा नीट आणि पूर्णपणे होत नाही. आपण ज्याची काळजी घेतो, त्याच्याशी कसे बोलायचे, हेच समजून घेत नाहीत. स्वतःशी बोलणे इतरांशी बोलण्यापेक्षा खूप वेगळे असते. हे विशेषतः परिपूर्णतावादी लोकांसाठी खरे आहे. स्वतःची टीका न करण्याचे आपण नेहमीच लक्षात ठेवावे. आपण अयशस्वी झाल्याबद्दल किंवा चुकल्याबद्दल स्वतःला दोष देण्याऐवजी, आपण विश्वासू मित्राला द्याल तोच सल्ला स्वतःला देण्याचा प्रयत्न करावा. शारीरिक स्तरावर, नवीन गोष्टी शिकणे आपली मेंदूसाठी निरोगी ठरत असते. नवीन कौशल्ये शिकल्याने आपल्या स्मृती स्नायूंना वाकवण्यास आणि एकूण आठवण सुधारण्यास मदत होते. हे मेंदूतील न्यूरॉन्सला उत्तेजित करते, अधिक मज्जासंस्थेचे मार्ग तयार करते आणि विद्युत आवेग त्यांच्या ओलांडून वेगाने प्रवास करू देते. या दोन गोष्टी एकत्र केल्यानेआपल्याला अनेक गोष्टी लवकर शिकण्यास आणि नवीन परिस्थितींशी आत्मविश्वासाने जुळवून घेण्यास मदत होते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### मस्तक चरणी | विठ्ठलाच्या ||

होता तुझी कृपा | आत्माराम जागे ||
मुका बोलु लागे | हरिपाठ ||१||
पांगळ्याशी पाय | देई माझ्या बापा ||
दावी मार्ग सोपा | आनंदाचा ||२||
बहिऱ्याशी देई | श्रवण किमया ||
तेणे ऐकावया | हरिकथा ||३||
आंधळ्यास दावी | मोक्षाची पंढरी ||
चेतवी अंतरी | ज्ञानज्योत ||४||
कृपावंत संत | मुढ झाला ज्ञानी ||
मस्तक चरणी | विठ्ठलाच्या ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

सींक बुन्द सम जगत सुख,
कशा समुन्दर जान ।
परमानन्द को किमि कहूँ, शक्य वचन नहिं ज्ञान ।।०१ ।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल पंचम अध्याय) ०४/०५/०१

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : तृणावरील (गवतावरील) दव बिंदू समान संसारातील सुख आहे आणि शब्द (परमेश्वर) आनंदाचा सागर आहे. त्या परम सुखाचे वर्णन कसे करू ? त्याचे वर्णन करण्यासाठी वाणी मध्ये शक्ती नाही.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## गुणरूपनिरूपण

आधुनिक केसरी

ती पिंडापुरतीच मर्यादित असते. 'शिव कशास म्हणतात' जाणीव जेव्हा विश्वाला किंवा ब्रम्हांडाला व्यापते विश्वापुरती मर्यादित होते, तेव्हा तिला "शिव" म्हणतात. मित्रांनो आपण आकाशाबद्दल देखील असाच विचार करायला हवा. कोणत्याही दृष्य वस्तूंची मग ती वस्तू पिंड असो की ब्रम्हांड असो मर्यादा नसणारी जी शुध्द, निर्भेळ, अनंत जाणीव असते तेचं "परमात्मस्वरूप" होय. त्याचप्रमाणे वस्तूला व्यापणारे आकाश सोडायचे हे दोन्ही सोडून उरणारे शुध्द केवळ अनंत अस्तित्व तेचं परमात्मस्वरूप समजावे. आकाशाला दृश्याने मर्यादा घातली एका अर्थाने ते दृष्याच्या विळख्यात सापडले.सूक्ष्म दृष्टीने पाहिले तर ते ज्ञेयरूपाने अनुभवास येते. ज्ञेयरूप म्हणजे ( वेगळे रूप ) अशाप्रकारे आकाश पाच भूतांपैकी एक आहे. श्रीराम जय राम जय जय राम जय जय रघुवीर समर्थ




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## सगुणभक्ति

आधुनिक केसरी

सर्वांभूती भगवंत आहे याची खात्री पटायच्या आधी, तो माझ्यात आहे हे पटले पाहिजे. सोन्याचा दागिना ‘ मला सोने भेटवा ’ असे म्हणत नाही; त्याचप्रमाणे, मला भगवंत बाहेरून कुठून भेटायचा आहे असे नाही समजू. तो आपल्याजवळच आहे. मनुष्य बोलतो तसा जर वागला तर त्याला त्याची प्रचीती आल्याशिवाय राहणार नाही. मी ‘कुणाचा’ आहे हे जर जाणले तर मी ‘ कोण ’ हे कळायला वेळ लागायला नको. सत्समागम केला म्हणजे मी कोण आहे हे कळते. साक्षीरूपाने नटलेला जो ‘ मी ’, त्याला पाहायला जंगलात जायला नको. ‘ माझेपण ’ सोडावे म्हणजे ‘ मी ’ चा बोध होतो. भगवंत चोहोकडे भरलेला आहे असे आपण नुसते तोंडाने म्हणतो, पण त्याप्रमाणे वागत नाही हे आपले मूळ चुकते. भगवंत माझ्यात आहे तसाच तो दुसऱ्यातही आहे, हे आपण सोयिस्करपणे विसरून जातो. जसा खोलीतला दिवा प्रकाशाने सर्व खोली व्यापून टाकतो, तसे हे सर्व जग भगवंताने व्यापून टाकले आहे. मी कर्ता नसून राम कर्ता आहे हे म्हटले म्हणजे त्यात सर्व आले.



पोशाख निरनिराळे केले तरी मनुष्य हा एकच असतो. संन्यास हा मनाचा असतो, पोशाखाचा नसतो. मनावर कशाचाच परिणाम होऊ न देणे हाच संन्यास. सगुणभक्ती करावी, भक्तीने नाम घ्यावे, नामात भगवंत आहे असे जाणावे, आणि भगवंताचे होऊन राहावे, हाच परमार्थाचा सुलभ मार्ग आहे. साधुसंतांनी अतिशय परिश्रम घेऊन आणि स्वतः अनुभव घेऊन हा मार्ग आपल्याला दाखवून दिला आहे. आपले ज्याच्याशी साम्य आहे त्याच्याशी आपली मैत्री जमते. आपण देही असल्यामुळे आज आपला देवही आपल्यासारखाच, पण त्याच्याही पलीकडे असणारा असा पाहिजे. अशा प्रकारचा देव म्हणजे सगुण मूर्ती होय. लहान मुलगा एखाद्या वस्तूसाठी हट्ट करू लागला की, आपण त्याच्यापुढे त्या वस्तूसारख्या इतर, पण बाधक नसणाऱ्या वस्तू टाकतो. त्याचप्रमाणे, सगुणोपासनेचा परिणाम होतो. दृश्य वस्तूंवर आपले प्रेम आहे; जे दिसते तेच सुखाचे आहे असे आपल्याला आज वाटते; म्हणून आपणच आपल्या कल्पनेने भगवंताला सगुण बनविला आणि त्याची उपासना केली. आपली बुद्धी निश्चयात्मक होण्यात या उपासनेचा शेवट होईल. आग्रह आणि प्रेम फक्त एका भगवंताच्या ध्येयाबद्दल असावे. इतर ध्येये असावीत, पण त्यांचा आग्रह नसावा. प्रपंचामध्ये व्यवहार होत असताना भगवंतापासून जेव्हा वृत्ती हलत नाही, तेव्हा तिला ‘ सहजसमाधी ’ असे म्हणतात. सहजपणाने जगणे, म्हणजे सहजपणातून वेगळे न राहणे, हीच सहजसमाधी होय. ‘ राम सर्व करतो ’ आणि ‘ राम माझा दाता आहे ’ ही भावना ज्याची स्थिर झाली, त्याच्यावर भगवंताची कृपा झाली असे समजावे. त्याच्या जन्माचे सार्थक झाले हे सांगणे नकोच.

**२७६. नाम घेताना स्वतःचा विसर पडणे ही सर्वोत्कृष्ट समाधी होय. नामात स्वतःला विसरण्यास शिकावे.**

## निरूपण

आधुनिक केसरी

**गठीछोडे द्रव्य सोडिती । नाना आळंकार काढिती ।
नाना वस्तु मूषक नेती । या नांव आदिभूतिक ॥ ५० ॥
वीज पडे हिंव पडे । प्राणी प्रजंनी सांपडे ।
कां तो माहापुरीं बुडे । या नांव आदिभूतिक ॥ ५१ ॥
भोवरें वळणें आणी धार । वोसाणें लाटा अपार ।**

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

मंगळवार, ३० एप्रिल २०२४

adhunikkesari.com


# बीड जिल्हा कर्तृत्व व विकासाची क्षमता पाहून मतदान देणार

## धनंजय मुंडे : मोदींच्या विकासाची गॅरंटी बीड जिल्ह्यात पंकजाताईच राबवू शकतात

आधुनिक केसरी न्यूज

**आष्टी :** कोविड सारख्या महामारीच्या काळात दोनदा नव्हे तर तीनदा समस्त देश वासियांना मोफत लस देण्यात आली. ही लस देताना कोणाचीही जात धर्म न पाहता फक्त तो भारतीय आहे म्हणून त्यांना देण्यात आली. भारत देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात कोविड महामारीच्या काळात अनेक इतर देशांना मदत केली. आज कोट्यावधी कुटुंबांना मोफत राशन दिले जाते, ते सुद्धा कोणाचीही जात किंवा धर्म न पाहताच दिले जाते. याही पलीकडे जाऊन मोदीजींच्या नेतृत्वात देश प्रगती करत आहे. त्याच प्रकारची प्रगती व विकास बीड जिल्ह्याला अपेक्षित असून, आता बीड जिल्हा सुद्धा जात-पात धर्म या गोष्टींना थारा न देता कर्तृत्व अंगी असलेल्या व विकासाची क्षमता असलेल्या नेतृत्वालाच लोकसभेत पाठवणार आहे, असे मत राज्याचे कृषिमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते धनंजय मुंडे यांनी आष्टी येथे बोलताना व्यक्त केले आहे.

येत्या वर्षभरात केंद्र व राज्य सरकारच्या संयुक्त प्रयत्नातून नगर - बीड - परळी हा रेल्वे मार्ग तर पूर्ण केला जाईलच, परंतु आणखी दोन वर्षाच्या आत याच रेल्वे मार्गावरून पंकजाताईच्या प्रयत्नातून परळी वरून मुंबईपर्यंत वंदे भारत सारखी स्पीड ट्रेन सुद्धा धावेल, असा विश्वासही धनंजय मुंडे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. आष्टी येथे महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मेळावा मोरेश्वर मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यास धनंजय मुंडे यांनी संबोधित केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकासाची जी गॅरंटी देशाला दिली आहे, तीच विकासाची गॅरंटी बीड जिल्ह्याला केवळ आणि केवळ पंकजाताई खासदार म्हणून देऊ शकतात; असा विश्वासही यावेळी धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला. मराठवाड्याचे 165 टीएमसी पाण्याचे तुटीचे खोरे भरून काढण्याचा प्रकल्पाचा प्रस्ताव शासनाकडे तयार असून यासाठी सुमारे एक लाख 17 हजार कोटी रुपये इतका खर्च येणार आहे. त्यासाठी राज्य




व केंद्र सरकारकडून निधी खेचून आणण्याबरोबरच बँकेकडून अर्थसहाय्य मिळवून देण्यासाठी केंद्रात वजन असलेला खासदार आपल्याला निवडून द्यावा लागेल. या तुटीतून सुमारे 42 टीएमसी पाणी हे आपल्या बीड जिल्ह्याला मिळणार आहे. हे पाणी आल्यानंतर बीड जिल्ह्यात मोठी जलक्रांती होणार असून याद्वारे बीड जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणावर क्षेत्र हे ओलिताखाली येईल आणि आपल्या इथल्या शेतकऱ्यांना आपल्या जमिनीत ऊस पिकवता येईल. त्यामुळे आपल्या भागातून बाहेर ऊस तोडायला जाणारा शेतकरी ऊसतोड कामगार न होता ऊस पिकवणारा बागायतदार होईल असा विश्वासही धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला. राज्य सरकारच्या माध्यमातून मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या मागणीनुसार बीड जिल्ह्यात मराठवाड्यात सर्वाधिक, सुमारे 70 हजार कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप आतापर्यंत झाले आहे. कुणबी नोंदी शोधण्यात सुद्धा बीड जिल्हा मराठवाड्यात सर्वात पुढे आहे. सगे सोयरेचा जीआर काढण्यासाठी त्यावर आलेले आक्षेप निकाली काढून, तो मुद्दाही राज्य सरकार शक्य तितक्या लवकर निकाली काढणार आहे. त्यामुळे आम्ही व आमचे सरकार सगे-सोयरेच्या बाजूनेच आहोत, असे ठाम मतही यावेळी धनंजय मुंडे यांनी मांडले. दरम्यान मला समोरून अनेक वेळा प्रश्न विचारले जातात की कृषिमंत्री म्हणून तुम्ही काय केले मला सांगायला निश्चितच अभिमान वाटतो की शेतकऱ्यांना पिक विमा भरायला स्वतःच्या खिशातून जो पैसा भरावा लागत होता तो मी राज्य सरकारच्या माध्यमातून पूर्णपणे बंद केला असून आता शेतकरी केवळ एक रुपयातच पिक विमा भरू शकतो. पिक विमा बरोबरच शेतकऱ्यांना अवकाळी दुष्काळीचे अनुदान यासारख्या बाबींची ही व्यवस्था सरकारने केली. सोयाबीन व कापसाला सध्या कमी भाव असल्यामुळे जून महिन्यामध्ये सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना चार हजार कोटींचे पॅकेज राज्य सरकार देणार असल्याचेही धनंजय मुंडे यांनी यावेळी स्पष्ट केले आहे. आम्ही काय केले असे विचारणारे समोरचे उमेदवार त्यांच्या पाठीशी आम्ही सोबत राहून मागील लोकसभा निवडणुकीत त्यांनी बीड जिल्ह्यातून पाच लाख मते मिळवली ही पाच लाख लोक कोविड सारख्या संकटात असताना उमेदवार मात्र साखर झोपेत होते का असा सवालही धनंजय मुंडे यांनी उपस्थित केला. इथल्या खासदारांनी किंवा सरकारने काय केले हे विचारायला उमेदवार थेट पाच वर्षांनी एकदा येतात असा आरोपही धनंजय मुंडे यांनी यावेळी बोलताना केला. आज समोरील उमेदवार हे जातीपातीचे राजकारण करत आहेत, त्यांनी अगदी सुरुवातीलाच स्वतःचे कुणबी प्रमाणपत्र काढून घेतले; त्यावर कोणाचाही आक्षेप नाही. मात्र स्वतःचे कुणबी प्रमाणपत्र गुपचूप काढून घेऊन त्याचा राजकीय लाभ एका निवडणुकीत घेतला, त्याऐवजी वीस - पंचवीस हजार गोरगरीब व गरजू लोकांना या कुणबी प्रमाणपत्राचा लाभ मिळवून दिला असता तर खरेच यांच्या मनाचा मोठेपणा आम्ही पाहिला असता असा टोलाही धनंजय मुंडे यांनी लगावला. यावेळी आ.बाळासाहेब आजबे, मा.आ.भीमराव धोंडे यांसह मान्यवरांनी आपले मत मांडत पंकजाताई मुंडे यांना आष्टी-शिरूर-पाटोदा मतदारसंघातून सर्वाधिक मताधिक्य देण्याचे आवाहन केले. व्यासपीठावर आ.बाळासाहेब काका आजबे, मा.आ.भीमराव धोंडे, डॉ.शिवाजीराव राऊत, रामकृष्ण बांगर, वणवे दादा, वाल्मिक निकाळजे, किशोर नाना हंबर्डे, साहेबराव मस्के, दीपक घुमरे, शंकर देशमुख, विश्वास नागरगोजे, बबन अण्णा झाम्बरे, विठ्ठल सानप, भाऊसाहेब लटपटे, काकासाहेब शिंदे, अजय धोंडे, लालाभाऊ खुमकर, धैर्यशील थोरवे, महाराष्ट्र केसरी सईद चाऊस, पप्पू गुंड, रघुनाथ शिंदे, हरिभाऊ जंजिरे, सतीश बडे, बबनराव आवळे, प्रफुल सहस्त्रबुद्धे, असताक शेख, नाजीम शेख यांसह आदी उपस्थित होते.

# जातीच्या चक्रव्युहात पंकजाताईला टाकतंय कोण ?

## लोकशाहीच्या मंदिरात विकास श्रेष्ठ की जात, मतदारच ठरवणार ?

आधुनिक केसरी



***पंकजाताई असं एक महिला नेतृत्व ज्यांनी राजकारण करताना जात-पात धर्माचा आधार कधीच घेतला नाही. सकारात्मक दृष्टी, विकासाचा ध्यास, संवेदनशीलता आणि समाजातील अठरापगड जातीधर्माच्या कल्याणासाठी केलेला संघर्ष. सत्ता पदाच्या काळात केवळ विकास म्हणजे विकास एवढेच नाही तर माझा जिल्हा-माझी माणसं हे ज्यांनी डोळ्यासमोर ठेवलं त्या उमेदवार म्हणुन बीड लोकसभा मतदारसंघात महायुतीच्या वतीने निवडणुक लढवत असताना विरोधक त्यांना जातीच्या चक्रव्युहात टाकण्याचा प्रयत्न करत असुन नव्हे तर युद्ध भुमीवर कौरवी भुमिकेत असलेल्या दुष्टांनी जात हेच अस्त्र बाहेर काढल्याचे लक्षात येतं. मात्र सुज्ञ मतदार आणि सामान्य जनतेला जातीपेक्षा पंकजाताईच्या नेतृत्वातली क्षमता महत्वाची वाटत असुन एक महिला नेतृत्व बीड जिल्ह्याचे भाग्य बदलायला निघाले असताना विरोधकांच्या दिशाभुल भुमिकेला भीक न घालता त्यांना विजयी करण्याचा निर्धारच जणु काही करून ठेवला.***

पंकजाताईच्या काही गोष्टी खरं पाहता जवळुन बघायला हव्या. महाविकास आघाडीच्या वतीने समोर बजरंग सोनवणे शरद पवार राष्ट्रवादी गटाच्या वतीने निवडणुकीला उभे असले तरी राष्ट्रीय स्तरावरचं एक महिला नेतृत्व आणि सोनवणे यांच्यात तुलना होवु शकते का ?एक साधा प्रश्न केज नगर पंचायतीच्या वॉर्डात स्वतःच्या मुलीला सोनवणे यांना निवडुन आणता आलं नाही याचाच अर्थ राजकिय गुणवत्ता पडताळुन पहायली तर नेतृत्व क्षमता लक्षात येते. दुसरीकडे महिला नेतृत्व राष्ट्रीय स्तरावर काम करताना ज्यांनी मागच्या पंधरा वर्षापासुन बीड जिल्ह्याच्या राजकारणात विकासाची आणि सुसंस्कृत वैचारिक चळवळ उभा केली. स्व. गोपीनाथराव मुंडेंनी एकेकाळी पंकजाताईला केवळ पाच वर्षे राजकारणासाठी द्यावीत हा विचार पुढे केला तदनंतर त्यांचे दुर्दैवी निधन झालं. साहेबांना मानणारे कार्यकर्ते आणि सामान्य जनता त्यांचं काय? हा प्रश्न जेव्हा पुढे आला त्यावेळी एखाद्या गोवर्धन पर्वताएवढं दुःख छातीत दडवुन ठेवलं आणि केवळ पित्यावर प्रेम करणाऱ्या लोकांच्यासाठी जनसेवेचे धनुष्य हाती घेवुन राजकिय मैदानात उतरल्या. 2014 ला संघर्ष यात्रेच्या माध्यमातुन महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जावुन तत्कालीन काळात महायुतीचं राज्य आणण्यासाठी संघर्ष केला. परिणाम सत्ता आली. ज्यात पंकजाताई ग्रामविकास मंत्री म्हणुन आणि बीड जिल्ह्याचं पालकमंत्री पद त्यांच्याकडे आलं. पालकमंत्री पदाच्या काळात एक-एक क्षण त्यांनी जिल्ह्याच्या विकासासाठी आणि सामान्य जनतेच्या कल्याणासाठी घालवला. आदर्श पालकमंत्री आणि पालकत्वाची जबाबदारी काय असते? हे त्यांनी दाखवुन दिलं. माझा जिल्हा-माझी माणसं सुत्र डोळ्यासमोर ठेवुन त्यांनी शत्रुला देखील मदतीची भुमिका घेतली. आपल्या जिल्ह्याचं राजकारण केवळ निवडणुकीपुरतं असावं अंकात मांडायचं झालं तर 20 टक्के राजकारण आणि 80 टक्के समाजकारण त्यांनी प्रत्यक्ष कृतीतुन दाखवुन दिलं. कुणाचाही द्वेष न करता विकासाच्या पंक्तीत बसणाऱ्या समाजातील अठरापगड जातीधर्माच्या लोकांना सारखीच वाढ केली. खरं तर राजकारणात पुढारी आजकाल विकासाच्या योजना देताना अनेक ठिकाणी जातीपातीचा आधार घेवुनच योजना



राबवतात. मात्र पंकजाताईनं आपल्या जिल्ह्यात विकासाच्या वाटा मोकळ्या करून ठेवल्या. गाव तिथे विकास हे त्यांचे सुत्र ज्यातुन बीड जिल्ह्यातील असं एकही गाव नाही जिथे पंकजाताईच्या विकासाची ज्योत पेटली नाही. सर्वात उपलब्धी सांगायची झाली तर पालकमंत्री पदाच्या काळात राजकिय सुडातुन पाच वर्षात एकाही पोलीस ठाण्याला कुणाविषयी गुन्हा दाखल करा अशा प्रकारचा फोन कधीच नाही. कारण त्यांना द्वेषाचं आणि सुडाचं राजकारण कधी जमलंच नाही. हा त्यांचा स्वभावातला समर्पकपणा पाहिला सामान्य जनतेने म्हणुनच राजकारणापेक्षाही पुढे जावुन आपल्या जिल्ह्यातील माय-बाप सामान्य जनता या माऊलीवर रक्ताच्या नात्यापलीकडे जावुन प्रेम करते. वर्तमान राजकिय स्थितीत महायुतीच्या वतीने निवडणुक लढवत असताना प्रचारकाळात विरोधकांनी त्यांच्याविषयी नकारात्मक घंटा कुठेच वाजु शकत नाही ही गोष्ट ध्यानात आल्याबरोबर सुरूवातीपासुनच जातीपातीच्या चक्रव्युहात आडकवण्याचे प्रयत्न चालु केलेले दिसुन येतात. जे सामान्य जनतेला रूचेना झालं. सुरूवातीला म्हटल्याप्रमाणे बजरंग विरूद्ध पंकजाताई गुणवत्तेच्या दृष्टीने नेतृत्व क्षमतेची तुलना होवु शकत नाही. सोनवणे यांनी राजकिय स्वार्थापोटी अजितदादा पवार गटाला धोका देवुन शरद पवार गटात प्रवेश केला. जो माणुस बेडकासारख्या उड्या मारतो, जो आपल्या नेत्यावर निष्ठा ठेवु शकत नाही, असा नेता जनतेचा होवु शकतो का? हा प्रश्न सामान्य लोकांना पडला तर दुसऱ्या बाजुने पंकजाताई खासदारकीला उमेदवारी मागण्यासाठी कुणाच्या दारात गेल्या नव्हत्या.देशाच्या एकुण राजकिय परिस्थितीत धर्म-अधर्माच्या लढाईत एक महिला सक्षम नेतृत्व सोबत असावं म्हणुन पक्षाच्या आदेशाचे पालन करताना जबाबदारी त्यांच्यावर येवुन पडली. मतदान 13 मे रोजी असुन निवडणुकीच्या प्रचाराचा दुसरा टप्पा सुरू आहे. 2009 पासुन जिल्ह्याच्या राजकारणात मुंडे कुटुंबाविरूद्ध जातीपातीचं राजकारण विरोधक करत आले. पण सामान्य लोकांनी कधीच थारा जातीपातीच्या राजकारणाला दिला नाही. वर्तमान स्थितीत प्रचार दरम्यान बजरंग सोनवणे यांच्याकडून केवळ जातीपातीच्या आधारावरच प्रचारात रंग दिला जातोय. ज्यांना निवडणुकीशिवाय कधी आपली जात आठवत नाही. अशांना निवडणुकीतच जातीपातीचं राजकारण कसं आठवतं? असा सवालही आता आपल्याच समाजांनी सोनवणेसमोर उभा केला. केवळ राजकिय फायदा घेण्यासाठी ज्या विरोधकांना जात महत्वाची वाटते त्यांनी केवळ अशा प्रकारचा घाणेरडा आदर्श नव्या पिढीच्या समोर मांडला तर सुसंस्कृत समाज आणि पिढी निर्माण होण्यासाठी फार मोठा धोका होवु शकतो. सामाजिक भिती मोठ्या प्रमाणावर वर्तवली जात असताना विरोधकांनी जणु काही जातीपातीच्या राजकारणाचा या मतदारसंघात यज्ञ कुंडच उभा केला. ज्यात रोज जातीच्या समिध्या टाकुन यज्ञ प्रज्वलित करण्याचा प्रयत्न केला जातो. एकीकडे पुरोगामी विचाराचा वारसा म्हणायचं. छत्रपती शिवाजी महाराज, शाहु, आंबेडकर, फुले यांचे नाव घ्यायचं तर दुसरीकडे निवडणुकीत केवळ जातीपातीचा रंग भरून आपल्या व्यक्तीस्वार्थासाठी राजकारणात घाण निर्माण करायची. हे आता खऱ्या अर्थाने बीड जिल्ह्यातील अठरापगड जातीधर्माच्या सुशिक्षित, प्रज्ञावंत लोकांनी चांगलंच ओळखुन सोडलं आहे. निवडणुका व्यक्ती नेतृत्वाच्या क्षमतेवर लढवल्या जातात आणि लढवाव्यात हाच विचार मतदारांच्या मनात घर करून बसलेला असतो. देशाच्या राजकारणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मागच्या दहा वर्षात सबका साथ-सबका विकास सुत्र डोळ्यासमोर ठेवुन हा देश सर्व शक्तीशाली बनवला. विकासाची गंगा सामान्य लोकांच्या दारात नेवुन टाकली. स्वातंत्र्यानंतरचे देशातील प्रलंबीत प्रश्न या नेतृत्वाने मार्गी लावले. राम मंदिराची उभारणी, काश्मिरमधील 370 कलम, तीन तलाक सारखा प्रश्न शिवाय गरीब कल्याणासाठी 800 मोठ्या योजना चालु केल्या. हा विचार बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य माणुस करतच आहे. आपल्या जिल्ह्याचे भाग्य उजळण्यासाठी पंकजाताई हाच एक उत्तम पर्याय असुन क्षमतावान नेतृत्व म्हणुन जातीपातीच्या राजकिय अस्त्राचा केला जाणारा प्रयोग हा बीड जिल्ह्यातील शेतकरी, कष्टकरी, दीनदलित, वंचित, उपेक्षित, व्यापारी, महिला वर्ग, अगदीच म्हणलं तर शेवटचा माणुस देखील या लोकांना मान्यच नाही. बजरंग सोनवणे यांनी जात अस्त्राचा कितीही मोठा प्रयोग करण्याचा प्रयत्न जर केला तरी झुगारून लावण्यासाठी सुज्ञ जनता पुढे सरसावली हे नक्कीच.

## ओवैसींचे उत्तर

आधुनिक केसरी

काँग्रेस सत्तेत आली, तर जनतेचा पैसा जास्त मुले असणाऱ्यांना वाटून टाकेल, असे विधान पंतप्रधान मोदी यांनी राजस्थानमधील एका सभेत बोलताना केले होते. त्यांच्या या विधानानंतर काँग्रेससह विरोधकांकडून त्यांना लक्ष्य करण्यात येत आहे. एआयएमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी यांनीही यावरून पंतप्रधान मोदी यांच्यावर टीकास्त्र सोडले आहे. पंतप्रधान मोदी हे खोटारडे पंतप्रधान असून उलट देशात मुस्लीम लोकसंख्या घटत असल्याचे ते म्हणाले. हैदराबादमध्ये आयोजित सभेत ओवैसी त्यांनी पंतप्रधान मोदी यांच्यावर जोरदार टीका केली. पंतप्रधान मोदी खोट बोलत असून ते देशात मुस्लीम आणि दलितांविरोधात द्वेष पसरवण्याचे काम करत आहे. ही मोदी गॅरंटी आहे. पंतप्रधान म्हणतात की देशात मुस्लीम लोक सर्वाधिक मुले जन्माला घातलात. पण नरेंद्र मोदी यांना सहा भाऊ आहेत, तर अमित शाहा यांनाही सहा बहिणी आहेत. तरीही हे लोक मुस्लिमांच्या मुलांबाबत बोलतात, अशी टीका औवेसी यांनी केली. मोदी सरकारच्या आकडेवारीनुसार देशात मुस्लिमांचा प्रजनन दर सर्वात कमी आहे. तसेच दिवसेंदिवस मुस्लिमांची लोकसंख्याही घटत आहे. महत्त्वाचे म्हणजे देशात सर्वाधिक कंडोम कोण वापरत असेल तर ते मुस्लीम लोक वापरतात, असे मी म्हणत नाही, तर मोदी सरकारची आकडेवारी सांगते. मात्र, तरीही मुस्लीम लोक जास्त मुलं जन्माला घालतात, असे मोदी म्हणत आहेत. याचं कारण भाजपा आणि संघाच्या लोकांना हिंदूंच्या मनात भीती निर्माण करायची आहे. एका विशिष्ट काळात देशात मुस्लिमांची संख्या हिंदूपेक्षा जास्त होईल, अशी भीती ते हिंदुंना दाखवतात. मात्र, असं कधीही होणार नाही, असेही ते म्हणाले. रविवारी राजस्थानच्या बन्सवाडा येथे पंतप्रधान मोदींची प्रचारसभा पार पडली. यावेळी त्यांनी काँग्रेसला जोरदार टीका केली होती. आधी जेव्हा त्यांचे (काँग्रेस) सरकार होते, तेव्हा त्यांनी सांगितलं होतं की देशाच्या संपत्तीवर पहिला अधिकार मुस्लिमांचा आहे. याचा अर्थ हे संपत्ती गोळा करून कुणाला वाटणार? ज्यांची जास्त मुलं आहेत त्यांना वाटणार, घुसखोरांना वाटणार. तुमच्या कमाईचा पैसा घुसखोरांना दिला जाणार का? तुम्हाला हे मान्य आहे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित जनतेला केला होता. तसेच “काँग्रेसचा जाहीरनामाच हे सांगतोय की ते देशातील महिलांकडच्या सोन्याचा हिशोब घेतील आणि नंतर ती संपत्ती वाटून टाकतील. मनमोहन सिंग सरकारनं म्हटलं होतं की देशाच्या संपत्तीवर पहिला अधिकार मुस्लिमांचा आहे. हा शहरी नक्षलवादाचा विचार आपल्या महिलांकडचे मंगळसूत्रही वाचू देणार नाहीत, असेही मोदी यावेळी म्हणाले होते.



कॉ. के.के. जांबकर
मो. 9422870578

## भाजपा हाऊसफुल्ल : बाकी सबकी बत्ती गुल

आधुनिक केसरी

**आपल्या देशात सध्या आठराव्या लोकसभा निवडणुकीचा उत्सव धुमधडाक्यात चालू आहे. देशातल्या कांही भागात मतदानाचे दोनटप्पे पूर्ण झालेत. घटनाकारांनी भारतीयांना मतदान हा दिलेला अनमोल ठेवा असून संपूर्ण जगात आपल्या लोकशाहीचे एक आगळेवेगळे स्थान आहे. लोकांचे-लोकांनी-लोकांसाठी निवडलेले नेतृत्त्व असल्यामूळे बहुतांश जतना लोकसभेसाठी ६० ते ६५ टक्के या उत्सवात सहभागी होऊन पाच वर्षासाठी आपला प्रतिनिधि निवडतात.**



वर्तमान परिस्थित आपली लोकशाही व्यवस्था तारुण्य आवस्थेत आली आहे असे म्हणावण्यास हरकत नाही. तारुण्य अवस्था म्हणजे विचार व कृतीने म्हणावी तशी परिपक्व नसते त्यासाठी आधार लागतो तो विचारांच्या संयम व योग्य कृतीचा मागच्या वर्षीच आपण स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा केला. देशाला स्वातंत्र्य मिळून पाऊनशे वर्षे झाली. त्यातील निम्म्यापेक्षा जास्त कालावधीत देशावर काँग्रेसने अखंड सत्ता उपभोगली. काँग्रेसी पुढारी हे स्वातंत्र्य आंदोलनात सक्रिय सभागी होते. देशात इतर फारसे राजकीय पक्ष नसल्यामूळे जनतेने काँग्रेसी नेत्यांचे नेतृत्त्व मान्य करून पुन्हा-पुन्हा त्यांना सत्तेत बसविले. तत्कालीन कॉग्रेसचे नेते हे स्वातंत्र्य चळवळीत जसे निरपेक्ष भावनेने सहभागी होते तसे सत्तेत देखील जनकल्याणसाठी बांधील होते. स्वातंत्र्यप्रप्तीनंतरच्या तीन दशकानंतर मात्र या नेत्यांमध्ये घराणेशाही व स्वहीताचीच जास्त जपवणूक होऊ लागली. त्यामूळे या घराणेशाही पलीकडील चळवळीतील नेत्यांनी आपापले छोटे-छोटे प्रादेशिक पक्ष काढून स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्याचे प्रयत्न सुरू केले. नेहरू व गांधी घराणेशाहीच्या एकतर्फी नेतृत्त्वाला ही मंडळी कंटाळल्यामूळे वैयक्तिक स्वार्थापोटी, काँग्रेस विस्कळीत होऊ लागली. अशातच काँग्रेसीनेत्यांचे देश व समाजहीताकडे दुर्लक्ष होण्यात सुरुवात झाली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या सत्ता उपभोगानंतरही काँग्रेसीनेत्यांनी देशाला म्हणावे तसे विकसीत केले नाही. जात-पात-धर्म याचे अवास्तव महत्त्व वाढत गेले. काँग्रेसपासून विभक्त झालेल्या छोट्या छोट्या गटाला एकत्र करून आघाडी सरकारे स्थापण्यास सुरुवात झाली. आघाडी सरकाच्या काळात आपापसातील मतभेदामुळे देशाचा म्हणावा असा विकास झाला नाही. म्हणून अशी सरकारे अल्पायुषी ठरत गेली. याच परिस्थितीचा फायदा घेऊन काँग्रेस विरुद्ध भाजपा सारखे राष्ट्रीयपक्ष जोर धरू लागले.

भाजपा सारख्या राष्ट्रीय पक्षाने हिंदू व देश विकासाचा अजेंडा जनतेसमोर ठेऊन मतदारांवरील आपली पकड घट्ट करत राहिले. त्यामूळेच भाजपामध्ये मोदी सारखे संयमी व संन्यासी नेतृत्व पुढे येऊन २०१४ पासून भाजपाने देशात निर्वाद सत्ता हस्तगत केली जी जनतेला भावली. घराणेशाही व आघाडी सरकारच्या कारभाराला कंटाळलेल्या जनतेने पुनःश्च २०१९ ला भाजपाच्या हातात निर्वाद सत्ता दिली. हा साधारणतः दहा वर्षाचा कालावधी आहे. २०१४-२०२४ या काळात भाजपाने देशाला अंतरराष्ट्रीयस्तरावर एक आगळेवेगळे महत्त्व मिळवून दिले. जनहितासह देशविकासही होऊन आपण सर्वजण स्वावलंबी झालो पाहिजेत हेच यांच्या सत्ता उपभोगाचे मुख्य कारण म्हणावयास हरकत नसावी. सत्ता उपभोगाच्या कार्यकाळात भाजपाच्या तुलनेत काँग्रेससह इतर छोटे-मोठे प्रादेशिक विरोधी पक्षनेतेही आपला फारसा प्रभाव जनतेवर दाखवू शकले नाहीत. ही विरोधकांची खरी चुक म्हणावी लागेल. देशासह समाजहिताच्या अजेंड्यावर भाजपवाले प्रगती करीत असतांना त्यांच्या नेतृत्त्वाने पुरेपूर प्रामाणिक प्रयत्न करून जनतेचा पांठींबा पुनःश्च प्राप्त केला. निंदकाचे घर असावे शेजारी या म्हणी प्रमाणे मागील दहा वर्षाच्या काळात विरोधकांनी वर्तमान सरकार विरोधात प्रभावीपणे धोरणात्मक विरोध केला नाही. विरोधासाठी विरोध करणे व वायफळ बडबड करून नको त्या गोष्टी पुढे आणून आपली प्रतिमा आणखीनच मलीन करून घेतली. उठसुट महागाई, बेरोजगारी, आरक्षण, शेतमालाला भाव, नोट बंदी, हिंदू अजेंडा, मूळघटनेत बदल करणे या सारखे प्रश्न पुन्हा पुन्हा समोर ठेऊन आपण सत्तेत आल्यावर असे प्रश्न प्राधान्याने सोडवू अशी फोल आश्वासने देत आहेत. मागील ५० वर्षांच्या काँग्रेस राजवटीत असे प्रश्न होतेच नां ! मग त्यांनी अशा प्रश्नांचा सजग व प्रामाणिकपणे निपटारा का केला नाही. आज आपल्या देशाची लोकसंख्या १४० कोटीच्यावर आहे. विरोधक मंडळी जरी नानावीध फसव्या घोषणा करून पुनःश्च सत्तेत आली तरीही असे प्रश्न पुर्णतः सुटणार आहेत काय ? याचे उत्तरही नकारार्थीच असेल. दैनंदीन जीवनात नवनवीन समस्या निर्माण होत असतात. त्याचा प्रामाणिक व पारदर्शीपणे राहून कुण्याही सत्ताधारी पक्षाने ते सोडवीले पाहिजेत हेच जनतेला अपेक्षित असते. नेमका हाच धागा धरून ८० टक्के भारतीयांच्या मनाचा संवेदनशिलतेने विचार करून वर्तमान सरकार कार्यरत आहे. विरोधकांजवळ देश व जनहितासाठी निश्चित असे धोरण नाही. हे जनमतावरून स्पष्ट होते विरोधकांनी निंदा जरूर करावी पण कुत्सीत हेतूने नव्हे. विरोधकांच्या कळपात वर्षानुवर्षे सत्ता उपभोगलेले अनेक नेते असून त्यांचा आजही खुर्ची व घराणेशाहीचा मोह सुटत नाही.

प्राप्त परिस्थितीत देशाच्या केंद्रस्थानी जनसामान्यांचे हित व देशविकास समोर ठेऊन देशाला नवनवीन क्षितिजावर व जागतीक स्तरावर नेऊन ठेवण्याचे कसब फक्त मोदींसारख्या नेतृत्त्वातच आहे. बाकी सब फेल. असे जनता म्हणते. कांही विरोधक आपली पुर्वाश्रमीची पापे झाकण्यासाठी भाजपाच्या मुख्य विकास प्रवाहात सहभागी होत आहेत.

ही भाजपाची भुमिका चूकच म्हणावी लागेल. वर्तमान परिस्थितीत लोकशाहीत गुणवत्तेपेक्षा संख्यात्मकतेला जास्त महत्त्व आहे. ही संख्यात्मकता जमविण्यात भाजपावाले परफेक्ट आहेत. भूतकालीन सत्ताधाऱ्यांनी परिस्थितीचे सूक्ष्म अवलोकन केल्यास वर्तमान सत्ताधारी गुणात्मकरीत्या जनतेला सरस वाटतात. म्हणूनच २०१४ पासून २०२४ पर्यंत परत जनतेनी भाजपाला सत्तेत बसविले. एकंदरीत वर्तमान भारताची राजकीय परिस्थीती पाहता भाजपा हाऊसफुल्ल आणि बाकी सबकी बत्ती गुल असेच म्हणावे लागेल. **निर्भय वही है । जो सत्य की शरण मे है । जो असत्य का सहारा लेता है । वो हमेशा भय में रहेता है ।**

**हीच वर्तमान राजकीय परिस्थिती आहे.**



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

## अध्ययन काळात मनस्थिती प्रसन्न ठेवणे लाभदायी

आधुनिक केसरी

**विद्यार्थी दशेत असताना आपण दैनंदिन जे वाचन करतो त्या पैकी आपल्याला किती समजत अथवा किती आपल्या स्मरणात राहत यावर आपलं यश ठरत अथवा निश्चित होत असत.अध्ययनाच्या काळातील आपली मनस्थिती कशी आहे यावर आपल्या यशाच गमक व गणित अवलंबून असतं. त्यामुळे हि वेळ अनेक अर्थाने महत्वाची असुन या वेळेत अनेक प्रकारची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. तंदुरुस्त रहाणं, सकारात्मक उर्जावान असणं त्याच बरोबर आहार विहार व्यायाम  सगळ्यांचा सुयोग्य मेळ घालता आला तर मनस्थिती उत्तम राहते.भविष्य घडवण्यासाठी अभ्यास करणं आवश्यक आहे. त्याच नियोजन आणि पुर्णत्व या मध्ये आपण फसता कामा नये.अभ्यास हा दाखविण्यासाठी कारायची बाब मुळीच नाही तर फलनिष्पत्ती होण्यासाठी करण गरजेच असत.**

महणुन विद्यार्थी दशेत आपण स्वतःला खूप प्रचंड तंदुरुस्त प्रफुल्लित आणि सहज ठेवल पाहिजे.तसं ठेवता येण हिच बाब अंतिमतः यशस्वी होण्यासाठी खुप महत्वपूर्ण आहे.त्या अनुषंगाने दैनंदिन जीवनात किमान एक तास तरी आपल्याला जो खेळ प्रकार आवडेल तो खेळ खेळणं अपेक्षित आहे.हे शक्य नसेल तर एक तास शारिरीक कसरत केली तरीही उत्तम त्याच बरोबर आपल्या अभ्यासाचं नियोजन कसं आहे. त्या नुसार जेवणाच नियोजन करावं अभ्यास करण्याच्या चार पाच तास अगोदर भरपेट जेवण केलं तरी हरकत नाही पण अध्ययन काळात अन्नाचा प्रभाव होऊन अळस अथवा झोप येईल असा आहार घेऊ नये.म्हणजे अध्ययन काळातील जेवणाच व्यवस्थित नियोजन समजलं पाहिजे. अध्ययन काळात जास्तीत जास्त हलका फुलका आहार घ्यावा अथवा लिक्वीड फुड अथवा ज्युस तसंच वेगवेगळे सुप घ्यावेत. जेणेकरून अध्ययन काळातील मनस्थिती प्रसन्न राहील.तसं पाहिलं तर शिकायची वयोमर्यादा नसते खरी पण शालेय जीवनातील अभ्यास विशेष महत्वपूर्ण असतो. त्यावर आपलं भवितव्य अवलंबून असतं.आपण अभ्यास कसा करतो यावरच आपल्या यशाच मुल्यमापन आणि आपलं भविष्य देखिल ठरत हे वास्तव असलं तरी सर्वसाधारण पणे अभ्यास सहजासहजी कोणालाही करू वाटत नाही हेच वास्तव आहे. अभ्यास हा ताण तणाव घेऊन नाही तर आत्म प्रेरणेने मन लावून करणं गरजेचं असतं.पण बहुतांश तरूणांच्या संदर्भात असं होतं नाही. विद्यार्थी दशेत असताना अभ्यास कसा किती कधी करावा या संदर्भात अनेक वेगवेगळ्या प्रकारच मार्गदर्शन सोशल माध्यमात उपलब्ध आहे.त्या पैकी काय स्वीकारल पाहिजे अथवा काय स्वीकारणं हितकारक ठरेल या पेक्षा हि आपण जितका वेळ अभ्यास करू तितका वेळ आपली मनस्थिती अगदीं प्रसन्न व सहज असली पाहिजे.मुळात अध्ययन हि रोजंदारी प्रक्रिया नाही हे अगोदर समजणं गरजेचं आहे.कि आपल्याला कोणीतरी रोजाने कामाला लावलय असं घडाळाच्या काटयाकड पाहत तास मोजणयाची पद्धत अध्ययनात चालत नाही. इतर कामांसाठीची उपयोगीता इथं लागु पडत नाही.पालक शिक्षक अथवा आई वडील यांच्या पैकी कोणी रागवतय म्हणून आपण अभ्यास करतोय अथवा समोर पुस्तकांचा लावाजामा घेऊन बसलोय हा मुळात अभ्यास अध्ययन नाही. अभ्यास म्हणजे स्वतःच परफेक्ट नियोजन करून दिवसातील एक विशिष्ट कालावधी ज्या कालखंडात आपण स्वतःला उच्च चेतनेत ठेवु शकतो आणि सहा ते आठ तास सलग योग्य पद्धतीने तलिन अवस्थेत राहुण पुस्तकांशी एकरूप होऊ शकतो.असा कालावधी तितकाच वेळ अगदी मन लावून अभ्यास करणं गरजेचं आहे.अभ्यास किती केला या पेक्षा कसा केला हे महत्वाचं असल्याने है गणित समजून घेऊन यशस्वीपणे सोडवण म्हणजे आपलं यश आपण अर्जित करणं होय.आपल्या सुरक्षित यशस्वी भविष्यासाठी अभ्यास मनातुन प्रसन्न चित्ताने करा उगाच वेळ मोजत बसुन स्वतःची व कुटुंबाची फसवणूक होणार नाही.याची दक्षता घ्या. काळ कितीही कठिण असु द्या काळाच्या पुढे दहा पावलं मार्गक्रमण करा . स्वतःच यश सुनिश्चित करण्यासाठी झोकुन देऊन मेहनत करा सर्मपण हे जीवन हितार्थ असतं याची जाणीव ठेवून अध्ययन काळात मनस्थिती प्रसन्न आणि चैतन्य युक्त ठेवली पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२,  छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore *   Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar  414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# राजुरेश्वरांच्या पायथ्याशी प्रचाराचा श्रीगणेशा: महायुतीची उमेदवार खा. रावसाहेब दानवेंच्या प्रचाराचा नारळ फुटला



आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. बाळासाहेब बोराडे**

**श्रीक्षेत्र राजूर :** जालना-छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार तथा केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवेंनी प्रचार शुभारंभ प्रसंगी जालना जिल्ह्याचे ग्रामदैवत राजुरेश्वराची मनोभावे पूजा करून दर्शन घेतले व निवडणूक प्रचाराचा नारळ फोडला. याप्रसंगी भोकरदन तालुक्यातील राजूर येथे झालेल्या प्रचार सभेत नामदार दानवेंनी मतदारांशी संवाद साधला. यावेळी मंचावर राज्याचे पणन मंत्री अब्दूल सत्तार, आ.नारायण कुचे, आ.संतोष दानवे, माजी आ .सांडू पाटील लोखंडे, जालना लोकसभा प्रभारी एजाज देशमुख, प्रदेश चिटणीस सुरेश बनकर, मनसे जिल्हाध्यक्ष गजानन गिते, मनसे शहर अध्यक्ष रवि राऊत, श्रीराम महाजन,राष्ट्रवादी काँग्रेसचे चंद्रकांत काटके,केशवराव तायडे,सतिष घाटगे, जालना जिल्हाध्यक्ष बद्रिनाथ पठाडे, भास्करराव दानवे, रामेश्वर भांदरगे, भाजपचे जेष्ठनेते शिवाजीराव थोटे, जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ, गणेश बापू फुके, लोकसभा प्रमुख विजय औताडे, रामदास पालोदकर, श्रीरंग साळवे, जि.प.सदस्या आशाताई पांडे, सरपंच प्रतिभाताई भुजंग, विजय चव्हाण, भुषण शर्मा, ठगन भागवत यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

याप्रसंगी नरेंद्र मोदींच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवेंच्या उपस्थितीत अनेक कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. यामध्ये नळणीचे माजी सरपंच ज्ञानेश्वर बोर्डे, सागर जैस्वाल, शेख मुस्ताक, अफसर शहा, असिफ शहा, कृष्णा बोर्डे, गणेश बोर्डे, समाधान बोर्डे यांसह अनेक कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.नामदार रावसाहेब दानवे यांच्या हस्ते पुष्पहार व शाल देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपचे जेष्ठ नेते शिवाजीराव थोटे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र भोसले यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महायुतीची पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

### ही निवडणूक विकासाच्या मुद्द्यावर :केंद्रीयमंत्री रावसाहेब दानवे



मागील दहा वर्षात मोदी सरकारने जो विकासाचा अजेंडा राबवला तो काँग्रेसला 75 वर्षातही साध्य करता आला नाही .मोदीजींच्या नेतृत्वात देशाचा विकास होत असून सामान्यांच्या जीवनात बदल घडून येत आहे . म्हणून ही निवडणूक विकासाच्या मुद्द्यावर लढवली जाणार आहे . पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांना पंतप्रधानपदी विराजमान करण्यासाठी जनतेने महायुतीच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहण्याचे आवाहन जालना संभाजीनगर लोकसभा मतदार संघाचे उमेदवार नामदार रावसाहेब पाटील दानवे यांनी जनतेला केले . भोकरदन तालुक्यातील श्रीक्षेत्र राजुर येथे निवडणूक प्रचाराच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते .

विकासाच्या मुद्द्यावर दानवेंनी काँग्रेसला खुले आव्हान दिले .काँग्रेसने आतापर्यंत 80 वेळा राज्यघटनेत बदल केला आहे . काँग्रेसने डॉ .बाबासाहेबांचा पराभव केला . त्यांना लोकसभेत जाऊ दिले नाही .भारतरत्न सन्मान देण्यास टाळाटाळ केली .शेवटी व्ही .पी .सिंग सरकारच्या काळात भाजपने डॉ .बाबासाहेबांना भारतरत्न पुरस्कार देण्यासाठी पाठिंबा दिल्याची आठवण त्यांनी करून दिली .

सबका साथ सबका विकास या धर्तीवर 140 कोटी जनतेसाठी विकासभिमुख योजना राबवल्या . 80 कोटी गरीब लोकांना मोफत अन्नधान्य पुरवठा केला .दहा कोटी लोकांना गॅस कनेक्शन दिले .स्वच्छतागृहासाठी अनुदान दिले .चार कोटी लोकांना पक्की घरे बांधून दिली .एक रुपयात पिक विमा, सहा हजार कोटींची सिमेंट रस्ते, एक हजार कोटींची पाणी पुरवठा योजना, सौर ऊर्जा प्रकल्प, शेतीमध्ये सरकारची गुंतवणूक यासारख्या जनहीतकारी योजनांची माहिती दिली .महायुतीच्या कार्यकर्त्यांनी मतभेद विसरून आपापला गाव सांभाळावा .मेरा बूथ, सबसे मजबूत या युक्ती प्रमाणे बूथ मजबूत करण्याचा सल्ला कार्यकर्त्यांना दिला .



### विकासाची गंगा सामान्यापर्यंत पोहोचत आहे – मंत्री अब्दुल सत्तार

केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून अनेक योजना राबवल्या जात आहेत . नामदार दानवेंच्या प्रयत्नाने जालना–जळगाव रेल्वेचा प्रश्न मार्गी लागलाआहे . मतदार संघातील लोकांना पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळावे म्हणून जलजीवन मिशन अभिमान , डांबरीकरण आणि सिमेंट रस्त्यांचा विकास , मातोश्री पांदण रस्ता, शेतकरी सन्मान योजना, घरकुल योजना, तसेच अतिवृष्टी व दुष्काळासाठी शेतकऱ्यांना 17 हजार कोटी रुपयांची नुकसान भरपाई, भविष्यात गाव तेथे गोडाऊन ही संकल्पना राबविण्यात येणार आहे .ही निवडणूक विकासाच्या मुद्द्यावर लढवली जात आहे .त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून विकासाची गंगा सर्वसामान्यांच्या घरापर्यंत पोहोचत असल्याचे मत राज्याचे मंत्री अब्दुल सत्तार यांनी सांगितले . नेहमीप्रमाणेच मंत्री सत्तारआणि नामदार दानवेंमध्ये शेर शायरी आणि कलगीतुऱ्याचा सामना रंगला होता .

## ढोकसांगवी येथे हरिनाम सप्ताहाची सांगता

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. सुभाष शेटे**

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यातील पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रानजीक असणाऱ्या श्री क्षेत्र ढोकसांगवी येथे आयोजित अखंड हरीनाम सप्ताह सोहळ्याची भक्तिमय वातावरणात सांगता झाली. येथील श्री हनुमान मंदिर प्रांगणात बुधवारी, दि.१७ ते मंगळवारी, दि.२३ सांगता झालेल्या या सात दिवशीय सप्ताह काळात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यंदा सप्तांहाचे हे २० वे वर्षे असून सप्ताह काळात विणापूजन, ज्ञानेश्वरी पुजन, ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ, प्रवचन, किर्तन, जागर, दिंडी सोहळा, दीपोत्सव व महाप्रसाद असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.या निमित्ताने गावातून अत्यंत



भक्तीमय वातावरणात, टाळ, मृदंगाच्या साथीत, वारकरी संप्रदाच्या भगव्या पताका उंचावत, हरिनामाचा जयघोष करीत दिंडी सोहळा काढण्यात आला होता. या दिंडी सोहळ्यात ग्रामस्थ व महिला भाविक मोठया संख्येने सहभागी झाल्या होत्या. सप्ताह काळात मेघा पाचंगे, विष्णू महाराज पोंदाळ, ठकाराम महाराज मलगुंडे, भास्कर महाराज सरोदे,साहेबराव महाराज आगरकर यांची प्रवचने तर एकनाथ महाराज वाडीकर, प्रांजलीताई पानसरे, योगिताताई थरकुडे, तुळशीदास महाराज रसाळ, बाबाजी महाराज चाळक, नवनाथ महाराज माशेरे यांची कीर्तने तर हनुमान जयंतीच्या दिवशी मधुकर महाराज शिंगाडे यांच्या काल्याच्या कीर्तनाने अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय वातावरणात सांगता झाल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

## शिरूरच्या शिंदेवाडी येथे बैलगाडा घाटात जोरदार हाणामारी; एकाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**कवठे येमाई :** शिरूरच्या पश्चिमेकडील मलठणच्या शिंदेवाडी येथे रविवारी दि.२८ श्री खंडोबा यात्रेनिमित्त बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. बैलगाडा शर्यत सुरू असताना बैलगाडा घाटातच भानुदास ज्ञानोबा शिंदे, ज्ञानोबा गोविंद शिंदे व संजय रखमा शिंदे या स्थानिक नागरिकांमध्ये पुर्वी झालेल्या हाणामारीच्या वादातून घाटातच अचानक वादावादी होऊन जोरदार हाणामारी झाली. त्यामुळे बैलगाडा शर्यती तातडीने बंद करण्यात आल्या. या भांडणाचा बैलगाडा शर्यतीशी कुठलाही संबंध नसल्याचे यात्रा कमिटी कडून सांगण्यात आले आहे.

शिंदेवाडी येथील स्थानिक भाविकीतील दोन कुटुंबात ही वादावादी झाली आहे. पूर्वीच्या हाणामारीच्या वादातून त्यांच्यात कायम शिवीगाळ होत होती अशी माहिती मिळत असून.काल रविवारी घाटात झालेल्या मारहाणीत संजय रखमा शिंदे वय अंदाजे ३५ हे गंभीर जखमी झाले होते.त्यांच्यावर शिरूर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते. रात्री १० च्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला आहे.या खुन प्रकरणी भानुदास ज्ञानोबा शिंदे, ज्ञानोबा गोविंद शिंदे यांच्यावर शिरूर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला असून शिरुर पोलिस अधिक तपास करत आहे.

शिरूरच्या बेट भागात सध्या गावोगावी यात्रा- जत्रा सुरू असून बैलगाडा शर्यत,तमाशा हे यात्रेचे मुख्य आकर्षण बनले आहे. बंद झालेल्या शर्यती सुरू झाल्यापासून बैलगाडा प्रेमी प्रत्येक यात्रेतील शर्यतीत सहभाग नोंदवत आहे. बेट भागातील टाकळी हाजी कुडांवरील मळगंगा देवीची सर्वात मोठी यात्रा भरते. ही यात्रा दोन दिवसावर आली असून प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवण्याची मागणी होत आहे.

किरकोळ वादावरून राग मनात ठेवून हाणामारी होत आहे.अशा प्रकारे तंटे, हाणामारी झाल्यास यात्रा बंद होवू शकते, त्या ठिकाणी पुन्हा बैलगाडा शर्यतीला परवानगी मिळत नाही. यात्रा दरम्यान संवेदनशील गावांमध्ये अधिक पोलीस बंदोबस्त ठेवण्याची मागणी नागरीकांमधुन होत आहे.

## डॉ. कल्याण काळे आज बदनापूर-भोकरदन दौऱ्यावर

### मतदारांशी संवाद साधणार : प्रचार सभांचेही आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** जालना लोकसभा मतदार संघातील महाविकास (इंडिया) आघाडीचे उमेदवार डॉ. कल्याण काळे हे दि. 30 एप्रिल रोजी भोकरदन व जाफ्राबाद तालुक्यातील विविध गावांना भेटी देवून मतदारांची संवाद साधणार आहेत. या दौऱ्यात त्यांच्या प्रचार सभांचेही आयोजन करण्यात आले आहे.

मंगळवार दि. 30 एप्रिल रोजी बदनापूर तालुक्यातील वाकुळणी येथे सकाळी 7 वाजता भेट देवून डॉ. कल्याण काळे हे गावातील मतदारांशी संवाद साधणार आहे. त्यांनतर सकाळी 7.30 वाजता बाजार वाहेगाव, सकाळी 8 वाजता नाणेगाव, 8.30 वाजता रोषणगाव येथे भेट देवून मतदारांशी संवाद साधणार आहे. त्यानंतर सकाळी 9 वाजता सोमठाणा येथे बाजार गेवराई, रोषणगाव, सेलगाव या जिल्हा परिषद गटांसह बदनापूर शहराची प्रचार सभा आयोजीत करण्यात आली आहे. दुपारी 1 वाजता बदनापूर शहरात विविध भागात भेटी देवून मतदारांशी संवाद साधणार आहेत. सायंकाळी 4 वाजता दाभाडी येथे दाभाडी जिल्हा परिषद गट, बावणेपांगरी जिल्हा परिषद गटाची प्रचार सभा आयोजीत करण्यात आली आहे. तर सायंकाळी 6 वाजता भोकरदन तालुक्यातील हसनाबाद येथे हसनाबाद, राजुर आणि तळेगाव या जिल्हा परिषद गटाची प्रचार सभा आयोजीत करण्यात आली आहे. या प्रचार दौऱ्यात उमेदवार डॉ. कल्याण काळे यांच्या समवेत महाविकास (इंडिया) आघाडीचे सर्व प्रमुख नेते, पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष, संबंधीत तालुक्यातील सर्व तालुकाध्यक्ष यांची उपस्थिती राहणार असून महाविकास (इंडिया) आघाडीचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आपआपल्या गावात व जिल्हा परिषद गटातील प्रचार सभेस उपस्थित राहावे असे आवाहन महाविकास आघाडी प्रचार समन्वय समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



# मुलीने सासरीच रहावं असा सल्ला बजरंग सोनवणेंनी दिलाच कसा?

## शरद पवारांच्या राष्ट्रवादीची भूमिका? हा तर महिलांचा अपमान : प्रवक्ता राम कुलकर्णी

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** आपल्या कुटुंबात सुन म्हणुन आलेली



मुलगी बाहेरची असते असं म्हणत शरदचंद्र पवारांनी महिलांना हिणवल्यानंतर बीड लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या वतीने निवडणुक लढवणारे उमेदवार बजरंग सोनवणेंनी आपल्या नेतृत्वाचा कित्ता गिरवताना मुलीने सासरीच राहिलं पाहिजे असं म्हणत हा तर महिलांचा घनगोर अपमान केल्याची टिका भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी केली असुन त्यांच्या पक्षाचीही भुमिका अशाच प्रकारची राहिल्याचे ते म्हणाले. प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, बारामतीत राजकिय स्वार्थ साधण्यासाठी शरदचंद्र पवारांनी महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवारांना बाहेरचे पवार म्हणत सुनेचा जाहिर अपमान केला. त्यावरूनच त्यांच्या पक्षाची महिलांच्या विषयी असलेली मानसिकता ओळखायला हवी. खरं तर वडिलधाऱ्या भुमिकेत कुटुंबात वावरणाऱ्या सासऱ्यांनी आपल्या सुनेची अशा प्रकारे अवहेलना करणं योग्य नाही. तोच कित्ता बीड लोकसभा मतदारसंघात निवडणुक लढवणारे बजरंग सोनवणे यांनी गिरवत महिलांनी सासरीच रहायला हवं असं म्हणत समस्त महिला, भगिनींचा अपमान केल्याची टिका कुलकर्णी यांनी केली. खरं तर पुरूषांनी अशा प्रकारे राजकिय स्वार्थापोटी महिला जगताची अवहेलना करणं हीच फार मोठी चुक असुन सामाजिक गुन्हा म्हणावा लागेल. बाप जेव्हा मुलीचं लग्न करून सासरी पाठवतो तेव्हा अधुनमधुन माहेरी येणं ही खऱ्या अर्थाने भारतीय रूढी, परंपरा, संस्कृती, आपलेपणाचं नातं आणि कुटुंब व्यवस्था मानवी उत्पत्तीपासुन चालत आली. शरद पवार राष्ट्रवादी गटाच्या अशा घाणेरड्या मानसिकतेमुळेच अलीकडे सर्वोच्च न्यायालयाने वडिलांच्या संपत्तीवर मुलीचा हक्क संविधानाने असतो आणि त्या प्रकारे एका प्रकरणात निकाल देताना कायदा देखील बनवला. मात्र करंटेपणा ज्या पुरूषाच्या अंगी भरलेला असतो अशी माणसं महिलांच्या बाबतीत अवहेलनात्मक भाषा का वापरतात? दुर्दैव असल्याचे त्यांनी म्हटले आहे. सोनवणे यांनी मुलींच्या बाबत केलेले वक्तव्य निषेधार्थ असुन आपणही एका मुलीचे बाप आहोत हे जर आत्मस्वरूपी परीक्षण करून पाहिलं तर मग त्यांना मुलीनं सासरीच राहिलं पाहिजे. या वाक्याचा पश्चाताप झाल्याशिवाय रहाणार नाही का? हा सवाल देखील राम कुलकर्णी यांनी केला.मुळात शरद पवार गटाची भुमिका महिलांच्या बाबतीत अशाच प्रकारची आहे का? ज्यामुळे सतत महिला जगताची अवहेलना केली जाते. याचा खुलासा पक्षाचे प्रदेश अध्यक्ष जयंतराव पाटलांनी करायला हवा असंही त्यांनी पत्रकात म्हटलं. बजरंग सोनवणे यांनी केलेल्या वक्तव्यानंतर बीड जिल्ह्यात महिला वर्गात प्रचंड संतापाची लाट पसरलेली असुन याचा फटका निश्चितच सोनवणे यांना निवडणुकीत बसु शकतो.

# पंकजाताईच्या विजयासाठी भाशिप्रचा पुढाकार

## राष्ट्रीय विचारात शिक्षक कार्यकर्ता पुढे

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** मराठवाड्याच्या शिक्षण क्षेत्रात सर्वदुर कार्य विस्तार असलेल्या भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचा शिक्षक कार्यकर्ता तथा सभासद हा खऱ्या अर्थाने राष्ट्रीय विचाराने प्रभावित असुन विचार कुलाच्या अधिन कर्तव्य बजावताना सक्षम राष्ट्र निर्माण ज्याला बळकटी देण्यासाठी नेहमीच पुढे राहिला. स्व. गोपीनाथराव मुंडे आणि भाशिप्र या संस्थेचा ऋणानुबंध आगळा वेगळा असुन संस्था प्रगतीत त्यांचे योगदान भरीव राहिले. त्याच ऋणानुबंधाचा धागा पुढे चालु ठेवताना पंकजाताई मुंडेंनी घेतलेली सहकार्याची भुमिका ज्यामुळे अनेक प्रश्न मार्गी लागले. वर्तमान निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर पंकजाताईच्या विजयासाठी भाशिप्रच्या शिक्षक कार्यकर्त्यासह सभासदांनी विशेष पुढाकार घेत जबरदस्त फिल्डिंग लावली ज्यातुन राष्ट्रीय विचाराला देखील बळकटी मिळणार आहे. तसं पाहता केवळ मतदान नव्हे तर शिक्षक कार्यकर्ता देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व पुन्हा यावं आणि बीड जिल्ह्यात पंकजाताई प्रचंड मताने विजयी व्हाव्यात यासाठी प्रचार रथाचा श्रीकृष्णाच्या भुमिकेत सारथ्य करताना दिसतो. बीडात आशिर्वाद मंगल कार्यालयात या सर्व पार्श्वभुमीवर भव्य मेळावा संपन्न झाला. ज्यात मतदान जनजागृती विषय घेण्यात आले.




राष्ट्र विचाराने प्रेरित असलेल्या भारतीय शिक्षण प्रसारक ही संस्था ज्याकडे संघ विचाराची शक्ती म्हणुन पाहिल्या जाते. लोकशाही मार्गाने देशात सक्षम राष्ट्राची पुर्नबांधणी करण्यासारखे कार्य असेल तर या संस्थेचा घटक कधीच मागे राहिला नाही. संस्था स्थापनेपासुन राष्ट्र आणि समाजहिताच्या कार्यात कमालीचा पुढाकार असतो. स्व. गोपीनाथराव मुंडे यांचा ऋणानुबंध संस्थाप्रती कमालीचा होता. ज्यांच्या सहकार्यातुन अनेक संस्कार केंद्राची भौतिक प्रगती झाली. वर्तमान स्थितीत त्याच ऋणानुबंधाचा धागा संस्थेच्या प्रति कायम ठेवताना महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडेंनी देखील संस्थाप्रति असलेल्या आस्थेत तिळाएवढी घट होवु दिली नाही. प्रशासकिय पातळीवर संस्थेच्या अनेक अडचणी त्यांच्या सहकार्यातुन मार्गी लागल्या. एव्हाना अधुनमधुन संस्था परिवारात त्यांची उठबस असते. बीडच्या आशिर्वाद मंगल कार्यालयात मतदार जनजागृती करण्यासाठी संस्थेच्या वतीने पुढाकार घेत भव्य मेळाव्याचे आयोजन केले. ज्यात संस्था कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, चंद्रकांत मुळे, राम कुलकर्णी, अमरनाथ खुरपे, अविनाश तळणीकर, आप्पाराव यादव, श्री आडे, वर्षाताई मुंडे, मुरलीधर बप्पा ढाकणे, राजेंद्रजी मस्के, योगेश क्षीरसागर आदी मान्यवरांची उपस्थिती होती. जिल्हाभरातुन ८०० पेक्षा अधिक शिक्षक कार्यकर्ते मेळाव्यासाठी आले होते. पंकजाताईंना मोठ्या प्रमाणावर मतदान मिळवुन देण्यासाठी शिक्षक कार्यकर्त्यांनी व्यापक अभियान हाती घेतलं. ज्याची माहिती प्रास्ताविकातुन प्रशासकिय अधिकारी चंद्रकांत मुळे यांनी दिली. एकास वीस मतदार आणि पुन्हा सकारात्मक दृष्टीने चाळीस मतदार इथपर्यंत पोहोचण्यासाठी शिवाय मतदान जनजागृती कशी करणार? या संदर्भात मुळेंनी आढावा घेवुन संस्था आपल्या पाठीमागे खंबीरपणे उभा असल्याची साक्ष दिली. राम कुलकर्णी यांनी तर देशाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रूपाने सक्षम नेतृत्व मिळाले ज्यांनी जगाच्या पाठीवर भारतमातेची प्रतिष्ठा वाढवत शक्तीशाली देश ओळख निर्माण केली. असा एक पंतप्रधान ज्यांच्या मोबाईलवर रशिया-युक्रेन युद्धबंदी झाली आणि पंधरा हजारपेक्षा अधिक तिथे अडकलेले भारतीय विद्यार्थी विमानाने आणले हे केवळ मोदीमुळे. एवढ्या क्षमतेच्यासमोर विकासाभिमुख दृष्टी असलेले नेतृत्व पंकजाताई बसणार त्यामुळे संस्थेच्या सर्व घटकांनी आपलेपणातुन नेतृत्वाच्या विजयासाठी पुढाकार घ्यायला हवा असे आवाहन केले.
अमरनाथ खुरपे यांनी तर देशात नरेंद्र मोदी आणि बीड जिल्ह्यात पंकजाताईच्या विजयासाठी भाशिप्रचे शिक्षक कार्यकर्ते प्रचार रथाचे सारथी असुन विकसनशील नेतृत्व म्हणुन पंकजाताईच्या पाठीशी खंबीरपणे काम करणार असल्याचे सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य म्हणाले की, संस्था शिक्षक कार्यकर्ते, आणि सभासद राष्ट्रहित आणि आपल्या बीड जिल्ह्याचे हित लक्षात घेता पंकजाताईच्या पाठीमागे खंबीरपणे उभा असुन मतदान करणं ही राष्ट्र कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन उमेश जगताप यांनी केले. कौटुंबिक आपलेपणातून उपस्थित असलेल्या पंकजाताईनं आपल्या भाषणात मनमोकळेपणे विचार मांडले. शिक्षक प्रज्ञावंत आहे. त्याच्या हातुन सुसंस्कृत समाजाची उभारणी होते. जात बघुन मैत्री सुद्धा होत नाही.
निवडणुकीत लोकशाहीसारखे आदर्श सोहळ्यात मात्र जात हे शस्त्र बाहेर काढल्या जाते ही खंत त्यांनी बोलुन दाखविली. लोकसभेची निवडणुक लढवण्याची माझी इच्छा नव्हती. मी त्याची मागणी केली नाही. पण जेव्हा धर्म-अधर्म परिस्थिती पुढे येते. महाभारतात कुरूक्षेत्राच्या रणभुमीवर अर्जुनाची लढाईला सामोरे जाताना जशी अवस्था झाली तेवढं दुःख मला प्रितमताईला बाजुला केल्याचे होते. पण श्रीकृष्णाने अर्जुनाला मार्गदर्शन केलं आणि काळाची गरज म्हणुन सारथ्य देखील केलं. वर्तमान सामाजिक परिस्थितीत धर्माच्या लढाईत पक्षाने मला उमेदवारी दिली. माझीही अवस्था अर्जुनासारखी झाली. मात्र राष्ट्र पुनर्बाधणी आणि सक्षम समाज उत्थानासाठी अंतिम ध्येय नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान पदी बसवणं त्यासाठीच कदाचित मला पक्षाने आदेशित करून उमेदवारी दिल्याचे त्या म्हणाल्या.
माणसाचं कर्तृत्व आणि शुद्ध चारित्र्य संपन्न नेतृत्व असेल तर समाजात वजन असते. कधीकधी मी माझे स्वतःचे नियम लावते जे की मला अडचणीचे ठरतात. संघाच्या मुशीत मी वाढल्याचे सांगताना जातीपात धर्म हा भेदभाव राजकारणात कधीच केला नाही. हे सांगताना बीड जिल्ह्याचे भाग्य बदलण्यासाठी मला संधी देण्याचे आवाहन त्यांनी केले. या संस्थेसोबत ऋणानुबंधाचा वारसा कायम ठेवताना हा परिवार माझा आहे. मला इथे वेगळेपण काहीच वाटत नाही. शिक्षक कार्यकर्त्यांनी २० मतदार मिळवताना अजुन २० असे मतदार आपल्या विचाराच्या बाजुने वळवावेत जे की नकारात्मक असतील. देशात नरेंद्र मोदी आणि आपल्या जिल्ह्यात पंकजाताई हे नेतृत्व का नको? असा सवाल करा आणि नाही म्हणणाऱ्याला आपल्या बाजुने सकारात्मक रूपांतरीत करा. संघ विचारातच माझं जीवन घडलं असल्याने त्याग, समर्पण, संवेदनशीलता आणि शेवटच्या माणसाचं कल्याण यासाठी मी अविरत भुमिकेत काम करत असते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमोर बसुन काम करताना प्रत्येक क्षण आपल्या जिल्ह्यासाठी कारणी लावणार असं सांगुन त्यांनी उपस्थित शिक्षक कार्यकर्ता भगिनीचे कौतुक केले. प्रत्येक मतदारांनी मतदान करणे हे कर्तव्य असुन जनजागृतीसाठी भाशिप्रने घेतलेला पुढाकार खऱ्या अर्थाने सामाजिक दायित्वाचा भाग असल्याचे त्या म्हणाल्या. कार्यक्रमाचे आभार संचालक श्री बाबुराव आडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज आणि सरस्वती प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन मान्यवरांच्या शुभ हस्ते झाले. श्री मिरगे यांनी वैयक्तिक पद्य म्हटले. या मेळाव्यासाठी मोठ्या प्रमाणावर शिक्षक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# धर्माबादेत रोजगार हमीची कामे ठप्प

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** येथून जवळच असलेल्या सीमावृत्तीय तेलंगणा राज्यात सकाळी साडेसात पासून ते अकरा वाजेपर्यंत सर्वत्रच रोजगार हमी योजनेची कामे उपलब्ध असून प्रत्येक ठिकाणी शेकडो मजूर वेगवेगळी कामे करून अल्पावधीत आपल्या संसाराला आर्थिक हातभार लावत असल्याचे चित्र दिसत असून त्या मानाने धर्माबाद शहर असं तालुक्यात रोजगार हमी योजनेचे कुठलेच काम चालू नसल्याचे दिसून येत आहे.
धर्माबाद तालुक्यात रोजगार हमी योजना जॉब कार्ड धारकांची संख्या जवळपास साडेसातशे ते हजाराच्या घरात असली तरी रोजगार हमी योजनेच्या कामावर जाण्याची त्यांची मानसिकताच नसल्याचे चित्र आहे. याची कारण मी माणसा केली असता अत्यल्प मजुरी दर हे एकमेव कारण असून रोजगार हमी योजना अंतर्गत ज्या ज्या ठिकाणी कामे प्रस्तावित केलेली आहे. त्या ठिकाणी लोक जेसीबीने किंवा इतर यांत्रिक पद्धतीने लवकरात लवकर कामे करून घेऊन त्यांची बिले मात्र रोजगार हमी योजना अंतर्गत मजूर दाखवून उचलत आहेत पण कामे करीत आहेत.
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही केंद्र सरकारची महत्वाकांक्षी योजना असून या योजनेअंतर्गत काम मागणाऱ्या लाभार्थ्यांना अकुशल रोजगार पुरविला जातो. यामध्ये १०० दिवसांपर्यंत रोजगाराची कमी केंद्र सरकारची आहे. व त्यानंतरची रोजगाराची हमी राज्य सरकार देते. योजनेचे संपूर्ण कामकाज हे संगणकीकृत असून लाभार्थी यांच्या बँक खात्यात त्यांच्या मजुरीची रक्कम जमा होते. हे सर्व कामकाज पारदर्शक पद्धतीने केले जाते. या योजनेंतर्गत सार्वजनिक तसेच वैयक्तिक कामे देखील घेता येतात. बेरोजगारांना रोजगार निर्माण करून देण्याबरोबरच शाश्वत मत्ता निर्माण करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. सदरील योजनेचा लाभ घेण्यासाठी जॉब कार्ड असणे गरजेचे आहे.

**तेलंगणात अकरापर्यंत वेगवेगळी कामे**


असे जॉब कार्ड काढलेल्यांची संख्या धर्माबाद तालुक्यात 700 ते हजाराच्या घरात असल्याची माहिती प्राप्त होत असली तरी त्या मानाने रोजगार हमी योजनेची कामे करण्याची मानसिकता सदरील मजुरांची नाही हे तितकेच खरं! उपरोक्त पार्श्वभूमीवर मात्र तेलंगाना राज्यात सगळीकडे सकाळच्या सत्रात अकरा वाजेपर्यंत वेगवेगळी कामे मजूर करीत असल्याची सुंदर दृश्य दिसत आहे .
आपल्या भागात सरकारं योजनेवर भरमसाठ निधी खर्च केल्याचे दाखवत आहे मग प्रत्यक्षांत एवढी उदासीनता का हा मुख्य चर्चेचा विषय बनला आहे .योजना अमलात आणण्यासाठी प्रशासकिय व्यवस्थेची बेपरवाही होत आहे की कामगारांची उदासीनता असा प्रश्न निर्माण झाला आहे

# पंचायतराजमंत्र्याच्या विजयासाठी ठेकेदार लागले कामाला

आधुनिक केसरी न्यूज

**महेश तारमळे**

**ठाणे :** आपला नेता निवडून आला की पाच वर्ष केवळ ठेकेदारी जोपासून करोडोचा मलिदा कमविणाऱ्यांची निवडणूक हि शेती झाली असून निवडणूकीत महिनाभर फिरायचे व पाच वर्ष चरायचे, कमावलेल्या कमाईतुन थोडासा हातसैल सोडून पुढिल ठेकेदारी शेतीची मशागत करण्यांचा धंदा येथील ठेकेदारांनी सुरू केला आहे,जनतेच्या मुलभूत सोईसुविधा बाबत लोकप्रतिनिधीना तसही समाजाशी काहीहीदेण घेण नसलेल्या ह्या राजकिय ठेकेदाराच्या गाड्याचा धूरळा उडू लागला आहे,गावो गावच्या गावपुढारीना हाताशी धरून आपला स्वार्थ साधण्याचा डाव रचला जातोय,भावकित गावकित दुहिची बीज पेरून हे आपसं मतलब साधण्यात पटाईत असल्याने सुज्ञ नागरिक मतदार बंधूनी आत्मपरिक्षण करून माणूसकीला "वाव"देणारी माण शोधावीत माणूसकिचा "आव"आनणारी नकोत? या ठेकेदारी जमातीचा सत्तेतुन पैसा व पैशातुन सत्ता! हे एकच उद्धीष्ट असल्याने स्वताच्या प्रतिष्टेसाठी प्रत्येकाला पद हवं आहे,आणी पदासाठीच धडपड चालू आहे,सन २०१९-२०- या दोन वर्षाच्या कोरोनी महामारीत मतदार किंवा नागरिकांना वाऱ्यावर सोडणाऱ्यांना त्या दिवसांचा विसर पडून साड्या लुगडी वाटपाचा फार्स करीत



महिलांची दिशाभूल करण्याच्या प्रयत्न सुरू असलं तरी ते दिवस लोक विसरले नाहीत व गॅस ३४४ चा गॅस ११२० वर नेऊन ठेवल्याचे अच्छे दिन सुरू असल्याचे विसरून विसरता येणार नाहीच,आत्ताच्या घडीला एकाबाजूला वाड्या पाड्यावर कुपोषणाचा विळखा पडला आहे,पोटासाठी अदिवासींच वाढता स्थलांतर,भिषणपाणी टंचाईन त्रस्त नागरिक मुलभूत सोईसुविधा अभावि मेटाकुटीस आलेली जनता व अशा परिस्थितीत महिलाना साड्या वाटपाच अमिष दाखवल जातंय,अस असल तरी या निवडणूकीच गोरगरीब जनतेला सोयर सुतक नाही व कोणला काही पडलं नाही व कोणाच काही अडल नाही ? या निडणूकित ठेकेदार,भूमाफिया,दलाल,राजकारण्या साठी पर्वणी असून आमदार असो की खासदार यांनी ठराविक ठेकेदार हाताशी धरून त्यांचा विकास साधला आहे,जनतेच्या समश्यावर स्वताची पोळी कसी भाजता येईल या कडे लक्ष केंद्रीत केल गेल आहे,जाती पातीच्या नावावर स्वताचा स्वर्थ साधणाऱ्यांची तोंड भले हि विरूदध दिशेला असतील मात्र उदिष्ट एकच आपली पोळी कशी भाजता येईल,गेल्या महिणा भरा पासून मतदार समाजाशी देणघेण नसलेले गाड्याचा धुरळा उडवित फिरू लागले आहेत आपला खासदारच यायला हवा या साठी हे आटापिटा करतायत वाड्या पाड्यावर दादा,आण्णा, आप्पा,भाई असे ठेकेदार आपली पोळी भाजण्यासाठी घिरट्या घालू लागले आहेत यांच्या मोहजळात अडकलात तर हेही दिवस जाणार नाहीत तर,या पैक्षा वाईट दिवस वाट्याला येतील याचा विचार करून पाऊल उचलायला हवं.

# कपिल पाटिल- बाळ्या'मामा'त काट्याची टक्कर ?

आधुनिक केसरी न्यूज

**महेश तारमळे**

**ठाणे :** भिंवडी तालुक्यातील काल्हेर गावचा आमदार खासदार नसला तरी घराबाहेर पडला की मागे पुढे गाड्याचा गराडा कायम कुठल ही पद नसताना सदैव प्रचंड गर्दीतील हा नेता,जनतेच्या मनातील बाळ्या "मामा" ला मामा किंवा दादा बोलणारेच जास्त, सुरेश म्हात्रे म्हणजे फक्त कागदोपत्री नांव होय, १६ व्या वर्षी भाड्यांन रिक्षा वाला, नोकर, ते कॉन्ट्राक्टर निवडणुकात पराभव झाला तरी लोंकाचे प्रश्न सोडवित राहिल्याने सोबत जातपात न पाहता दारी आलेल्या याचकास मदत करणे हा "वसा" जोपासत असल्याने व गोडावूनच्या माध्यमातुन हजारो तरूणांना रोजगार उपलब्ध करून दिल्याने लाखो कुंटूबांची दुवा लाभली असून सन २०१८-१९ च्या कोरोना महामारीत हजारो गोरगरीब अदिवासी कुंटूबांना मदतीचा हात देणारा हया नेत्याला वाडी वस्तीवर साहेब नव्हे तर बाळ्या मामा ह्या नावाला पसंती दिली जातेय.

राज कारणाचा फायदा मामा ला घेता आलाच नाही,सन २००९



शिवसेवा विधानसभा उमेदवारी २०१४ ला मनसे उमेदवारी शिवसेना संपर्क प्रमुख जबाबदारी २०२१ कॉग्रेस प्रवेश २०२२ला शिंदे गटात प्रवेश तर जानेवारी २०२४ ला शरद पवार गटात प्रवेश व महाविकास आघाडीची उमेदवारी कुठल्याच पक्षात फायदा न घेता केवळ पक्षांतर करून सुद्धा बाळ्या मामा ची ईतकी हवा कां तर बाळ्या मामा एक दिलदार व्याक्ती महत्व असल्याने गोरगरीबांसाठी सदैव मदतीसाठी तत्पर असल्याने सर्वसामान्य नागरिकात त्याच्या नावा अपुलकी दडून आहे,दोन वेळा भिवंडी लोकसभेचे खासदार असलेले व देशाचे पंचायतराजमंत्री पदि विराजमान असलेल्या भाजपाच्या कपिल पाटलां समोर देखील हे दिलदार अव्हाण ठरल्याने त्यांची उमेदवारी जाहिर होताच गोडावूनचा ससेमिरा मागे लावण्याची वेळ आली तर एक प्रकारे या सर्वसामान्य अशा "माम" ने भाजपाच्या " जुमला" विकासाला दणका, देत नावाची हवा कायम ठेवला आहे. भिंवडी लोकभेत गेल्या दोन निवडणूकीत खासदार तथा पंचायतराजमंत्र्यांना सक्षम असा विरोधक नव्हताच, त्यामुळे सारेच अलबेल चालले होते, त्यांचे कट्टर राजकिय विरोधक म्हणून ओळखले जाणारे सुरेश म्हात्रे बाळ्या मामा निष्ट कळंकित,दानशूर व अभ्यासु व्याक्तीमत्व अशी त्यांची ओळख असलेल्या "मामा"ला मात्र व्यासपिठ सापडत नव्हते,कायम प्रबळ दावेदार असून देखाल त्यांना हवं तस पक्षीय बळ मिळत नव्हते, मात्र ३० जून २०२२ ला ठाणे जिल्हयातील भूकंपात राजकिय परझड झाली "फासे" पालटले व राष्टवादिचे सर्वेसर्वा "चाणक्य" शरद पवारांनी या जिल्हयात योग्या फासे टारून बाळ्यामामा यांना राष्ट्रवादीत प्रवेश देऊन मुख्यमंत्र्यासह, भाजपाचा कार्यक्रमच करेक्ट केला गेला,दोन वेळा भरघोस मतानी विजयी झालेल्या खासदार,पंचायतराजमंत्र्याना प्रखर विरोध करणा-या बाळ्या मामाना देखील व्यासपिठ गावलं, २०२४ च्या लोकलभेच्या ऐन मोक्याला गेल्या महिना भरापासून ते पंचायतराजमंत्र्याचा "जुमला"विकास जाहिररित्या चांगलाच चव्हाट्यावर आणीत होतेच. पंधरा दिवस उलटले या जागेचा तिढा सुटत नव्हता तेव्हा संभाव्य उमेदर हा जाहिर होत नसल्याने भाजपाचे एकतर्फी अलबेल चालले होते,परंतु शरदपवारांचे फासे योग्य पडले व मुख्यमंत्र्यासह भाजपाच्या जुमला विकासाचा कार्यक्रम करेक्ट केला गेला आहे. भाजपा च्या पंचायतराजमंत्र्या कडे कार्यकर्त्याची फौज उभी असून गावोगाव पिंजून काढण्यात त्यांनी आघाडी घेतली आहे,मात्र मतदार हा भाजपावर नाराज असल्याचे बोलले जातेय तर बाळ्या मामा सोबत कार्यकर्ते नाहित प्रचारयंत्रना नसली तरी मतदारमात्र पाठिशी असल्याचे चित्र पाहता ह्या दोघातच काट्याची टक्कर होणार अस चित्र दिसून येत आहे.



# बल्लारपूर पोलिसांकडून कारवाई करीत 7 लाख 70 हजारांचा दारूसाठा जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** बल्लारपुर येथे लाखोचा दारुचा मुद्दामल वुटुक करित अस्ताना पकडला यादगार कामगिरी आशी की, प्रोविजन रेड कामी पेट्रोलिंग करित असता दरमियान बल्लारपुर पोलीसन्ना दिनांक -27/04/2024 चे रात्रि 21/00 वा. च विसापुर रोड वर किल्ला वर्ड बल्लारपुर येथे रेड केली आहे. एकुण 16 पेट्या रॉयल स्ट्रैग 180 एम.एल., 5 पेट्या रॉयल स्ट्रैग 90 एम.एल., 10 पेट्या रॉयल स्ट्रैग 375 एम.एल., 3 पेट्या रॉयल स्ट्रैग 1 लीटर, 5 पेट्या रॉयल स्ट्रैग 2 लीटर और मायागनम बिअर 5 पेटी 650 एम.एल. व 5 पेटया आय.बी.180 एम.एल. ऐसे एकुण 48 पेट्या दारुचा माल कि.एन.3,70, सारसबर/-रु. वता एस गाडी क्रं. एम.एच.34 ए.बी. 5801 कि.अं.4,00, हज़ार/-रु. आसा एकुण- 7,70,सुश्री/- रु. चा इश्यूमल मिळुन अला. मूल नाम -1) राकेश अरुण मामेदवार वय-37 वर्षे रा. बाबूपेठ आर्किटेक्चर चौक चंद्रपुर जी. चंद्रपुर यान्चे विरोध गुन्हा नंद करन्यात आला आहे। सदरची कारवाई मा. पुलिस अधीक्षक श्री. मुमक्का सुदर्शन सा., मा. अपर पुलिस अधीक्षक रीना जम्बू सा., श्री. दीपक साखरे सा. उपविभागीय पुलिस अधिकारी, राजुरा यान्चे पोस्टपोस्ट पो.नि. अनोखाराजा बी. शेख, एस.पी.ओ.नि. दीपक कांक्रेडवार, पोहवा। संतोष दंडेवार, एस.एफ.ओ. गजानन डोहीफोडे, पोहवा. रणविजय ठाकुर, आनंद परचाके, सुनील कामतकर, पो.अं. शेखर माथनकर, श्रीनिवास वाभितकर इ. स्टॉफ़ यानी केली आहे.

# रेणुका माता पंचमी यात्रा महोत्सवाकडे भाविक, व्यावसायीकांनी फिरवली पाठ

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील रेणुका माता पंचमी -यात्रा महोत्सवचा चौदांवा दिवस असुण बोहडा तथा आठवडी बाजार वगळता भाविक भक्त तथा व्यापारी व्यावसायिकांनी यात्राकडे पाठ फिरवली असल्याचे चित्र आहे. रेणुका माता, पंचमी यात्रा महोत्सव दरम्यान भाविक भक्तांची प्रचंड गर्दी होती. परंतु दिवसांनदिवस यात्रेतील व्यापार व्यवसायासाठी ची गर्दी कमी होताना दिसत आहे.यंदा दोन गल्ल्या वगळता पुर्ण बाजारपेठ खाली पडून आहे.यावेळी ना रहाटपाळणे ना झोके ना मौत कुआ ना तमाशा ना फिरते पिक्चर थियटर ना भांडी कोंडी दुकाना ना अन्य दुकाना सर्व बाजारपेठा जागि खाली पडून आहे. जेव्हा की वेरुळ म्हैसमाळ येथे एक एक दोन दोन दिवसांची यात्रा मोठ्या प्रमाणात भरल्या परंतु बाजार सावंगी येथे यंदा यात्राला उन्हाचा लग्नं सराईचा फटका बसला आहे. पंचमी तथा यात्रा महोत्सव चा आज चौदावा दिवस आहे १५-२०दिवस ही यात्रा सुरू असते संध्याकाळी यात्रेत बऱ्यापैकी गर्दी असते परंतु दुकान तथा विविध प्रतिष्ठान अभावी यात्रा एकदम कमी भरत आहे.भाविक भक्तांची दर्शनाला गर्दी असली तरी मागच्या काळाचा विचार केलं तर आज रोजी यात्रा एकदम तुरळक अल्पसी भरत आहे. जेव्हा की पंचक्रोशीतील ३०-४० गावे तथा जिल्ह्यांतून भाविक भक्त व्यापारी व्यावसायिक येथे पोहचत नाही. याचे कारण शोधण्याची वेळ गावकऱ्यांवर आली आहे



# महापुरुषांचे विचारच देश घडवतील

## सत्यपाल महाराज

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** छत्रपती शिवराय, राष्ट्रमाता जिजामाता, सावित्रीबाई, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजश्री शाहू महाराज, गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज या सारख्या महापुरुषांचे विचारच देश घडवतील यासाठी युवा पिढीसह जेष्ट्रांनी देखील महापुरुषांचे चरित्र वाचावे असे प्रतिपादन सत्यपाल महाराज यांनी आपल्या' सत्यपालची सत्यवाणी ' या कार्यक्रमात केले.

संत एकनाथ महाराज यांच्या भारुडाची परंपरा साता समुद्रापार घेऊन जाणारे भारुड महर्षी स्व.निरंजन भाकरे यांचे कोरोना काळात दुर्दैवी निधन झाले.त्यांच्या पश्चात त्यांचे सुपुत्र शेखर भाकरे हे भारुडाची परंपरा पुढे चालवत आहे. निरंजन भाकरे यांच्या तृतीय पुण्य स्मरण कार्यक्रमाच्या निमीत्ताने सत्यपालची सत्यवाणी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कीर्तनात आपले प्रखड मत मांडताना ते म्हणाले की आजच्या पिढीने नवभारत,बलशाली भारत घडवण्यासाठी व्यसनापासून दूर राहणे आवश्यक असून आई - वडिलांची सेवा करावी,वडील धारी माणसांचा सन्मान करावा. समाजातील सोशित पीडितांना मदत करावी.आणि आपले घरच तीर्थ बनवावे यासाठी तुकडोजी महाराज यांची ग्रामगीता आत्मसात करावी. गावागावात शांती नांदण्यासाठी जाती भेद,धर्मभेद विसरून सर्वांनी एकत्र यावे असेही ते म्हणाले. कार्यक्रमासाठी प.पू दयानंद महाराज शेलगाव, शनिउपासक सदाशिव महाराज मंगरूळकर,नामदेव महाराज वाकी, ठानापती कृष्णगीरी महाराज, विद्यानंद सरस्वती महाराज, देवानंद गिरीजी महाराज सेवानिवृत्त प्राचार्य नामदेवराव चापे, शिव शारदा शिक्षण प्रसारक मंडळ तथा अखिल भारतीय वारकरी महासंघाचे सचिव कृष्णा लहाने, सिल्लोड शहराचे पोलीस निरीक्षक शेषराव उदार, सहाय्यक पोलीस निरीक्षक माळी नॅशनल सूतगिरणी व्हा.चेअरमन नरेंद्र बापू पाटील, शैलेश शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मोठ्या संख्येने रहिमाबाद व रहिमाबाद परिसरातील भाविकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. यावेळी सर्व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत परिसरातील विविध क्षेत्रात निवड झालेल्या यशस्वितांचा गौरव सोहळा देखील आयोजित करण्यात आला होता.

# जातीच्या तव्यावर पोळ्या भाजणाऱ्यांचे दिवस संपले

आधुनिक केसरी न्यूज

**महेश तारमळे**

**ठाणे :** समाजात बुरसटलेल्या विचाराचां रुढी ,पंरपरेच्या जोखडातुन समाजमुक्त होत नाही.सामाजात अद्यापही शेतकरी कुंटूबातील तरूण, तरूणीच्या लग्नाला नाना अडचणी येतात,साखरपुडा,हळदी,लग्नाच्या बडेजावात शेतकरी भूमिहिन होत चालला,समाज सुधारावा या साठी कसलेच योगदान नसलेले व समाजातील भरल्या पोटाचे, अलिशान गाड्या फिरविणारे मात्र निवडणूकांच्या तोंडावर जातीच्या नावाचा पुलका आणून तेढनिर्माण करण्याचे काम सध्या करीत आहेत, असे असले तरी कुणबी समाजात उच्चशिक्षीत पिढी तयार झाल्याने जातीचे राजकारण करणा-यांना जमालगोटा देतातच हे विसरून चालणार नाही. सन २०१९ च्या लोकसभा निवडणूकीत कुणबीसेना प्रमुख हे काँग्रेसकडून उमेदवारी घेऊन निवडणूक लढले होते व त्यांना देखील कुणब्यांनी न स्विकारता कपिल पाटांलांना पसंती देत कुणबी उमेदवाराला हि पराभूत केले होते. तेच कुणबी सेनेचे प्रमुख हे भाजपाचे उमेदवार कपिल पाटलांच्या व्यासपिठावर बाजूला बसल्याचे दिसून येताच कुणबीनेते,पुढारी, मतदारांच्या भूवया उंचावल्या आहेत. विशेष म्हणजे या मतदार संघात काही घटक हे जातीच्या नावावर राजकारण करीत आजवर आपल्या पोळ्या भाजीत आले आहेत, तर काही उमेदवार कुणबी मताच्या आशेवर आपल. नशिब अजमावित आहेत. या लोकसभा क्षेत्रात कुणबी मताची आकडेवारी पाहता ४०% सर्वात जास्त मतदार असून वेळप्रंसगाला धाऊन येणाऱ्याच आभारव्याक्त करीत एकोप्यात रहात आले असता, मागिल विसपंचविस वर्षासारखा जातीसाठी



माती खा व मला निवडून द्या! ह्या विचाराचा हा समाज राहिला नसून आजच्या घडीला गावोगावी च्या ह्या कुणब्याच्या झोपडीत, घरातील खुंटीला काळे कोट टांगले गेले आहेत, इंजिनियर कृषितज्ज्ञ अशा पदव्या घेतलेले उच्चशिक्षीत, सुज्ञ, तरूणपिढी निर्माण झाल्याने जातीपाती ऐवजी विकास काय हे ज्ञान असलेली सुक्षीशीत पिढी तयार झाल्याने एकप्रकारे जातीची दुकानदारी बंद झाल्यात जमा झाल्या साऱखी झाली आहे व त्यातच सन २०१९ ला भराभूत झालेले कुणबी नेते हे भाजपात असून हे उमेदवार कपिल पाटलामच्या व्यसपिठावर पहाता स्वताच्या स्वार्थासाठी एकत्र येतात, तसेही या मतदार संघातील सर्वच राजकीय पक्षाची ताकद पंचायराजमंत्र्यानी एकाच व्यासपीठावर आणून ठेवल्याने जातीसाठी माती किती दिवस खाणार, तुम्ही पंचपक्कवान खाताय तर त्यानाही गोडधोड खाण्याचे दिवस दाखवायला हवेत, परंतु येथील समाज सुज्ञ झाला असल्याचा अनूभव सन २०१९ च्या निवडणूकात आला असून कुणबी समाज दुसऱ्यांदा जमालगोटा देईल हे येणार काळच ठरविल.

# विकृत मानसिकतेच्या तरुण अखेर गजाआड

आधुनिक केसरी न्यूज

नागपूर : चोरी करण्यासाठी घरात शिरून कपाटातील महिलांच्या अंतरवस्त्रांशी खेळणाऱ्या, महिलांचा विनयभंग करणाऱ्या विकृत मानसिकतेच्या तरुणाला पोलिसांनी अटक केली. या युवकाची दहशत परसली होती. अनेक महिलांनी याबाबत तक्रारी केल्या होत्या. त्यामुळे पोलीस त्याच्या मागावर होते.घटनेच्या दिवशी तो एका घरात चोरी करण्यासाठी शिरला. झोपेत असलेल्या एका ६० वर्षीय महिलेशी चाळे करून पळून गेला होता. पोलिसांनी युवकाला अटक केली. संतोषकुमार दास (२८) रा. बिहार असे त्यांचे नाव आहे. आरोपी हा मूळचा बिहारचा रहिवासी असून कामाच्या शोधात नागपुरात आला.

# वरिष्ठ पो. नि. रामदास वाकोडे यांचा आदर्शवत उपक्रम

## सेवानिवृत्तीनंतर समाजसेवेचा वसा : तरुणांना निःशुल्क पोलीस भरती मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. सुभाष शेटे**

**कवठे येमाई :** एकेकाळी पुणे जिल्ह्यातील शिरूर



पोलीस ठाण्यात सहायक पोलीस निरीक्षक पदी कर्तव्य दक्षतने कार्य केलेले रामदास वाकोडे हे पोलीस दलात ३५ वर्षे १६ दिवस प्रामाणिकपणे काम करीत वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदावर जळगाव जिल्ह्यातील पारोळा पोलीस ठाण्यात कार्यरत असताना मागील ३१ जुलै ला आपल्या प्रदीर्घ सेवेतून सेवानिवृत्त झाले.

अनेकजण सेवानिवृत्तीनंतर वेगवेगळ्या पद्धतीने जीवन जगताना पाहावयास मिळतात. पण पोलीस दलात लोकसेवक म्हणून कार्य केलेले सेवानिवृत्त वरिष्ठ पोलीस निरीक्षक रामदास वाकोडे यांनी समाजसेवेचा वसा पुढे नेण्याचे ठरवत वाशीम जिल्ह्यातील कारंजा लाड येथे स्वतःच्या निवासस्थान परिसरात निःशुल्क पोलीस भरती मार्गदर्शन केंद्र सुरु केले आहे. पोलीस भरती किंवा इतर फोर्स भरती संदर्भात गोरगरीब मुलांना प्रॉपर मार्गदर्शन व्हावे,मैदान व पेपर तयारी कशी करावी याबाबत वेळोवेळी मार्गदर्शन व्हावे,हा या मागचा प्रामाणिक हेतू असल्याचे वाकोडे यांनी सांगितले.सर्वांनी नियमित 100 मीटर व 1600 मीटर रनींग ची प्रॅक्टिस करा.आठवड्यातून एक वेळा टायमिंग काढा,तसेच गोळा फेक प्रॅक्टिस नियमित करा, आठवी स्कॉलरशिपचे पुस्तक पूर्ण वाचून घ्या, त्यामधील मराठी व्याकरण, गणित, बुद्धिमत्ता,असे एकदम सोप्या पद्धतीने दिलेले असलेने लवकर लक्षात बसते. तसेच आठवी ते दहावी चे इतिहास ,भूगोल,नागरिक शास्त्र,राज्यशास्त्र चे जुने पुस्तके जेथे कमी किमतीत विकत मिळतात ती पुस्तके घ्या.व मनापासून पठण. मनन सर्वांनी करा,दैनिक वृत्तपत्र वाचन नियमित ठेवा.पोलीस भरती मार्गदर्शन पुस्तके विविध लेखकांची आहेत ती पुस्तके विकत घ्या,व कसून मैदानी तयारी व पेपरची तयारी करा,मित्रांनो. मोठ्या प्रमाणात पोलीस भरती आहे, लोकसभा निवडणूक संपले नंतर पोलीस भरती तात्काळ होऊ शकते,आपल्याला फक्त एकच भरती होण्या करीता जागेची आवश्यकता आहे, सर्वांना गोल्डन चांस आहे,पोलीस मध्ये भरती होणारच हा निर्णय व निर्धार पक्का करा,यश तुमचे मागे धावतच येणार आहे. तर तरुणांनो उठा व मी पोलीस दलात  भरती होणारच असा मनात विचार दररोज आना व तशा तयारीला लागा,मेहनत घेतली तर यश तुमच्या पाठी धावत येणार च असल्याचे ते म्हणाले. ज्यांना पोलीस भरती होण्याची इच्छा असेल त्यांनी सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक रामदास वाकोडे यांच्या मोबाईल क्रमांक 9823313765 या क्रमांकावर संपर्क करावा.या मागचा एकमेव उद्देश हा कि इच्छुक व गोरगरीब मुले, मुली जास्तीत जास्त पोलीस भरती व्हावे हाच असल्याचा वाकोडे यांनी सांगितले. सेवानिवृत्तीनंतर वाकोडे साहेबांनी गोरगरीब मुलांसाठी निःशुल्क सुरु केलेला पोलीस भरती मार्गदर्शन उपक्रम निश्चितच स्तुत्य, कौतुकास्पद व आदर्शवत असा आहे.



# वादळी वाऱ्याने जि.प. शाळा आसोला उध्वस्त; दोन्ही वर्ग खोल्यांचे मोठे नुकसान

## नवीन शैक्षणिक सत्रात विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यायचे कसे?

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील**

**रिसोड :** तालुक्यातील मोप केंद्रांतर्गत येत असलेली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आसोला येथील शाळेच्या दोन्ही वर्ग खोल्यांचे दिनाक 28 च्या मध्यरात्री अंदाजे एक वाजता दरम्यान सोसाट्याच्या वाऱ्यासह अल्प पाऊस आला.यामधे वाऱ्याला एवढा प्रचंड वेग होता की गावालगत असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या एकूण  तीन वर्ग खोल्यांपैकी दोन वर्ग खोल्या ह्या टिन पत्रे असल्याने दोन्ही खोल्यांचे पूर्ण टिनपत्रे उडून गेले असून वर्ग खोल्यांच्या भिंतीचे देखील मोठी पडझड झाल्याने येणाऱ्या सत्रामध्ये विद्यार्थांना बसवायचे कोठे असा प्रश्न निर्माण झाला आहे.सदरची घटना ही रात्री झाल्यामुळे मात्र कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही. सदर घटनेची माहिती मिळताच रिसोड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी बी.एल. कोकाटे तसेच मोप केंद्राचे केंद्र प्रमुख मेघशाम पत्रे, आसोला गावचे सरपंच प्रतिनिधी तान्हाजी गाडे,जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती डहाळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आदी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून नवीन शैक्षणिक सत्र सुरू होण्याअगोदर नवीन वर्ग खोल्यांची व्यवस्था करून देण्यात यावी, अशी मागणी उपस्थित पालक,गावकऱ्यांकडून करण्यात आली आहे.

> वादळी वाऱ्याने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आसोला येथील दोन वर्ग खोल्याचे टिन उडून गेली असून भिंती देखील पडल्या आहेत . संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक यांना झालेल्या नुकसानीचा अहवाल सादर करण्या बाबत सूचना दिल्या असून सदरचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करून पुढील कार्यवाही करण्यात येईल .
> **बी .एल .कोकाटे . गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती रिसोड**

> दिनांक 28 च्या मध्यरात्री अचानक आलेल्या वादळी वाऱ्याने जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या तीन वर्ग खोल्यापैकी दोन वर्ग खोल्याचे पूर्ण टिनपत्रे उडून गेली ,तसेच भिंती देखील पडल्या असून सदर वर्ग खोल्या ह्या विद्यार्थ्यांना शाळेत बसविण्या योग्य राहिल्या नाहीत .तरी शैक्षिणक सत्र सुरू होण्याअगोदर वर्ग खोल्यांचे बांधकाम करून प्रश्न मार्गी लावावा .
> **सौ . शारदा तान्हाजी गाडे, सरपंच, गट ग्राम पंचायत आसोला लोणी खुर्द**

# प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे मतदार मतदानापासून वंचित!

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 करिता दिनाक 26 एप्रिल रोजी दुसऱ्या टप्प्यातील अकोला लोकसभा मतदारसंघा करिता मतदान पार पडले.

एका बाजूला प्रशासन मतदानाचा टक्का वाढावा म्हणून विविध प्रकारच्या उपाय योजनांचा आटापिटा करीत केल्या मागील दोन महिन्या पासून सतत लोकांना मतदान करण्याकरिता परावृत्त करत होते. मतदान हे दान नसून आपल्यावर कोण राज्य करणार हे ठरविण्याचा तो आपला मताधिकार आहे.

रिसोड तालुक्यातील ग्राम पाचंबा तसेच बऱ्याच गावातील अनेक मतदार हे गावामधे राहत असून देखील मतदार यादी मधुन अनेकाची नावे ही प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे गहाळ झाली तर आनेकाची नावापुढे डिलीट लिहिल्यामुळे येथील रिसोड मालेगावं  मतदार संघांमध्ये मतदार यादी मध्ये बट्ट्याबोळ बघायला मिळाला आहे ,

रिसोड तालुक्यातील ग्राम पाचंबा येथील एक वयोवृद्ध आजी ज्यांनी आत्तापर्यंत अनेक वेळा आपला मतदानाचा मताधिकार बजावले असताना त्याच आजीचे नाव मतदान यादी मध्ये उपलब्ध होते मात्र त्यांच्या फोटोवर डिलीटेड चा शिक्का मारण्यात आल्यामुळे आजी मतदानापासून वंचित राहिल्या त्या मतदान बुथ पासून परत माघारी घरी परतल्या, एवढेच नाही तर एक 22 वर्षीय तरुणी देखील मोठ्या उत्साहामध्ये मतदान करण्याकरता  बुथ वर आली मात्र त्या मुलीच्या मतदार यादीतील नावापुढे डिलीटेड चा शिक्का असल्यामुळे ती सुद्धा मतदाना पासून वंचित राहिली ,अशा पाचंबा गावातील  १६ मतदाराच्या नावापुढे हा घोळ दिसला व ते मतदानापासून वंचित राहिले,तर रिसोड तालुक्यामध्ये कोयाळी बू येथे सुद्धा असाच प्रकार घडला असून विविध ठिकाणी जवळपास शेकडो मतदार हे जिवंत असून सुद्धा केवळ डिलीटेड शिक्का मारल्यामुळे मतदानापासून वंचित राहिले.

> मी मौजे पांचबा येथील रहिवासी असून मागील निवडणुकीवेळी मी
>
> 
>
> मतदान केले मात्र यावर्षी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 मधे मतदानासाठी गेलो असता माझे नाव मतदार यादीत समाविष्ट होते परंतु माझ्या नावासमोर डिलीट असे लीहल्यामुळे मला मतदानाचा हक्क बजावता आला नाही . माझा मतदानाचा हक्क हिरावून घेण्यास सर्वस्वी प्रशासन जबाबदार असून माझे झालेले नुकसान कदापिही भरून निघणार नाही . **कडूजी नवघरे, नागरिक पाचंबा**

# अजिंठा वन विभाग पिंपळवाडी शिवार वृक्षलागवडीत मोठा भ्रष्टाचार

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील पिंपळवाडी येथे अजिंठा वन परिक्षेत्रातील पिपळवाडी बीट डोंगरपट्ट्यात दिनांक 23 एप्रिल मंगळवार रोजी सर्वे नंबर 13    गट क्रमांक 31 मध्ये रात्री आग लागल्याने बरेच वृक्ष व वाळलेले गवत जळुन खाक झाले जवळपास आठ ते दहा हेक्टर क्षेत्र जळालेचा प्राथमिक अंदाज आहे  अजिंठा वनपरिक्षेत्र हद्दीतील पिंपळवाडी शिवार मध्ये 2019 पावसाळ्यामध्ये लाखो रुपये खर्च करून वीस हजार आठशे वृक्ष 13 हेक्टर क्षेत्रात लागवड करण्यात आली होती पण 13 हेक्टर वर लागवड केलेले वृक्ष प्रत्यक्षात तिथे दिसून येत नसल्याकारणाने तेथे वृक्ष लागवड केली का फक्त बिल काढण्यात  आले असा प्रश्न अखिल भारतीय भ्रष्टाचार संघर्ष समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष दिलीप देशमुख व उपाध्यक्ष सुनील चोरमारे यांना पडला आहे.अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती जिल्हा कार्याध्यक्ष दिलीप देशमुख,तालुका अध्यक्ष विजय काळे व संघटनेचे तालुका उपाध्यक्ष सुनील चोरमारे यांनी याप्रकरणी चौकशी व्हावी व खरंच वृक्ष लागवड केली होती का फक्त बिल काढण्यात आले कोण कोणत्या जातीचे वृक्ष लागवड करण्यात आले होते वृक्ष लागवडीवर किती खर्च करण्यात आले व ही आग कोणी लावली यांचा शोध घेऊन दोषीवर कडक कारवाई करण्यात यावी वृक्ष लागवडी संदर्भात भ्रष्टाचार झाला की नाही याची शहानिशा करून संबंधित अज्ञात व्यक्तीवर किंवा अधिकाऱ्यावर वरिष्ठ पातळीवर चौकशी करून त्या भ्रष्ट अधिकाऱ्यावर कारवाई करावी नसता भ्रष्टाचार समिती संघटना कडून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा जिल्हा कार्याध्यक्ष दिलीप देशमुख, सुनील चोरमारे, संघटनेचे तालुका अध्यक्ष विजय काळे यांनी दिला आहे.



# अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या घरांची आ. जोरगेवार यांनी केली पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**घुग्घुस :** अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात घरांची पडझड झाली असून प्रशासनाच्या वतीने नुकसान ग्रस्त घरांची पाहणी करुन पंचनामे केल्या जात आहे. हे काम अधिक गतिशील करुन नुकसाण होउनही नोंद करण्यात न आलेल्या घरांच्या नोंदी करत त्याचेही पंचनामे पुर्ण करा अशा सुचना आमदार किशोर जोरगेवार यांनी अधिका-यांना केल्या आहेत.

रविवारी आमदार किशोर जोरगेवार यांनी मतदार संघातील घुग्घूस येथे भेट देत येथील नुकसान ग्रस्त भागाची अधिका-यांसह पाहणी केली. यावेळी पावसाने घर कोसळलेल्या पिढीत कुटुंबांना आमदार किशोर जोरगेवार यांनी आर्थिक मदत केली आहे. यावेळी नायब तहसीलदार सचिन खांडरे, मंडळ अधिकार विनोद गनफाडे, तलाठी मनोज कांबळे, यंग चांदा ब्रिगेडचे घुग्घूसचे नेते इमरान खान, प्रेम गंगाधरे, मुन्ना लोढे,यंग चांदा ब्रिगेड घुग्घुस महिला संघटिका उषा आगदारी, सुरेखा तोडासे, वनिता निहाल, विना गुचाई, कामिनी देशकर, नविन मोरे, मयुर केवल, राजु सुर्यवंशी आदींची उपस्थिती होती. मागील आठवड्यात संपूर्ण विदर्भासह चंद्रपूरात झालेल्या अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात घरांची पडझड झाली आहे. परिणामी नागरिकांची मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. प्रशासनाच्या वतीने सदर घरांचे पंचनामे करण्यात येत आहे. आमदार किशोर जोरगेवार यांच्या सुचने नंतर शहरात नुकसान झालेल्या घरांची यंग चांदा ब्रिगेडच्या पदाधिका-यांनी पाहणी करत आर्थिक मदत केली आहे. दरम्यान आमदार किशोर जोरगेवार यांनी घुग्घुस येथील नुकसानग्रस्त घरांची पाहणी केली. यावेळी संबंधित अधिका-यांची उपस्थिती होती. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी घुग्घूस येथील अमराई वार्डातील मोरेश्वर बेसेकर, साधना पाझारे, गजानन गाडगे, पूष्पा निघाद, रत्नमाला बि-हाडे, राघो काळबांधे, शांता परशिवे, नामदेव किन्नाके, शारदा आइलवार, माधुरी मडावी यांच्या घरांची पाहणी केली. सदर सर्व घरांचा पंचनामा प्रशासनाच्या वतीने करण्यात आला आहे. या पिढीत कुटुंबांना तत्काळ आर्थिक मदत मिळावी या करिता जलद गतीने काम करण्याच्यास सुचना आमदार किशोर जोरगेवार यांनी प्रशासनाला केल्यात. तसेच येथील अनेक घरांची नोंद झाली नसल्याची तक्रार यावेळी स्थानिकांनी केली. सदर सर्व घरांची यादी तयार करुन त्याही घरांचे  पंचनामे करण्याच्या सूचना यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी केल्या आहे.



# डॉ.सुभाष भामरे यांचा धुळ्यातून उमेदवारी अर्ज

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** खासदार सुभाष भामरे यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करून पदाधिकारी व कार्यकर्त्यांची जल्लोष रॅली काढण्यात आली खासदार तथा माजी केंद्रीय संरक्षण मंत्री डॉ. सुभाष भामरे हे शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे,रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आली आहे.

2014 व 2019 अश्या दोन वेळा झालेल्या निवडणुकी मध्ये भाजपातर्फे खासदार डॉ. भामरे यांनी मोठ्या मताधिकाने विजयी मिळवला होता आता पुन्हा तिसऱ्यांदा अर्ज दाखल करण्यात आला आहे. ह्या ठिकाणी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, नाशिकचे पालकमंत्री तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री दादा भुसे, माजी मंत्री आमदार जयकुमार रावल भाजपचे प्रदेश महामंत्री विजय चौधरी, धुळे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा धरती देवरे, साक्री चे आमदार मंजुळाताई गावित व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या ठिकाणी गिरीश महाजन यांना प्रसार माध्यमांनी नाशिकच्या उमेदवारी संदर्भात विचार रस्ता थंड असे सांगितले की दोन दिवसात नाशिकचा उमेदवार देऊ आणि आमचा उमेदवार निवडून येईल जन्मत मोदींच्या बरोबर आहे म्हणून आम्हाला पूर्ण खात्री आहे असे सांगितले. शिंदे गटाचे चंद्रकांत रघुवंशी यांची नंदुरबार मध्ये मोठी नाराजगी असल्याने आम्ही त्यांना भेटून त्यांची नाराजगी दूर करू असे गिरीश महाजन यांनी सांगितले. 4 जून नंतर मोठा निकाल दिसेल व सर्व विरोधक शांत बसतील आणि मुंबई महाराष्ट्रातून कोणी तोडू शकत नाही कोणाच्या बापाची हिंमत नाही काही विरोधक खोट्या बातम्या पसरून जनतेला भ्रमित करण्याचे प्रयत्न करत आहेत असे महाजन यांनी सांगितले. उज्वल निकम यांना दिलेल्या तिकिटा संदर्भात विचारणा केली त्यात महाजन म्हणाले की हा हायकमांड चा निर्णय आहे त्यांनी विचारपूर्वक घेतला आहे.

# निवडणूक पथकाने हस्तगत केली १ लाख १९ हजारांची रक्कम

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथे निवडणूक भरारी पथकाने १ लाख १९ हजार रुपयांची रक्कम हस्तगत केली आहे. रविवारी दुपारी तीन वाजता चे सुमारास ही कारवाई करण्यात आली.

शिर्डी लोकसभा निवडणुकीसाठी दिनकर सचिन सुरेश यांच्या नेतृत्वाखालील कार्यरत पथकाने ही कारवाई केली आहे. नियमित तपासणी करत असताना नेवासा - श्रीरामपूर रोडवर नेवासेकडून श्रीरामपूरकडे येणाऱ्या गाड्यांची तपासणी करत असताना एका चारचाकी गाडीतून ही रक्कम हस्तगत करण्यात आली. निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार ५० हजार रुपयांच्या वरील रकमेचा हिशोब संबंधितास व्यवस्थित न देता आल्यास सदर रक्कम जमा करण्यात येत असते. शिर्डी लोकसभेचे निवडणूक निर्णय अधिकारी बाळासाहेब कोळेकर व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी किरण सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारी दंडाधिकारी दिनकर सचिन सुरेश यांच्या नेतृत्वाखाली पोलीस शिपाई अमोल शरद लांडे, सोमनाथ तुळशीराम बलमे, व्हिडिओग्राफर समीर हमीद शेख यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.



# लेकीच्या विवाह सोहळ्यात सामाजिक दातृत्व जपणारे संतोष चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** धोत्रे येथील संतोष भाऊ चव्हाण यांच्या लेकीचा विवाह सोहळा दहेगाव येथील द्वारकामाई लॉन्स येथे संपन्न झाला. या विवाह सोहळ्यात त्यांनी सत्कार, स्वागत, शाल, पुष्पगुच्छ अशा गोष्टींना फाटा देत वारी येथील सामाजिक दातृत्व व मानवता हाच धर्म यानुसार कार्य करणाऱ्या राहुल (दादा) मधुकरराव टेके पाटील चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष रोहित टेके यांच्याकडे अकरा हजार रुपयांची रोख स्वरूपात मदत दिली. विवाह सोहळा म्हणजे आनंदाचा क्षण. सर्वजण मोठ्या प्रमाणात विविध गोष्टींवर खर्च करत असतो. व आनंद घेत असतो. परंतु; अशाच वेळी समाजात असे काही लोक, घटक असतात की त्यांनाही आपण केलेली छोटीशी मदत ही त्यांच्या जीवनासाठी खूप अनमोल असते. मात्र; बऱ्याचदा मोठमोठ्या विवाह सोहळ्यांमध्ये या गोष्टी दुर्लक्षित असतात. परंतु सामाजिक बांधिलकी जपणारे माझे मित्र संतोष चव्हाण यांनी मुलगी ऋतुजा हिचा विवाह सोहळामोठ्या थाटामाटात आणि जल्लोषात संपन्न केला. आणि त्याचबरोबर सामाजिक काम करणाऱ्या ट्रस्टलाही मदत केली. या मदतीतून निश्चितच गरजवंतांची सेवा होणार यात शंका नाही. परंतु ज्यांना मदत होईल ते या नवदांपत्याला अंतकरणापासून आशीर्वाद दिल्याशिवाय राहणार नाही. संतोष चव्हाण यांनी आजवर सामाजिक जीवन जगताना निस्वार्थ भावनेतून असंख्य विवाह जमवले आहेत आणि विशेष म्हणजे सर्वच गुण्यागोविंदाने नांदतही आहेत. हीच सर्व पुण्याई ऋतुजाच्या आयुष्यात महत्वपूर्ण ठरणारी आहे. आवाहन करतो. आपल्या जीवनातील आनंदाच्या क्षणी म्हणजेच विवाह सोहळा, स्वतःचा वाढदिवस, कुटुंबातील सदस्यांचा वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस या सह ज्यागोष्टीने आपल्याला आनंद होतो. प्रत्येक क्षणी व आपल्या प्रियजनांच्या स्मृती जिवंत ठेवण्यासाठी सामाजिक कार्य करणाऱ्या राहुल (दादा) मधुकरराव टेके पाटील ट्रस्टला आर्थिक मदत करून सहकार्य करावे असे आवाहन अध्यक्ष रोहित टेके यांनी केले आहे धोत्रे ग्रामपंचायत सरपंच प्रदीप चव्हाण, माजी सरपंच मनोज चव्हाण, वैजापूर नगर परिषदेचे माजी नगरसेवक शैलेश चव्हाण, विनायक महाराज टेके उपस्थित होते.

# संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनतर्फे आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**सुधाकर जेठे**

**छत्रपती संभाजीनगर :** २८एप्रिल रविवार रोजी संत निरंकारी सत्संग भवन सिडको एन ९ शाखा सिडको या ठिकाणी सदगुरु माता सुदीक्षा जी महाराज यांच्या असीम कृपेने संत निरंकारी मिशनची समाजकल्याण शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या विद्यमाने सकाळी ९ ते ५ या वेळेत मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिराचे उद्घाटन हुबळी येथील प्रसिद्ध डॉ पुरुषोत्तम अरोरा (कार्डियोलॉजिस्ट) यांनी केले.

या वेळी मंडळाचे कन्हैय्यालाल डेबरा, जिल्हासंयोजक डी जी दळवी, मुखी सचिन अधाने यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ पुरुषोत्तमजी म्हणाले कि आजच्या धकाधकीच्या जीवनात कळत नकळत अनेक आजार मानवी शरीरात उदभवतात परंतु त्याची माहिती अनेकांना नसते व स्वतःचे आरोग्य जपण्यासाठी तसेच आजारांचे अचूक निदान होऊन त्यावर उपचार करण्यासाठी अशा प्रकारच्या शिबिराचे आयोजन निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन तर्फे करण्यात येत असते. यावेळी १० प्रशिक्षित डॉक्टर्सची टीम देखील उपस्थित होती. रक्तदाब, मधुमेह, थायरॉईड, हृदयरोग, नेत्ररोग, दंतरोग, हाडांचे आजार, सांधेवात,जुनाट आजार इत्यादी आजार असलेल्या रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला.

# कोपरगावात मोफत वैद्यकीय शिबिर संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** डी व्ही जोशी चॅरिटेबल ट्रस्ट व साईदिप इ एन टी हॉस्पिटल पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत कान नाक घसा तपासणी शिबीर दि २८ एप्रिल रोजी एस जी विद्यालय कोपरगाव येथे आयोजित करण्यात आले होते या शिबिरास नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. समाजातील बहिरेपणाचे वाढते प्रमाण तसेच व्यसनाधीनते मुळे वाढते ओरल कॅन्सर चे प्रमाण तसेच या आजारांच्या तज्ञ डॉक्टर्स चा ग्रामीण भागातील आभाव याचा विचार करून या शिबीराचे आयोजन करण्याचा आले होते. मूळ कोपरगावचे रहिवासी असलेले व सध्या पुणे येथे सुप्रसिद्ध ई एन टी सर्जन म्हणून कार्यरत असलेले डॉ अमोल दिलीप जोशी यांनी स्वतः या शिबिरात रुग्णांचे उपचार करून शिबिरामध्ये ट्रस्ट तर्फे काही गरजू रुग्णांना मोफत श्रवणयंत्र वाटप करण्यात आले तसेच जन्मजात कर्णदोष, श्वसन विकार, सायनस चे आजार अशी विविध रुग्णांचे उपचार करण्यात आले.

या शिबिरासाठी विद्यालयाचे अध्यक्ष कैलास ठोळे, सचिव दिलीप अजमेरे, आनंद ठोळे,चेतन खुबाणी माजी नगराध्यक्ष विजय वहाडणे जेष्ठ नेते टेकचंदजी खुबाणी आदी सह मान्यवरांनी उपस्थिती होती, एस जी विद्यालयाचे मुख्याध्यापक मकरंद कोऱ्हाळकर , उपमुख्याध्यापक श्री गायकवाड श्रीमती रायते व श्री गोरे यांचे विशेष सहकार्य लाभले.




# साईनाथ रुग्णालयासाठी डायलेसीस मशिन, बेड सेवाभावी संस्थेकडून दान

आधुनिक केसरी न्यूज



**शिर्डी :** श्रीमती तारादेवी फाउंडेशन, सरकार ग्रुपचे संचालक आकाश गुप्ता, मुंबई यांनी श्री साईबाबा संस्थान श्री साईनाथ रुग्णालय शिर्डी करीता २३ लाख ५० हजार रुपये किमतीचे २ अद्ययावत डायलेसिस मशिन बेडसह देणगी स्वरुपात दिले असल्याबाबत श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी सांगीतले.आज या दोन्ही मशीन श्री साईनाथ रुग्णालयात बसविण्यात आल्यानंतर यांची संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर व देणगीदार साईभक्त आकाश गुप्ता यांचे हस्ते विधीवत पुजा करण्यात आली, यावेळी श्री साईबाबा संस्थानचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी तुकाराम हुलवळे, श्री साईनाथ रुग्णालयाचे उप वैद्यकिय संचालक डॉ. प्रितम वडगावे, जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके, साईनाथ रुग्णालयाच्या सहाय्यक अधिसेविका नजमा सय्यद, बायोमेडीकल विभागाचे इंजिनिअर राजेश वाकडे, तुषार कुटे, प्रणाली कांबळे व स्टोअर किपर सुनिल निकम आदी उपस्थित होते.

# गिरिजा मध्यम प्रकल्पातील पाणीसाठा झपाट्याने कमी

## प्रशासनाला काही घेणेदेणे नाही : महसूल व नगरपरिषदही मूग गिळून

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील येसगाव नं एक येथील गिरिजा मध्यम प्रकल्पातील पाणी साठ्यातुन झपाट्याने कमी झाले असुण पाणी साठा मृत साठ्यात पोहचला याअकडे तर येथील प्रशासनाचे हेतुता दुर्लक्ष असुण महसुल विभाग व नगरपरिषद ही मुग गिळून असल्याचे चित्र आहे. गत वर्षी तालुक्यात जेमतेम पाऊस झाल्याने नदी नाले तलाव विहिरी कोरडीच होती तर पावसाळा संपल्यावर अवकाळीने फटकेबाजी केल्याने मोठ्या प्रमाणात गिरिजा मध्यम प्रकल्प येसगाव मधे पाणी साठा झाला होता.व मोठा पाणी साठा असल्याच्या संभ्रमात येथील प्रशासन डोळे लावून होता तसं प्रशासनाचे पाणी साठ्याबददल नेहमी दुर्लक्ष असल्याचे सिद्ध झालेले आहे. तर रब्बी पिक हंगाम साठी पाणी सोडण्याची तयारीही प्रशासनाने चालवली होती तर अवकाळी पावसाने सर्वत्र पाणी असताना मुद्दामहून पाणी सोडवून वाया घालविले असल्याचेही प्रकार येथे घडलेले आहे.मोठा पाणी साठा असताना कडक उन्हामुळे बाष्पीभवन व आजुबाजूच्या शेतकऱ्यांकडून पाणी वापर होत असल्याने प्रकल्पांतील पाणी साठा झपाट्याने कमी झाला आहे.खुलताबाद शहर तथा तालुक्यातील अनेक गावांच्या पाण्याची तहान गिरिजा मध्यम प्रकल्पच भागवत तर फुलंब्री तालुक्यातील काही गावे या प्रकल्पांवर अवलंबून आहे.मात्र प्रकल्पातील पाणी साठ्याने तळ गाठला आहे.वडोद माटरगाव शिवारातील पाणी साठा वाळला असुण सद्या प्रकल्पांच्या समोरील बाजु मुख्य भिंत दरम्यान पाणी साठा शिल्लक आहे.हे विशेष.असे असताना प्रशासनाचा कार्यालय कुलुप बंदच आढळून येते. शाखाअभियंता व अन्य कर्मचारी कधिच दिसून येत नाही.यासंदर्भात अनेक वेळा बातम्या द्वारे विभागाला अवगत करण्यात आले परंतु वरिष्ठ ही मुग गिळून आहे प्रश्न असा निर्माण होतो की यांच्या वर कुणाचे वचक वाच आहे की नाही?.वरिष्ठांनी यात लक्ष घालून येथील मनमानी कारभार थांबवून प्रशासकीय कार्य करण्यास भाग पाडावे.असी मागणी शेतकरी नागरिकांतून होत आहे.



## शाळांना एक मे पासूनच सुट्ट्या; 15 जूनला घंटा

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** शालेय स्तरावरील सर्वच वार्षिक परीक्षा सध्या आटोपल्या असून आत्ता पहिली ते नववी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना एक मे रोजी लागणाऱ्या निकालाची उत्सुकता लागली आहे. 1मे  निकाल लागल्यापासूनहातात प्रगती पुस्तक पडले की एक मे ते 15 जून पर्यंत प्राथमिक माध्यमिक शाळा उन्हाळी सुट्ट्या लागणार आहेत. तसे शासकीय शैक्षणिक सुट्ट्या दोन मे पासून असल्या तरी प्रगती पुस्तकात पडल्यानंतर सुट्टी असते .विशेष म्हणजे शिक्षकांना सुद्धा यावर्षी 45 दिवस उन्हाळी सुट्ट्यांचा आनंद घेता येणार आहे 15 जून पासून 2024 ते 25 या शैक्षणिक क्षेत्राला सुरुवात होणार आहे जिंतूर तालुक्यातील सर्वच संस्था जिंतूर.प. शाळांना उन्हाळी सुट्ट्या एक मे महाराष्ट्र दिवस साजरा झाल्यावर व विद्यार्थ्यांच्या हातात निकाल सोपवल्यावर लगेच उन्हाळ्याच्या सुट्टी लागणार आहे 15 जून पासून पेरणीला सुरुवात होत असते त्या अनुषंगाने पंधरा दिवस नवीन विद्यार्थ्यांची शाळेत नावे टाकणे, पुस्तक वाटप करणे यात पंधरा दिवस निघून जातात खऱ्या अर्थाने एक जुलैपासून अभ्यासक्रम शिकवायला सुरुवात होते.

सध्या सुट्ट्या लागण्यास वेळ आहे.  या काळातील शाळेतील विद्यार्थी संख्या वाढवण्यासाठी शिक्षक कर्मचारी आपल्या संपूर्ण टीमसह  भर उन्हात शिक्षक पटसंख्या वाढविण्यासाठी घरोघरी जात असून त्यांना आपल्या शाळेचे वैशिष्ट्य सांगून तुमच्या मुलांना आमच्या शाळेत प्रवेश देण्याची विनंती करताना दिसून येत आहेत. यामध्ये संस्थेच्या शाळा , जिल्हा परिषद शाळांची शिक्षकही घरोघरी फिरताना दिसून येत आहेत. वर्षभर अभ्यास आणि दिवसभर शाळा परीक्षा ट्युशन या सर्व गोष्टीच्या व्यापातून विद्यार्थ्यांना टेन्शन मुक्त जीवन जगण्यासाठी आनंद उपभोगण्यांसाठी वर्षातून 45 दिवस शिक्षण विभागामार्फत उन्हाळी सुट्टी दिल्या जातात. या दिड महिन्यातील सुट्ट्यांचा मुले चांगला सदुपयोग करून वर्षभरांचा आनंद लुटतात निकाल हाती पडल्यावर मुलांना सध्या मामांच्या गावाला जाण्याची ओढ लागत असते. त्यातच सध्या पर्यटन स्थळी जाण्याची जास्त संख्या दिसून येते.




## शशिकांत शिंदेंना खासदार करण्यासाठी दिवसरात्र काम करा : चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** यशवंतराव चव्हाण साहेब हा विषय आम्ही कधी निवडणुकीचा केला नाही, मतदान मागण्याचा केला नाही.मोदींनी दिलेल्या आश्वासनाचे काय झाले? हे त्यांना विचारायचं हा आपल्याला लोकशाहीने अधिकार दिला आहे. दहा वर्ष होऊन गेली तरी त्यांनी त्या गोष्टींची सोडवणूक का केली नाही? देशाचे प्रश्न सोडवायचे आहेत, शेतकरी असेल कामगार, युवक, कष्टकरी, महिला, आदिवासी अशा सगळ्यांच्याच हिताची जपणूकीच एकमेव सूत्र घेऊन आपल्याला पुढे जायचं आहे. मोदींची विचारधारा हिताची नाही. त्यासाठी उद्या होणाऱ्या निवडणुकीमध्ये कष्टकऱ्यांचा प्रतिनिधी म्हणून शशिकांत शिंदे यांना साथ द्यावी. सातारचे नेतृत्व देशाच्या संसदेमध्ये प्रामाणिकपणे काम करेल, अशी स्थिती नक्कीच निर्माण करू, असे प्रतिपादन देशाचे माजी कृषिमंत्री शरद पवार यांनी केले. ते सातारा लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने पाटण येथे आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत बोलत होते.  यावेळी माजी मुख्यमंत्री आमदार पृथ्वीराज चव्हाण,खासदार श्रीनिवास पाटील,आमदार बाळासाहेब पाटील, आमदार अरुण अण्णा लाड, माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर, जिल्हाध्यक्ष सुनील माने, सत्यजितसिंह पाटणकर, डॉ.भारत पाटणकर, ॲड. रविंद्र पवार, डॉ.सुरेश जाधव, हर्षद कदम,दीपक पवार, अजितराव पाटील चिखलीकर तसेच महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे पदाधिकारी तसेच पाटणसह सातारा जिल्ह्यातून आलेले कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी मुख्यमंत्री आमदार



पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, राज्यघटना,संविधान,लोकशाही शिल्लक राहणार आहे का नाही? याचा फैसला होणार आहे. म्हणून ही निवडणूक अत्यंत महत्वाची आहे. महागाई, बेरोजगारी, शेतकरी आत्महत्या, आर्थिक नैतिक भ्रष्टाचार, पक्षफोडी या सगळ्या गोष्टींना नरेंद्र मोदी जबाबदार आहेत. महाराष्ट्रातील डोंगर कपारीमध्ये राहणारी गोरगरीब जनता गद्दार नाही, गद्दारांना धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही. आमदार शशिकांत शिंदे तुमच्याशी प्रामाणिकपणे पाच वर्ष खासदार म्हणून काम करतील. कष्टकरी माथाडी कामगार चळवळीतून पुढे आलेला नेता आहे. सातारा जिल्ह्यामध्ये जातीवादी विचारांचा खासदार झालेला नाही, ही परंपरा मोडू नका. सर्वांनी शशिकांत शिंदे यांना खासदार करण्यासाठी दिवस रात्र काम करा, असे आवाहन सुद्धा पृथ्वीराज चव्हाण यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाचे व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार शशिकांत शिंदे म्हणाले की, शिवछत्रपतींच्या स्मारकाचं काय झालं? एकदा तरी नरेंद्र मोदींना विचारायला हवं होतं. काल रात्री नोटीस आली आणि गुन्हा दाखल झाला. मी शपथ घेऊन सांगतो, खोटं बोलणार नाही. जो गुन्हा,जी घटना तांत्रिक दृष्ट्या दाखवण्याचा प्रयत्न करतात. काही झालं तरी मी घाबरणार नाही.इमारतीचे उद्‌घाटन करायला चव्हाण साहेब येत नाही म्हटल्यावर अण्णासाहेब पाटील यांनी कमी जास्त करेल असं सांगितल्यावर यशवंतराव चव्हाण खास दिल्लीवरून आले होते आणि माथाडीचे अडचणीला कृपा छत्र देणारे शरद पवार साहेब एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. याचा मला अभिमान आहे. अजून किती केसेस टाकायच्या त्या टाका, मी लढाईला तयार आहे. मरेपर्यंत शरद पवारांची साथ कधीच सोडणार नाही, असे सुद्धा शशिकांत शिंदे यांनी म्हटले.





# सुनगाव येथे लोखंडी रॉडने मारहाण दोन आरोपीविरोधात गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जामोद :** सुनगाव येथे जुन्या वादातून दोन व्यक्तींनी एका व्यक्तीला लोखंडी मारहाण केल्याची घटना दिनांक 28 एप्रिल रोजी सकाळी 10 वाजून 30 मिनिटांच्या सुमारास घडली. फिर्यादी सुवर्णसिंग विठ्ठल सिंग राजपूत राहणार सुनगाव हे गावातीलच अनिल राजपूत यांच्या पान टपरी जवळ उभी असताना आरोपी किशोर येऊल, विजय येऊल या दोघांनी फिर्यादी सुवर्ण सिंग राजपूत यांना जुण्या भांडणाच्या कारणावरुन एकदम शिवीगाळ करुन त्यांच्या हातात असलेल्या स्टिलच्या रॉडने दोघांनी फिर्यादी यांना जिवे मारण्याचे उददेशाने फिर्यादी यांचे दोन्ही पायावर, हातावर, डोक्याच्या मागचे बाजुला, कपाळावर मारुन गंभीर जखमी केले तसेच डाव्या हातावर व बोटावर मारून जखमी केले व फिर्यादी यांना आरोपीनी मारत असतांना ते एकमेकांना बोलत होते की, याला जिवाने मारुन टाकु असे बोलत होते. नंतर तेथे गावातील ज्वालासिंग कल्याणसिंग राजपुत व अनिल उदयसिंग राजपुत हे हजर आले व त्यांनी भांडण सोडविले. त्यानंतर गावातील प्रेमसिंग राजपुत यांनी फिर्यादी यांना त्यांचे गाडीत ग्रामिण रुग्णालय, जळगाव जामोद येथे उपचार कामी आणले व ग्रामीण रुग्णालयातच फिर्यादीची जबानी घेण्यात आली व त्यांच्या तक्रारीवरून आरोपीवर कलम 307 ,326, 504 ,506, 34 भारतीय दंड विधानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे फिर्यादीला पुढील उपचारासाठी खामगाव येथे रेफर करण्यात आले आहे पोलीस निरीक्षक महाजन यांच्या आदेशाने सपोनि पी. आर. इंगळे हे पुढील तपास करीत आहे.

# डिझेल टँकर उलटून आग; एक जण ठार, दोघे होरपळले

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** येथून जवळच असलेल्या भोयर घाटात डिझेल टँकर उलटून भीषण आग लागली. या घटनेत टँकरमधील एकाचा मृत्यू झाला असून, दोघेजण गंभीररित्या भाजले. ही घटना यवतमाळ-दारव्हा मार्गावरील भोयर घाटात आज सोमवारी दुपारी ११ वाजताच्या सुमारास घडली. यवतमाळकडून डिझेल टँकर दारव्हाकडे जात होता. दरम्यान भोयर घाटात चालकाचे नियंत्रण सुटल्याने टँकर उलटला. टँकरमध्ये डिझेल असल्याने पलटल्यानंतर त्याने पेट घेतला. सोबतच परिसरातील जंगलाही आगेने कवेत घेतले. या घटनेनंतर यवतमाळ-दारव्हा मार्गावरील वाहतूक ठप्प झाली. घटनेची माहिती मिळताच यवतमाळ ग्रामीण, लोहारा पोलीस, अग्निशमन पथक घटनास्थळी पोहोचले. तोपर्यंत टँकर पूर्णतः जळून खाक झाला होता. तर रस्त्यावर डिझेल सांडल्याने बराच भाग आगेने कवेत घेतला होता.

पोलिसांनी दोन्ही बाजूंची वाहतूक अन्य मार्गाने वळविली. हा टँकर राळेगाव येथील एका पेट्रोलियम एजन्सीचा असल्याची माहिती आहे. टँकरमध्ये तिघेजण प्रवास करत होते. यातील एकाचा जळाल्याने जागीच मृत्यू झाला, तर दोघे गंभीर भाजले. जखमींना यवतमाळच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मृताची ओळख पटविण्याचे काम सुरू होते. पोलिसांनी घटनेची नोंद घेऊन तपास सुरू केला.



# धुळ्याचे माजी पोलीस अधीक्षक लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** धुळे येथून प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीने उमेदवारी झाहीर केलेले आयपीएस अधिकारी अब्दुल उर्फ अब्दुर रेहमान यांची आज धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या भावनात पत्रकार परिषद संपन्न झाली आहे.
धुळे जिल्हाधिकारी कार्यालयात येत्या दोन किंवा तीन तारखेला नाम निर्देशक अर्ज भरणार असल्याची माहिती आयपीएस अधिकारी तथा वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अब्दुल उर्फ अब्दुर रेहमान यांनी पत्रकार परिषदेतून दिली आहे.
२०१९ मध्ये केंद्र सरकारने नागरिकत्व (सुधारणा) कायदा (सीएए) आणल्यावर रेहमान यांनी राजीनामा दिला आहे. मात्र सरकारने त्यांचा राजीनामा स्वीकारण्यास नकार दिला असल्याने रेहमान यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे, अशी माहिती ही त्यांनी या पत्रकार परिषद दिली आहे. तसेच मी इतर ठिकाणाहून निवडणूक लढू शकतो ' मात्र धुळे लोकसभा मतदार संघातील नागरिकांच्या समस्या सोडून मला न्याय द्यायचा आहे. एका बाजूला मनुवादीपक्ष व दुसऱ्या बाजूला आमचा न्यायासाठी लढणारा पक्ष आहे. त्यामुळे वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराला मोठ्या मताधिक्याने निवडून द्या असे आवाहन या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून आयपीएस अधिकारी तथा वंचित बहुजन आघाडीचे लोकसभेचे उमेदवार अब्दुल उर्फ अब्दुर रेहमान यांनी पत्रकार परिषदेतून




केल आहे. लोकांना सामाजिक न्याय देण्यासाठी आमचा प्रयत्न राहील. महिलांसाठी पण आम्ही न्याय देण्याचा प्रयत्न करू जनतेमधून बंधुभाव निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न राहील चमचे व दलालांना तिकीट दिले जाते पण काँग्रेस व भाजपा मध्ये जनतेसाठी लढणाऱ्या गरीब नेत्याला तिकीट मिळत नाही. अशी व्यथा ही रहमान यांनी व्यक्त केली आहे. समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळाला पाहिजे असा महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार होता तोच विचार पुढे नेण्याचा आमचा प्रयत्न आहे, असं ही त्यांनी यावेळी सांगितलं आहे.

# बाजार सावंगी व परिसरात सर्कलमध्ये वाळूचा वापर बंद; दगडी चुऱ्याचाच पर्याय

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथे व परिसरात सर्कलमध्ये सर्वत्र ठिकठिकाणी विविध विभागांच्या विविध कामांवर वाळूऐवजी फक्त दगडीचऱ्यांचा वापर करून वाळु बाद केल्याचे चित्र आहे. तालुक्यातील खासगी विविध कामांवर बांधकामांसठी वाळुचाच वापर होत आहे व त्यांना मात्र वाळु उपलब्ध होत आहे. तर दुसरीकडे मात्र शासकीय बांधकाम पुल काम चारी काम विविध कामांवर सर्रास वाळु ऐवजी दगडी चुरा पावडर चाच वापर होत आहे. पूर्वी शासकीय कामांवर ६०×४० वाळु ६०%तर, दगडी चुरा पावडर ४०% असी सुत्र वापरली जात होती ज्यामुळे सिमेंटी काम मजबुत दुर भविष्यात फायदा होईल हे त्यामागचे हेतू होता मात्र सध्या प्रशासन यांकडे लक्ष देण्यास तयार नाही. सरसकट लघुपाटबंधारे विभाग जिल्हा परिषद बांधकामविभाग सार्वजनिक बांधकाम विभाग बांधकाम पुलकाम चारी काम कुठलेही काम असो वाळु ऐवजी सर्रासपणे दगडी चुरा पावडर सिमेंट खडीचा वापर करून कामे करत



आहे.ज्यामुळे काम दिसण्यास चांगले चोपडे दिसून येत आहे. परंतु यात हमी दुरदृष्टी नाही. कारण बाजार सावंगी येथे दोन व कानडगाव येथे एक गोळेगाव येथे एक एकुण चार सिमेंटी बांध वर्षा दिडवर्षाच्या काळातच तुटफुट होवून वाहुन गेले यासंदर्भात तक्रारी बातम्या द्वारे विभागाला अवगत करुन पाठपुरावा करून ही अद्याप त्याकामाची चौकशी झाली नाही. तेही काम वाळु ऐवजी सर्रासपणे दगडी चुरा पावडर सिमेंट खडीचा वापर करून काम आटोपते घेण्यांत आले होते व त्याचा परिणाम एकदिड वर्षातच समोर आले. मात्र जिल्हा प्रशासन लक्ष देण्यास तयार नाही. सिंचनसाठी शासन चांगला विचार करत असला तरी बांध केटीबांध पुले कामे टिकाव होत नाही. याचा विचार करून शासकीय कामात वाळुचा पर्याय बाद करु नये व वाळु वापरण्यास बंधनकारक करावे जेणे करून कामे मजबुत चिकट हमी चे ठरतील व तालुक्यात होत असलेल्या व झालेल्या सर्व कामांची वाळू विना झालेल्याची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी अशी मागणी शेतकरी नागरिकांतून होत आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# म्हणून या निवडणुकीकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे

## शरद पवार : सासवड येथील जाहीर सभेतून व्यक्त केल्या भावना

आधुनिक केसरी न्यूज



**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** मोदी साहेब ठीक ठिकाणी सांगतात "चारसो के पार.." खरं म्हणजे या देशाच्या एकंदर ज्या लोकसभेच्या जागा आहेत.त्याच त्यांना मिळाल्या असल्याचा आनंद झाला आहे.चारसो के पार कशासाठी? चारसो के पार याचा अर्थ असा आह, त्यांना हव्या त्या पद्धतीने या देशात कायदे करून ते करण्यासाठी लागणाऱ्या खासदारांची संख्या ही त्यांना हवी आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला दिलेली राज्यघटना तिच्यामध्ये परिवर्तन करायचे आहे.ते सांगतात की संविधान बदलण्याचा विचार आमच्या डोक्यात नाही.परंतु त्यांचेच खासदार हे संविधान बदलण्यासाठी चारशे जागा हव्यात असे जाहिरपणे सांगतात.याची नोंद तुम्हा आम्हांला घ्यावी लागेल.उद्याचं लोकशाहीवरचं संकट काय आहे याची प्रचिती यातून आपल्याला येते.म्हणून या निवडणुकीकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे.असे प्रतिपादन माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी केले.ते सासवड ता.पुरंदर येथे बारामती लोकसभा मतदारसंघाच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार सुप्रियाताई सुळे यांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेतून बोलत होते.यावेळी शिवसेना खासदार संजय राऊत, आमदार सचिन अहिर,सनदी अधिकारी संभाजी झेंडे, राष्ट्रवादी काँग्रेस प्रवक्ते विजय कोलते,माजी आमदार जगन्नाथ बापू शेवाळे,माजी जि.प.सदस्य सुदाम आप्पा इंगळे,पुरंदर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रदीप आण्णा पोमन,पुरंदर तालुका शिवसेना अध्यक्ष अभिजित जगताप,पुरंदर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष माणिकराव झेंडे तसेच महाविकास आघाडीचे सर्व नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच जनसमुदाय मोठ्या संख्येने उपस्थित होता. यावेळी शरद पवार यांनी ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर पडलेल्या आहेत. त्यावर सुद्धा विशेष प्रकाशझोत टाकला.शरद पवार म्हणाले की,ही निवडणूक वेगळी निवडणूक आहे.हा देश कोणत्या पध्दतीने चालवायचा.आज मोदी साहेब आणि त्यांचे सहकारी ज्या पद्धतीने चालवितात ते बघितल्यानंतर चिंता होत आहे.देश चालविणे याचा अर्थ लोकशाहीच्या मार्गाने लोकांना विश्वासात घेऊन त्यांच्या संमतीने देशाचा कारभार करणं ही लोकशाहीची महत्वाची गरज आहे.आज काय चित्र दिसत आहे.देशपातळीवर ही लोकशाही दिसतेय का? आज पंचायत समिती,जिल्हा परिषदेच्या,नगरपालिकेच्या निवडणुका झाल्यात? किती दिवसांपासून? ह्या निवडणूका आणि संस्था दोन वर्षापासून मोकळ्या आहेत.जर तुम्ही दोन वर्ष निवडणूकाच घेणार नसाल,आणखी काही दिवसांनी कदाचित विधानसभा आणि लोकसभा याच्या निवडणूका न घेण्याची दुर्बुद्धी ही राज्यकर्त्यांना सूचण्याची शक्यता नाकारता येतना ही.आणि ते चित्र आता दिसतंय, असे सुद्धा शरद पवार यांनी सांगितले. माजी खासदार संजय राऊत म्हणाले की,ही ऐतिहासिक निवडणूक आहे.या देशात लोकशाही राहील की हुकूमशाही? या देशात चोरांचं राज्य राहील की महान परंपरा असलेल्या लोकशाही मानणाऱ्या लोकांचं राज्य राहील? हे आपण ठरवायला पाहिजे.गेल्या दहा वर्षापासून या देशाचा पंतप्रधान रोज खोटं बोलतोय.इतकं खोटं बोलणारा पंतप्रधान या देशाने पाहायला नव्हता.या देशाची परंपरा आणि स संस्कृती,देशाला दिलेली,आश्वासने, वचनं या सगळ्याचा त्यांना विसर पडलेला आहे. महाराष्ट्र गिळायचा,महाराष्ट्राचं नेतृत्व संपवायचं, मराठी माणसाच्या स्वाभिमानाला धक्का लावायचा,मुंबई लुटायची शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सारखे महाराष्ट्राचे स्वाभिमानी पक्ष फोडायचे आणि सगळी लुट गुजरात ला न्यायची अशा प्रकारचे धोरण नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी गेली काही वर्षापासून चालविलेले आहे.

यावेळी खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या सह आमदार संजय जगताप तसेच इतरांनी मनोगते व्यक्त करत विरोधकांवर चांगलेच ताशेरे ओढले.

तसेच खासदार सुप्रियाताई सुळे यांनी निवडुन देण्यासाठी आवाहन सुद्धा या सभेतून करण्यात आले. यावेळी उपस्थित असलेला जनसमुदाय यांच्या कडून सुद्धा मोठ्या प्रमाणात पार्टीचा जयघोष ही करण्यात आला.



# किसन वीर साखर कारखान्यासाठी आमदार मकरंद पाटलांच्या पाठीशी

## छत्रपती उदयनराजे भोसले यांचे आश्वासन

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** खंडाळा आणि भुईंज या दोन्ही किसन वीर सहकारी साखर कारखान्यांच्या भवितव्यासाठी मी आमदार मकरंद पाटलांना लागेल ती मदत करायला तयार असून त्यांच्या पाठीशी ठाम उभा राहीन.असे आश्वासन सातारा लोकसभेचे महायुतीचे उमेदवार खासदार छ.उदयनराजे भोसले यांनी दिले. तसेच शेतकऱ्यांच्या भवितव्यासाठी लागेल ती मदत करणार असे सुद्धा त्यांनी सांगितले. वाईत मतदारसंघात संवाद दौरा संपन्न होत असताना यावेळी उदयनराजे यांनी जनतेसमोर संवाद साधत किसनवीर साखर कारखान्यासाठी मदत करण्याचा शब्द दिला.

यावेळी आमदार मकरंद पाटील, जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती शशिकांत पिसाळ,राष्ट्रवादीचे राज्य सरचिटणीस प्रतापराव पवार, जिल्हा कार्याध्यक्ष अमित कदम, जिल्हा बँकेचे संचालक दत्तानाना ढमाळ, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष नितीन भरगुडे पाटील,जिल्हा सरचिटणीस श्रीनिवास शिंदे,जिल्हा बँकेत संचालक राजेंद्र राजपुरे,सेवा दलाचे प्रदेशाध्यक्ष राजेंद्र लवंगारे, संजय गायकवाड,शामराव गाढवे,मदन आप्पा भोसले, माजी कृषी सभापती मनोज पवार, नितीन भिलारे आदीं सह इतर मान्यवर उपस्थित होते. उदयनराजे पुढे म्हणाले की,सहकारी साखर कारखान्यांना काँग्रेसच्या सरकारच्या काळात आयकर भरण्याच्या नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. हा आयकर माफ करण्याचा निर्णय भाजप सरकारच्या काळात केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी घेतला. याचा शेतकऱ्यांना फार मोठा फायदा झाला आहे. साखर कारखान्यांना इथेनॉल निर्मितीसाठी परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला.शेतीमध्ये व्यावसायिक दृष्टिकोन वाढी साठी भाजप सरकारने अनेक निर्णय घेतले. शेतकऱ्यांना अनेक सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या. कृषी शास्त्रज्ञ डॉ. बुधाजीराव मुळीक यांनी शेतकऱ्यांसाठी इर्मा योजना लागू करण्याची संकल्पना मांडली. त्याबाबतची सरकारच्या माध्यमातून निर्णय होईल.आमदार मकरंद पाटील म्हणाले, खंडाळा आणि वाई तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या भवितव्याचा विचार करून आपण महायुती सोबत जाण्याचा निर्णय घेतला आहे. खंडाळा कारखाना आणि भुईंज येथील किसन वीर दोन्ही कारखाने अडचणीत आहेत.दोन्ही तालुक्यातील ८५००० कुटुंबे या कारखान्यावर अवलंबून आहेत.दोन्ही तालुक्यांतील शेतकऱ्यांच्या रेट्यामुळे या दोन्ही कारखान्यांची जबाबदारी आमदार म्हणून मी घेतली. उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या माध्यमातून कर्जात असलेल्या या कारखान्याची जोखीम सरकारने घेतलेली आहे.

कारखान्यांना घातलेल्या उसाचे बिल शेतकऱ्यांना देण्यासाठी हे गरजेचं होतं.भविष्यात चांगले चालून शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह सुरू ठेवण्यासाठी आपण महायुती सोबत जाण्याचा निर्णय घेतला.असे सुद्धा त्यांनी सांगितले.लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीचे उमेदवार खासदार उदयनराजे भोसले यांना आपण पूर्णपणे सहकार्य करणार आहोत.

याबाबत मनामध्ये कोणतीच शंका ठेवू नका.सर्व कार्यकर्त्यांनी आपल्या गावात जाऊन उदयनराजेच्या प्रचाराला सुरुवात करा. असा आदेश आमदार मकरंद पाटील यांनी दिला.या मेळाव्यास वाई खंडाळा महाबळेश्वर तालुक्यातील आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नळकंडी पुलाचे काम निकृष्ट, दर्जाहिन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे इंदापूर -झरी या गावांसाठी इंदापूर येथे केलेल्या नाल्यांवर नळकंडी पुल निकृष्ट दर्जाहिन थातुरमातुर कामामुळे शेवटची घटका मोजत असल्याचे चित्र आहे.सदर पुलकाम जिल्हा परिषद बांधकाम अंतर्गत करण्यात आले होते.

सविस्तर वृत असे की मौजे इंदापूर ते झरी या गावांसाठी रस्त्यांचे खडीकरण डांबरीकरण मजबुतीकरण काम येथे सुरू आहे.या रस्त्या दरम्यान बोडखा-इंदापूर नदीनाल्यावर नळकंडी पुल गतवर्षी जिल्हा परिषद बांधकाम अंतर्गत करण्यात आलेले आहे. काम निकृष्ट दर्जाहिन थातुरमातुर केल्याने व त्यावेळी माध्यमांनी बातमीद्वारे विभागाला अवगत करुन ही त्यांकडे दुर्लक्ष केल्याने १०-१२ महिन्यातच दबून जावून भेगा (क्रॅक) पडल्या तर सुरु असलेल्या रस्ता दबाई काम करताना सदर नळकंडी पुल दबून आखेरची घटका मोजत आहे.



जिल्हा परिषद बांधकाम विभाग आता काय कारवाई करणार आहे. पावसाळ्यात पुल फुटून वाहुन गेल्यास त्रास बांधकाम विभागाला की ग्रामस्थांना होणार आहे. काम करून घेताना दुर्लक्ष करायचे व त्रास दुसऱ्यांना होऊ द्यायचा हा कुठला न्याय आहे. शासन जनतेच्या निधीचा योग्य वापर सवलत सुविधा उपलब्ध करण्याचा प्रयत्न प्रशासनाने करायला हवं परंतु हेतुता दुर्लक्ष मुळें पुलाची अखेरचा घटका नागरिकांच्या त्रासाला आमंत्रण असल्याचे दिसून येतेआहे.

# अमृतसर येथे ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय महाअधिवेशन

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** दि. 7 ऑगस्टला राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे 9 वे राष्ट्रीय अधिवेशन अमृतसर, पंजाब राज्यात येथे आयोजीत करण्यात आले आहे. सदर अधिवेशनाच्या तयारीच्या दृष्टीने नागपूर येथे रविवार दिनांक 5 मे 2024 बैठकीचे आयोजन धनवटे नॅशनल कॉलेज नागपूर रम न.10 मध्ये दुपारी 12 वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे, या बैठकीत जातीनिहाय जनगणना करण्यात यावी. केंद्रामध्ये स्वतंत्र ओबीसी मंत्रालयाची स्थापना करण्यात यावी. ओबीसी समाजाला लावण्यात आलेली क्रीमिलेयरची घटनाबाह्य अट त्वरित रद्द करण्यात यावी व ती रद्द होईपर्यंत क्रीमिलेयरची मर्यादा 20 लाख रुपये करण्यात यावी. मंडल आयोग आणि स्वामिनाथ आयोगाच्या सर्व शिफारशी लागू करण्यात याव्या. ओबीसी प्रवर्गाचा अँट्रासिटी कायद्यामध्ये समावेश करण्यात यावा. इतर मागण्या मजूर करून घेण्यासाठी आणि राष्ट्रिय ओबीसी महासंघाच्या वर्षभरातील कार्यक्रम ठरविण्यासाठी, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ बबनराव तायवाडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजीत करण्यात आले आहे. उपरोक्त बैठकीला राष्ट्रीय ओबीसी महासंघ, महिला महासंघ, युवा - युवती महासंघ, कर्मचारी महासंघ, किसान महासंघ, विद्यार्थी महासंघ, वकील महासंघ तसेच सर्व राष्ट्रीय पदाधिकारी, महाराष्ट्र कार्यकारिणी, विदर्भ कार्यकारिणी, सर्व जिल्हाध्यक्ष व सर्व कार्यकर्त्यांनी बैठकेला उपस्थित राहावे.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# वरखेडच्या यात्रेत शेकडो रुग्णांची तपासणी

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** पंचायत समितीच्या आरोग्य विभागाच्या वतीने नेवासा तालुक्यातील वरखेड झालेल्या यात्रेत शेकडो रुग्णांची आरोग्य तपासणी करून औषधोपचार करण्यात आले.

वरखेड येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या प्रांगणात तालुका आरोग्य अधिकारी डॉ.दीपक डिंबर यांच्या मार्गदर्शनाखाली तपासणीसाठी कक्ष तयार करण्यात आला होता. यासाठी सरपंच विनोद ढोकणे व ग्रामविकास अधिकारी अण्णासाहेब डेंगळे, ग्रामस्थ संभाजीराव आगळे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले. आरोग्य तपासणी व उपचारासाठी मोठा शामियाना याठिकाणी उभारण्यात आला होता.

रखरखत्या उन्हाचा तडाखा लक्षात घेता एखाद्या रुग्णाला उष्माघात झाल्यास त्यादृष्टीने औषधे उपलब्ध करून देण्यात आली होती तर इतर व्याधींसाठी ही मोठ्या प्रमाणात औषधसाठा उपलब्ध करून देण्यात आला होता. आरोग्य सेवा तत्परतेने कशी देता येईल यासाठी संकटात सापडलेल्या यात्रेतील रुग्णासाठी तीन रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. आरोग्य सेवा देण्यासाठी शिरसगाव प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.मनिष पारखे, टोका येथील वैद्यकीय अधिकारी डॉ.मोहसीन पटेल,डॉ.विकास परसैय्या, डॉ.मिनीनाथ लोखंडे, आरोग्य सहायक बाळासाहेब राठोड, सोमनाथ आसने, किशोर खाटीक, भीमराज लवांडे,आरोग्य सेवक गंगाराम पांढरे, रिजवान पठाण, विपुल सिनकर,श्रीमती डोलारे, श्रीमती बोटाळे यांनी विशेष कामगीरी बजावली. वरखेड यात्रेमध्ये आरोग्य विभागाच्या तत्परतेने आरोग्य सेवा दिल्याबद्दल यात्रेसाठी आलेल्या भाविकांनी तालुका तालुका आरोग्य अधिकारी डॉ.दीपक डिंबर, आरोग्य सहायक सर्व आरोग्य कर्मचारी तसेच सरपंच विनोद ढोकणे व ग्रामस्थ सहकाऱ्यांना धन्यवाद दिले.





# गोहोगाव हाडे येथे लोक कलावंतांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** गोहोगाव हाडे येथे नुकताच विविध लोक कला सादरीकरणाचा कार्यक्रम पार पडला आहे. त्या अनुषंगाने येथील लोक सेवा राष्ट्रीय सांस्कृतिक नाट्य मंडळाच्या वतीने लोक कलावंतांचा सत्कार करण्यात आला आहे.
गोहोगाव येथील महादेव मंदिराच्या प्रांगणात विविध लोक कला सादरीकरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमात जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील अनेक लोक कलावंतांनी हजेरी लावत आपापल्या कला सादर करत जमलेल्या शेकडो रसिकांना मंत्रमुग्ध केले होते. दरम्यान लोक सेवा राष्ट्रीय सांस्कृतिक नाट्य मंडळ या संस्थेचे अध्यक्ष रतन हाडे यांनी सर्व कलावंतांचा सत्कार केला. तसेच रमेश आराख यांची सिंदखेड राजा तालुका अध्यक्षपदी तर मधुकर जटाळे यांची मालेगाव तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे सचिव शे ईनुस शे निजाम व जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर भोसले, सिद्धेश्वर नरवाडे आदींनी परिश्रम घेतले.



**नुकत्याच झालेल्या मंथन सामन्य ज्ञान परीक्षा घेण्यात आली होती त्यात नेवासा तालुक्यातील पानसवाडी (सोनई) येथील श्री प्रशांत जालिंदर गडाख (सर) यांची कन्या कु दिशा प्रशांत गडाख हिने ईयत्ता 1 ली झालेल्या मंथन सामान्यज्ञान परिक्षेत महाराष्ट्र राज्यात सातवा तर अहमदनगर जिल्ह्यात दुसरा क्रमांक मिळून यश संपादन केले. याबद्दल दिशा हिचा मंथन वेलफेअर फाऊंडेशन च्या वतीने श्री सुधीर काकटकर (इलेक्ट्रॉनिक्स तंत्रज्ञ जी एम आर टी),मा डॉ. भुषण निकम,मा श्री दासु वैद्य,मा श्री आशिषजी दहातोंडे,मा श्री वैभव पडवळ,मा अमृता धोंगडे (मिसेस मुख्यमंत्री फेम अभिनेत्री) मा महेश देशमुख यांच्या सर्वांच्या शुभहस्ते सन्मान करण्यात आला. या यशाबद्दल तिचे संस्थेचे सचिव मा रविराज तुकाराम पाटील गडाख. संस्थेच्या अध्यक्षा सौ.जयश्रीताई रविराज पा गडाख. व आदर्श विद्यामंदिर सोनई शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक तसेच पानसवाडी येथील सर्व ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे.**

# निळवंडे कालव्यांना दुसरे आवर्तन द्या : मच्छीन्द्र दिघे यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** निळवंडे धरणाचे कामासह निळवंडे कालवा कृती समितीच्या याचिकेत उच्च न्यायालयाच्या छ.संभाजीनगर यांचे आदेशाने गत वर्षी ३१ मे २०२३ रोजी डाव्या व नंतर उजव्या कालव्यास पाण्याचे प्रथम आवर्तन सोडले होते.त्यांनतर फ्लेक्स बोर्ड लावून श्रेयवादासाठी पुढे पळणारे नेते आता गायब झाले असून प्रवरा पात्रात पाणी सोडणारे मंत्री,स्थानिक नेते या कालव्यांच्या दुसऱ्या आवर्तनाबाबत बोलण्यास तयार नसल्याने याबाबत कालवा कृती समितीचे कार्याध्यक्ष मच्छीन्द्र दिघे यांनी संताप व्यक्त केला असून निळवंडे कालव्यांना तातडीने आवर्तन सोडण्याची मागणी एका प्रसिद्धी पत्रकानंव्ये केली आहे.




सदरचे सविस्तर वृत्त असे की,"निळवंडे कालवा कृती समितीचे कार्यकर्ते नानासाहेब जवरे व विक्रांत काले यांनीं उच्च न्यायालयाच्या छ.संभाजीनगर खंडपीठात ॲड अजित काळे यांच्या सहकार्याने सप्टेंबर २०१६ मध्ये एक जनहित याचिका (क्रं.१३३/२०१६) दाखल करून कालव्यांचा हा प्रश्न मार्गी लावला आहे.त्याची पहिली चाचणी उच्च न्यायालयाकडून तब्बल सहा मुद्तवाढी घेतल्यानंतर व न्यायालयाने दि.१३ जुलै २०२३ रोजी आर्थिक अधिकार गोठवल्यावर न्यायालयाचे आदेशाने डाव्या कालव्यांची पहिली चाचणी विद्यमान सरकार,मुख्यमंत्री,मंत्री,जलसंपदा विभाग आणि अधिकाऱ्यांना नाक घासत घ्यावी लागली होती.ती डाव्या कालव्यांची चाचणी या दुष्काळी १८२ गावात अवर्षण असल्याने वाढवून जवळपास अडीच महिने सुरु होती. त्यानंतर उजव्या कालव्यांची अर्धवट चाचणी घेण्यात आली आहे.त्या अडथळा आल्याने ती मध्येच बंद करावी लागली होती.ती पुन्हा सुरु होईल अशी आशा राहुरी,संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना असताना त्यात वाट पाहून लाभक्षेत्रील शेतकरी थकून गेले आहे. मात्र अद्याप ती चाचणी पूर्ण झाली नाही.जलसंपदा विभागाने समन्यायी कायद्याच्या नावाखाली अधिकचे पाणी भंडारदरा धरणातून सोडणे गरजेचे असताना निळवंडे धरणातून अडीच टी.एम.सी.पाणी सोडले तर भंडारदरा धरण अकरा टी.एम.सी.क्षमतेचे व मोठे असताना त्यातून केवळ दिड टी.एम.सी पाणी सोडून निळवंडे धरणाच्या लाभक्षेत्रावर अन्याय केला आहे. (हि माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या तोंडी माहितीनुसार आहे.माहिती अधिकारात ती नाकारली आहे व नगर येथील कार्यालयाकडून मागण्यास सांगितली आहे) त्यातच वर्तमानात मोठा दुष्काळ पडला आहे.दूध व्यवसाय हा रोख चलनाचा व्यवसाय असल्याने शेतकऱ्यांना उन्हाळ पिकांना,पिण्यास व पशुधन वाचविण्यासाठी पाणी आवश्यक आहे. वर्तमानात या दुष्काळी भागात पाणी शिल्लक नाही. त्यामुळे शेतकरी हताश झाले आहे. त्यामुळे त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे.
मात्र निळवंडे प्रकल्पाचे, 'जलदुत', चौकाचौकात फ्लेक्सद्वारे मिरवणारे आणि आपल्या तीन पिढ्यानीं या पाण्यासाठी प्रयत्न केले सांगणारे नेते बिळात जाऊन गायब झाले आहे. त्यामुळे दुष्काळी शेतकऱ्यांत संताप व्यक्त होत आहे.
वर्तमानात भंडारदरा धरणातून प्रवरा नदी पात्रात आवर्तनाचे पाणी नुकतेच सोडले आहे.मात्र निळवंडे धरणाचे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना या भागातील नेत्यांनी ऐन निवडणुकीत वाऱ्यावर सोडले आहे.याचा जाब विचारण्याची गरज निर्माण झाली असून त्याबाबत दुष्काळी मतदारांनी जागृत होणे गरजेचं असल्याचे आवाहन दिघे यांनी केले आहे.व निळवंडे व भंडारदरा धरणातून आमच्या वाट्याचे पाणी ताबडतोब सोडावे अशी मागणी कालवा कृती समितीचे कार्याध्यक्ष मच्छीन्द्र दिघे यांनी एका प्रसिद्धी पत्रकानंव्ये नुकतीच केल्याने शेतकऱ्यांनी याबाबत समाधान व्यक्त केले आहे.

सदर प्रसिद्धी पत्रकावर निळवंडे कालवा कृती समितीचे संस्थापक नानासाहेब जवरे, अध्यक्ष रुपेंद्र काले,गंगाधर रहाणे, उपाध्यक्ष संजय गुंजाळ, सोन्याबापू उऱ्हे, सचिव कैलास गव्हाणे, निळवंडे समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर वर्पे,पाटपाणी समितीचे उपाध्यक्ष उत्तमराव घोरपडे, बाबासाहेब गव्हाणे, भाऊसाहेब गव्हाणे, बंडू देशमुख, ज्ञानदेव पाटील हारदे,संघटक नानासाहेब गाढवे, कौसर सय्यद, आप्पासाहेब कोल्हे, नवनाथ शिरोळे, रावसाहेब मासाळ, उत्तमराव जोंधळे, अशोक गांडोळे, सचिन मोमले, राजेंद्र निर्मळ, सोमनाथ दरंदले, भिवराज शिंदे, गोरक्षनाथ शिंदेआदींच्या सह्या आहेत.

# महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थ्यी सेनेच्या उपाध्यक्षपदी किशोर गवळी, शहराध्यक्षपदी यश गव्हाणे

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थ्यी सेनेच्या उपाध्यक्षपदी किशोर गवळी, शहराध्यक्षपदी यश गव्हाणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना राज्य कार्यकारणी सदस्य किरण शिंदे, उत्तर जिल्हाध्यक्ष संकेत लोंढे, जिल्हा उपाध्यक्ष संतोष गव्हाणे राहुरी तालुकाध्यक्ष विकास म्हस्के, र.सा.सु.आ.जिल्हा संघटक दीपक परदेशी,प्रमोद काळे, तालुका अध्यक्ष सचिन गव्हाणे हे उपस्थित होते. परखड रोखठोक भुमिका, स्पष्ट वक्तव्य करोडो जनतेच्या मनामध्ये राज्य करणारे दूरदृष्टी ठेवणारे महाराष्ट्राची बुलंद तोफ मनसे अध्यक्ष राज ठाकरे साहेब यांच्या विचाराने प्रेरीत होऊन नेवासा शहरातील नवीन युवा पिढीचे महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थ्यी सेनेत प्रवेश नेवासा येथील हॉटेल गव्हाणे बंधू येथे थाटामाटात पार पडला. शहरामध्ये विद्यार्थ्यी, विद्यार्थीनी व जनतेचे विविध प्रश्न आहेत व ते प्रश्न सुटले पाहीजेत जनतेला न्याय मिळाला पाहिजे आगामी नगरपंचायत निवडणूकी मध्ये नवीन युवा पिढीला काम करण्याची संधी मिळाली पाहीजे व ऐतिहासिक तिर्थक्षेत्र नेवासा शहर व नेवासे तालुक्यामध्ये बदल घडला पाहीजे या उद्देशाने नव्या पिढीने मनसे पक्षात प्रवेश केला. यावेळी महेश मिसाळ, प्रकाश दाने,राहूल कोरेकर, महेश ठोसे, गणेश शेंडे यांचा पक्षात प्रवेश झाला व लवकरच पुन्हां नव्याने मोठ्या संख्येने नवीन प्रवेश होणार आहे अशी माहिती मनसे जिल्हा उपाध्यक्ष संतोष गव्हाणे यांनी दिली तर नवीन पदाधिकारी व नवीन प्रवेश करणाऱ्या सर्व मनसे सैनिकांचे आभार व्यक्त करण्यात आले तर मित्र पक्ष भाजपचे युवा नेते मनोजभाऊ पारखे शिवसेनेचे रामदास लष्करे, शिवाजी लष्करे यांनी देखील नवीन पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या



# उदयनराजेंच्या प्रचारार्थ लोणंदला महायुती मेळावा

## भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रमुख उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** सातारा लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या प्रचारार्थ भाजपा प्रदेशाध्यक्ष आ.चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत व सातारा जिल्हा भाजपा अध्यक्ष धैर्यशीलदादा कदम यांच्या अध्यक्षतेखाली लोणंद ता.खंडाळा येथे महायुती मेळावा संपन्न करण्यात आला. यावेळी 'मेरा बुथ, सबसे मजबूत' हे सत्यात उतरविण्यासाठी तळागाळात जाऊन काम करण्याच्या सुचना भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्व बुथप्रमुखांना दिल्या. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्यामुळे दहा वर्षात देश प्रगतीपथावर गेला असून तिसऱ्यांदा पंतप्रधान पदाची शपथ नरेंद्रजी मोदीच घेणार असा विश्वास सुद्धा चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. यावेळी रामकृष्ण वेताळ, आनंदराव शेळके-पाटील, अनुपजी सूर्यवंशी, अनिरुद्ध गाढवे,



बापूराव धायगुडे, सुशांत निंबाळकर, चंद्रकांत यादव, गीतांजली क्षीरसागर, संभाजीराव जाधव, ऋषिकेश धायगुडे-पाटील, राहुल घाडगे,प्रदीप क्षीरसागर, अतुलबाबा पवार, हर्षवर्धन शेळके-पाटील,दिपाली शेळके, राजश्री शेळके,ज्योती डोनीकर, तृप्ती घाडगे, महेश शेळके, रविकांत भोसले, उमेश बोडरे,गणेश गुंडगे आदिंसह खंडाळा तालुक्यातील महायुतीचे पदाधिकारी,महिला भगिनी,कार्यकर्ते उपस्थित होते.



# वरखेड येथील महालक्ष्मीदेवीच्या यात्रेत लाखो भाविकांची मांदियाळी

## महालक्ष्मीदेवीच्या जयघोषाने वरखेडनगरी दुमदुमली

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या नेवासा तालुक्यातील वरखेड येथील श्री महालक्ष्मीदेवीच्या यात्रेच्या निमित्ताने दिवसभरात सुमारे तीन लाख भाविकांनी दर्शन घेतले. यावेळी शेकडो पालख्यांनी वाजत गाजत मंदिर प्रांगणात हजेरी लावली.यावेळी भक्तांनी श्री महालक्ष्मीदेवीच्या नावाने केलेल्या जयघोषाने वरखेड नगरी दुमदुमली होती.

वरखेड येथील यात्रा उत्सव महाराष्ट्रात प्रसिद्ध असा आहे. नवसाला पावणारी श्री महालक्ष्मीदेवी म्हणून दरवर्षी लाखो भाविक यात्रेसाठी येत असतात,आपले नवस फेडतात. रविवारी दि.२८ एप्रिल रोजी झालेल्या यात्रेच्या निमित्ताने मानाच्या पालखी सह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या विविध पालख्यांनी हजेरी लावली या सर्व पालख्यांचे देवस्थान,ग्रामपंचायत ग्रामस्थांच्या वतीने उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

यात्रेसाठी शनिवारी रात्रीच बरेच भाविक याठिकाणी मुक्कामी होते.रविवारी यात्रेच्या मुख्य दिवशी पहाटे पासूनच भाविकांची दर्शनासाठी मोठी रिघ लागली होती सर्वांना दर्शन घेता यावे म्हणून दर्शनबारीची व्यवस्था करण्यात आली होती.पोलीस, पोलीस मित्र, होमगार्ड व तरुण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी स्वयंसेवकाची भूमिका बजावत भाविकांना येथे सेवा दिली.

दुरवरून आलेल्या भाविकांचे ग्रामपंचायत व यात्रा कमिटीसह श्री महालक्ष्मी देवस्थानचे सचिव कडुबाळ गोरे,उपाध्यक्ष लक्षाधीश दाणे व उपस्थित विश्वस्तांनी श्रीफळ प्रसाद देऊन पालखी चालक व आलेल्या मान्यवरांचे स्वागत केले. तर ग्रामपंचायत प्रांगणात सरपंच विनोद ढोकणे, ग्रामविकास अधिकारी अण्णासाहेब डेंगळे,देवगड भक्त मंडळाचे सेवेकरी संभाजीराव आगळे यांनी आलेल्या भाविकांचे गावकऱ्यांच्या वतीने स्वागत केले. तालुका पंचायत समिती आरोग्य विभागाच्या वतीने उष्माघात बचावासाठी व इतर व्याधींसाठी मोठा औषध साठा उपलब्ध करण्यात आला होता.यावेळी वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांनी शेकडो रुग्णांची तपासणी केली. तातडीच्या उपचारासाठी तीन रुग्णवाहिका सेवेसाठी तैनात करण्यात आल्या होत्या.

यात्रे निमित्त महालक्ष्मीदेवीचे मंदिर प्रांगण भाविकांच्या गर्दीने फुलून गेले होते. विविध प्रकारची दुकाने शामियाने उभारून थाटण्यात आली होती. भाविकांनी नवस फेडण्यासाठी बोकड व कोंबडीचा नैवैद्य देवी चरणी अर्पण केला तर कोणी नवसाची घंटी, कोणी पूरणावरणाचा शाकाहारी नैवैद्य अर्पण करून देवीची खणानारळाने ओटी भरून आपल्या नवसाची पूर्तता केली. शेकडो बोकड व कोंबडयांच्या बळी ही देण्यात आले. महालक्ष्मीदेवीचे सजवून निघालेले मुखवटे व पालख्या समोर देवीची गाणे म्हणणारे पोतराज असे चित्र यावेळी पहावयास मिळत होते वाजतगाजत निघालेल्या पालख्या मिरवणुका यात्रेसाठी आलेल्या भाविकांचे आकर्षण ठरले होते.

रखरखत्या उन्हाचा तडाखा असतांना देखील देवीच्या दर्शनाची आस भाविकांमधून दिसून येत होती. शिरसगाव पासून ते वरखेड पर्यंतचा रस्ता अरुंद व खाच खड्यांनी भरलेला असल्याने वाहनांना कसरत करतच मंदिराकडे जावे लागले.तर वरखेड गावातील अरुंद रस्त्यामुळे पादचाऱ्यांना ही मोठा त्रास सहन करावा लागला.महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक येथे दर्शनासाठी येत असल्याने तीर्थक्षेत्र विकासासाठी भरीव निधीची तरतूद झाल्यास येणाऱ्या अडचणी व इतर जागेचा ही प्रश्न सुटू शकतो अशी ही भावना भाविक व्यक्त करतांना दिसत होते.

नेवासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त यावेळी ठेवण्यात आला होता.पोलीस निरीक्षक जाधव हे स्वःत जातीने लक्ष घालून पोलीस गाडीवरील माईकवरुन भाविकांना नियमांचे पालन करण्याबाबतच्या सूचना देतांना दिसत होते ते स्वतः येथे ठाण मांडून बसल्याने पार्किंगमध्येच गाड्या पार्किंग केल्या जात होत्या.पोलीस बांधव ही भर उन्हात सेवा देतांना दिसत होते यामुळे वाहतूक विस्कळीत होण्याचे प्रमाण घटले असल्याचे चित्र पहावयास मिळत होते.

# ८.७० लाखांचे गोवंश जप्त : दोघांवर गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** तालुक्यातील समृद्धी महामार्गाच्या नजीक टोल नाक्याजवळ कोपरगाव शहर पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहिती नुसार लावलेल्या सापळ्यात एक पांढऱ्या रंगाचा टाटा कंपणीचा इंट्रा व्ही-३० टेंपो (एम.एच.४३ बी.एक्स.८७८५) पोलिसांनी जप्त केला असून त्यातील विविध गोवंश जातीचे ८.७० लाख रुपयांचे गोमांस जप्त केले असून दोन आरोपी अटक केले आहे.त्यामुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे.या प्रकरणी कोपरगाव शहर पोलिसांनी आपल्या दप्तरी दोन आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. महाराष्ट्रात नऊ वर्षा पूर्वी भाजप सरकारने गोवंश हत्या बंदी कायदा लागू करण्यात आला होता. राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी या कायद्यावर स्वाक्षरी केली होती. तोपासून 'गोहत्या' हा दंडनीय अपराध मानला जात आहे.गोहत्या करणाऱ्या गुन्हेगाराला कठोर शिक्षाही होण्याची तरतूद आहे. गाय ही हिंदू धर्म आणि संस्कृतीचे प्रतिक मानले जाते. त्यामुळे गोवंश हत्या बंदी कायदा लागू करण्याची मागणी सातत्याने होत होती.मात्र नऊ वर्षांनी आज चित्र पहिले तर हा कायदा खरेच उपयक्त ठरला का असा सवाल निर्माण झाला आहे.कारण अशा घटना वारंवार उघड होत आहे.अशीच घटना नुकतीच कोपरगाव तालुक्यात उघड झाली असून यात पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी कोकमठाण हद्दीत समृद्धी टोल नाक्याजनिक सापळा लावला असता त्या ठिकाणी वरील वर्णनाचा टेंपो पोलिसांना आढळून आला आहे.पोलिसांनी त्यास ताब्यात घेतले असता त्यात ०२ लाख ७० हजार किमतीचे १७०० किलो ग्रॅम गोवंश जातीचे गोमांस,०६ लाख रुपये किमतीचा वरील वर्णनाचा टेंपो आढळून आला आहे. दरम्यान यात दोन आरोपी मोहंमद कैफ शरीफ कुरेशी,(वय-२०) रा.कुर्ला पूर्व,रिजवान मलंग कुरेशी (वय-३६) उस्मान गल्ली कुर्ला पूर्व आदींना अटक केली आहे.

या प्रकरणी कोपरगाव शहर पोलिसांनी आपल्या दप्तरी गुन्हा क्रं.२१३/२०२४ महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा अधिनियम १९७६ चे कलम ५,९,११ भा.द.वि.कलम १८८,२७९,२७१,३४,साथ रोग अधिनियम १८९७चे कलम ३,४ प्रमाणे २ आरोपीवर गुन्हा दाखल केला आहे.घटना स्थळी सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वास पावरा यांनी भेट दिली आहे.

# आंबेडकरी चळवळ तळागाळात पोहचविण्याचे काम युवकांनी करावे : पप्पू कागदे

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्यायावर आधारित समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी शिका, संघटित व्हा संघर्ष करा हा मूलमंत्र देऊन या देशातील तमाम उपेक्षित समूहातील समाज बांधवांना आपल्या हक्क व अधिकारासाठी आवाज उठविण्याची व लढा उभारण्याची ताकद निर्माण करून देण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. आंबेडकरी चळवळ गतिमान करण्यासाठी युवकांनी संघटीत होऊन आंबेडकरी विचारधारा तळागाळात पोहोचविण्याचे काम करावे. असे प्रतिपादन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइं बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 133 व्या जयंतीनिमित्त देवी बाभूळगाव, खंडाळा,पोखरी, खंडोबाची वाडी, आहेर चिंचोली, बेलखंडी पाटोदा या गावी केले. पुढे बोलताना पप्पू कागदे म्हणाले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आत्मसात करून आगामी काळात आंबेडकरांना अपेक्षित असलेली समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी युवकांनी पुढाकार घेऊन व्यसनाधीन होत असलेल्या तरुण पिढीला व्यसनातून मुक्त करण्यासाठी गावागावात व्यसनमुक्ती अभियान राबवून व्यसनमुक्त समाज निर्माण करण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीचे औचित्य साधून करावे असे मत पप्पू कागदे यांनी व्यक्त केले. यावेळी राजू जोगदंड, किसन तांगडे, महादेव उजगरे, बापू पवार, सुभाष तांगडे, राजेंद्र शेळके, प्रकाश शेळके, दीपक जावळे, सुशील जावळे,धम्मपाल जावळे, चंद्रकांत जोगदंड, विकास रकटे, एकनाथ ईनकर, महादेव ईनकर, नामदेव वाघमारे, चिमाजी वाघमारे, देवा वाघमारे, बारीकराव वाघमारे, सिद्धार्थ वाघमारे आदी उपस्थित होते.



# कोपरगाव सब जेलमध्ये कैद्यांत तुंबळ हाणामारी; एक जखमी : सहा जणांवर गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** तालुक्यात अ.नगर येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या धडक कारवाईत मोठ्या प्रमाणावर गुटखा जप्त केल्या प्रकरणातील आरोपी दानिश शेरखां पठाण (वय-१९) याला कोपरगाव उपकारागृहात ठेवलेले असताना त्या बराकीतील आरोपी भैय्या उर्फ नयन शिंदे,भारत आव्हाड,अतुल आव्हाड,आकाश माकोने,विकी शिंदे आदींनी मारहाण करून मिशी कापण्याच्या कात्रीने गंभीर दुखापत केली असून सदर घटना न्यायालय अथवा पोलिसांना सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात वरील सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला असून या प्रकरणी कारागृहातील पोलीस सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. कोपरगाव शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत नुकताच मोठ्या प्रमाणावर गुटखा पकडला होता त्याचे विरुद्ध कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद केली आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रदीप देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली करत असताना या गुन्ह्यातील आरोपी दानिश शेरखां पठाण याला पोलिसांनी अटक केली होती.व त्यास न्यायालयाने पोलीस सुनावली होती.त्यानंतर पोलिसांनी त्यास कोपरगाव येथील उपकारागृहात रवानगी केली होती.

दरम्यान तो दि.२६ एप्रिल रोजी रात्री कारागृहातील क्रं.०४ या खोलीत ठेवले असताना रात्री ०८ वाजेच्या सुमारास आरोपी भैया शिंदे व आकाश माकोणे यांच्यात आपापसात वाद सुरु होते.त्यावेळी माकोणे याने काही कारण नसताना फिर्यादी शेरखां पठाण यास शिवीगाळ करून धक्का दिला असल्याचा त्याचा आरोप आहे.त्यावरून फिर्यादी याने याबाबत आरोपीस विचारणा केली असता त्याचा राग येऊन फिर्यादी पठाण याने या बाबत त्यास जाब विचारला असता त्याचा आरोपी विशाल कोते यास राग आला व तो इतर आरोपीना म्हणाला की,"याला धरा हा जास्त माजला आहे" असे म्हणताच इतर आरोपीनी त्यास लाथा बुक्क्यांनी मारहाण केली आहे.व कोते याने मिशी कापण्याच्या छोट्या कात्रीने त्याच्या उजव्या हातावर उजव्या पायावर मारून दुखापत केली आहे व फिर्यादीस म्हणाले की,"या घटनेबाबत,' तू' पोलीस अथवा न्यायालयात सांगितले तर तू परत कारागृहात आल्यावर तुला मारून टाकू" असा सज्जड दम दिला आहे.